# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १० एप्रिल, २०२३ / चैत्र २०, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**५८.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**<br>**मुंबई,**<br>**दिनांक : १० एप्रिल, २०२३**

**राजेन्द्र भागवत**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

# महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्रमांक- ११९१

श्री. सुनिल शेळके, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- ११९१ पुढीलप्रमाणे आहे -

" पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पवना धरणासाठी सन १९६४ ते १९७२ दरम्यान १९ गावांतील १२०३ खातेधारकांच्या सुमारे २३९४ हेक्टर जमिनीचे शासनाकडून भूसंपादन होणे. यामध्ये एकूण प्रकल्प बाधित शेतकऱ्यांपैकी केवळ ३४० शेतकऱ्यांचे मावळ व खेड तालुक्यात पुनर्वसन करण्यात येणे. परंतु शासनाकडे केवळ २१५ खातेदारांची नावे उपलब्ध असून त्यामुळे प्रशासनाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर येत असल्याची बाब निदर्शनास येणे. तसेच यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या नावांची सातबारा वर नोंदच नसून त्यांच्याकडे सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा नसल्याचे निदर्शनास येणे. उर्वरित ८६३ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून सदर प्रकल्पामध्ये संपादित क्षेत्र व शिल्लक क्षेत्राचे जलसंपदा विभागामार्फत मोजणी होऊनही त्या अहवालाचे महसूल व भूमी अभिलेख विभागाकडून खातर जमा करणे बाकी असणे. सदर पुनर्वसनाच्या बाबतीत दिनांक २९/०५/२०२१ रोजी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित होऊन सदर बैठकीमध्ये पुनर्वसनाचा प्रश्न लवकर मार्गी लावण्याकरिता मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे संबंधित विभागास उचित निर्देश होऊनही अद्याप हा विषय प्रलंबित असल्याने बाधित खातेदार व जनतेमध्ये मध्ये शासनाच्या विरोधात नाराजीची भावना निर्माण होणे. सदर विषयावर मागील अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च २०२२ या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना उपस्थित केल्यानंतर त्यावर सभागृहात चर्चा न झाल्याने मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात बैठकीचे आयोजन होऊन सदर बैठकीमध्ये मा. उपाध्यक्ष साहेबांनी महसूल, मदत व पुनर्वसन, जलसंपदा व वनविभागाला लवकरात लवकर अहवाल सादर करावयास सूचना दिल्या असून यावर अद्याप कोणतीही ठोस कृती शासनाकडून न होणे यामुळे बाधित शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाविषयी वाढलेला तीव्र संताप तसेच याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया.."

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

पवना प्रकल्प १९६५ पूर्वीचा असून सदर प्रकल्प महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ हे पुनर्वसन अधिनियम लागू होण्यापुर्वीचा आहे. पवना प्रकल्प हा जलकुंभ असल्याने पवना प्रकल्पास स्व:ताचे लाभक्षेत्र नसून प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणुन यापुर्वी पुणे जिल्ह्यातील मावळ व खेड तालुक्यात बहुतांश शासकीय जमिनी वाटप करण्यात आलेल्या आहेत.

पवना प्रकल्पामध्ये एकुण १२०३ प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी ३४० प्रकल्पग्रस्तांना सन १९७४ दरम्यान पुणे जिल्ह्यात मावळ व खेड तालुक्यात पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच ८६३ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन वाटप करावयाचे शिल्लक आहे असे उपलब्ध कागदपत्रावरून दिसुन येते. सदर ८६३ प्रकल्पग्रस्तांची यादी संबंधित २३ गावांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. तद्नंतर एकुण ५६७

प्रकल्पग्रस्तांनी तहसिल कार्यालय मावळ येथे हरकती दाखल केल्या आहेत. तसेच संकलन यादीमध्ये नावे समाविष्ठ करणेबाबत अर्ज केले होते. सदर हरकतींवर सुनावणी घेणेत आली असून सक्षम प्राधिकारामार्फत संकलन रजिस्टर तयार करण्याचे काम चालु आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/०७/२०१० अन्वये पवना प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना खासबाब म्हणून प्रत्येकी १ एकर जमीन वाटप करण्यासंदर्भातील निर्णय घेतलेला आहे. परंतु सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांनी अधिक जमीन मागणीसाठी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. ४६८८/२०१३ दाखल केली आहे. सदर रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३ ऑक्टोबर २०१३ अन्वये जैसे से थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे पवना प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटपाची कार्यवाही करता आलेली नाही. तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशाच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने केलेल्या मोजणीची महसूल विभागामार्फत पडताळणी करुन बहुतांशी डोंगर उताराची पवना प्रकल्पाची सुमारे ५०७ हेक्टर जमीन वाटपास उपलब्ध आहे असे स्थानिक चौकशीत दिसून आले.

सदर विषयावर सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा न झाल्याने सदर विषयाबाबत मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात माहे मे २०२२ मध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जलसंपदा विभागाचे नावे असणारे क्षेत्र पवना प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन विभागाकडे (महसूल विभाग) वर्ग करणेचे निर्देश देणेत आले असून त्यासंदर्भात जलसंपदा विभागामार्फ़त आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ७/७/२०१० च्या अनुषंगाने पवना धरणग्रस्त कृती समिती यांच्या वतीने मुकुंदराज कावुर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ४६८८/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ०३/१०/२०१३ रोजी No further allotment to be made अशी जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश झालेमुळे प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करता आले नाही. मावळ तालुक्यातील पवना व अन्य पाटबंधारे प्रकल्पग्रस्तांच्या अनुषंगाने विधानसभेमध्ये याच हिवाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या सभागृहातील चर्चेदरम्यान सदर प्रकरणी अधिवेशन संपल्यावर बैठक घेण्याचे आश्वासन दिलेले होते. त्यानुसार सदर विषयाबाबत दिनांक ०१.०२.२०२३ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती.

---

# महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्रमांक- १४६०

ॲड. अशोक पवार, श्री.चेतन तुपे, श्री.सुनिल टिंगरे, श्री.दिलीप मोहिते-पाटील, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १४६० पुढीलप्रमाणे आहे -

"पुणे जिल्हातील शिरुर तालुक्यातील चासकमान प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी जमीन संपादित झालेली असताना लाभ क्षेत्रात वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड या प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी जमिन वाटप करणे, चासकमान प्रकल्पाचे धरणग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाल्याचे असतानाही लाभ क्षेत्रातील जमिनीवर संपादन होण्याचे शेरे असणे, सन 1894 च्या भूसंपादन कायदयाने कलम ४ व कलम ६ च्या अधिसूचना २०१३ च्या नवीन भूसंपादन कायदयाने व्यपगत असल्याने शेरे काढून टाकणे आवश्यक असणे, एकत्र कुटुंब पध्दतीत ए.कु.म्य. असे ८ अ नोंद असताना सहहिस्सेदार यांचे क्षेत्र विभागणी करणे गरजेचे होते तसे न करता शेतकरी खातेदारांना अल्प भूधारक, भूमिहीन करणे, स्लॅब आकारताना कालवे, रस्ते, पाझर तलाव, लागवडी अयोग्य क्षेत्र वगळयाची तरतूद असताना अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीवर चुकीचे संपादन करणे, परंतू सदरचा भाग हा स्लॅब मधून वगळणे आवश्यक असणे, स्लॅब आकारणी करताना लाभ क्षेत्रातील व लाभ क्षेत्राबाहेरील जमिनीच्य १/४ जमीन हिशोबात धरुन स्लॅब आकारणी करणे आवश्यक असतानाही लाभ क्षेत्राबाहेरील जमिन प्रत्यक्ष शेतीसाठी पाण्याचा लाभ होत नाही. असे संपादन मंडळाचे अभिप्राय असतानाही चुकिचे स्लॅब लावणे, प्रामाणित संकलन नसताना बोगस प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप होणे, संकलानात फेरबदल करण्याचे अधिकार नसतानाही प्रकल्प ग्रस्तांची संकलने बदलणे, प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप झाल्यावर लगेच कायदयातील तरतुदीचे उल्लंघन करुन अधिकार अभिलेखात फेरफार होण्याआधीच जमिनीचे एंजट लोकांनी खरेदी खते नोंदवणे, जिल्हा पुर्नवसन कार्यालयात संपादित जमिन वाटप जमिन यांचा हिसेब नसणे, त्यामुळे एकाच कुटुंबात दुबार- तिबार वाटप होण्याची शक्यता असल्याने जिल्हा पुर्नवसन कार्यालयाची १९९० पासून दप्तर तपासणी होणे गरजेची असणे, वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड यांचे त्यांचे लाभ क्षेत्रात धरण ग्रस्तांचे पुर्नवसन होणे गरजेचे असणे, शिरुर तालुक्यातील शेतकऱ्यांची ७/१२ वरील चासकमान, टेमघर इत्यांदी पुनर्वसनाचे शेरे पुर्णत: उठविणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही, प्रकल्पिनहाय लाभार्थ्यांना वाटप झालेल्या व राखीव ठेवलेल्या प्रकल्पाग्रस्तांची माहिती मिळणेबाबत मा. विभागीय आयुत्क्, पुणे व पुनर्वसन विभाग, पुणे यांना लोकप्रतिनिधीने ९ स्मरणपत्रे देवूनही अद्यापर्यंत पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून माहिती उपलब्ध् न होणे, पसंतीनुसार प्रकल्पग्रस्तांना शेती जमिन गट वाटप मंत्रालय स्तरावर न होता ते गट वाटप जिल्हास्तरावर सक्षम अधिकाऱ्याकडून होणे अपेक्षित असणे, तसेच मा. उच्च् न्यायालय मुंबई यांचा आदेश असतानाही हवेली तालुक्यातील १६ गावे व दौंड तालुक्यातील ९ गावांचे भामा आसखेड प्रकल्पाचे ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे अद्यापर्यंत काढलेले नसणे, एप्रिल २०२२ च्या सुमारास पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून सदरचे शेरे काढणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवूनही कारवाई न होणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

चासकमान लाभक्षेत्रातील संपादित जमिन वीर, गुंजवणी, टेमघर, आरळा कळमोडी भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेली आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी संपादित जमिनी हया महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम तील कलम १०(२) नुसार वाटप करण्यात आलेल्या आहे. टेमघर, वीर, आरळा कळमोडी या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात प्रकल्पग्रस्तासाठी पर्यायी जमिन वाटप करण्याकामी संपादन झालेले नाही. त्यामुळे सदर प्रकल्पांच्या काही प्रकल्पग्रस्तांना चासकमान लाभक्षेत्रात वाटप झालेले आहे. तसेच गुंजवणी प्रकल्पासाठी लाभक्षेत्रामध्ये संपादन जमिन शिल्लक नसल्याने काही प्रकल्पग्रस्तांना चासकमान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात वाटप करण्यात आले आहे.

चासकमान प्रकल्पातील एकुण प्रकल्पग्रस्त २६४० आहेत. यापैकी १५८८ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करण्यात आलेली आहे. तर उर्वरित १०५२ प्रकल्पग्रस्त प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियममधील तरतुदीनुसार विहीत मुदतीत ६५ % रक्कम न भरलेने अपात्र आहेत. सदरचे १०५२ अपात्रपैकी काही

प्रकल्पग्रस्तांनी दाखल केलेल्या याचिकाप्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे आदेश पारित होऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीसाठी नोटीस देण्याबाबत आदेश देण्यात येत आहेत. त्यानुसर चासकमान प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनी संपादन करण्यासाठी त्याच्या ७/१२ वर इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव किंवा इतर शेरे नमूद करून हस्तांतरण निर्बंध लादलेले होते. अद्यापही काही प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करणेची कार्यवाही सुरू असल्याने त्यासाठी पर्यायी जमिनीची आवश्यकता भासू शकते. तथापी, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.११.२.२०२२ अन्वये, वरीलप्रमाणे हस्तांतरण व्यवहारांवर लादलेले निर्बंध शिथिल करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला असून भुसंपादनाच अधिकार अबाधित ठेवून शेती वापरासाठी व्यवहार अनुज्ञेय करून त्याप्रमाणे कोणतही अर्ज न घेता नोंद घेण्याचे निर्देश दिले आहेत. सदर शासन निर्णयानुसार शिरूर तालुक्यातील सुमारे २६४० हेक्टर क्षेत्रावरील हस्तांतरण व्यवहारांवर लादलेले निर्बंध शिथिल करणेबाबतची वरील कार्यवाही करण्यात आलेली आहे. महसूल व वन विभाग, शा.नि. दिनाक १८.१.२०२२ नुसार वरील हस्तांतरण निर्बंध पुर्णपणे उठविण्याबाबत कार्यपद्धती विहीत केलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार शिरूर तालुक्यातील ५७ जमिन गटांचे हस्तांतरण निर्बंध पुर्णपणे उठविण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रिय कार्यलयामार्फ़त अन्य काही जमिन गटांचे हस्तांतरण निर्बंध उठविण्याबाबत शासनास प्राप्त प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसह माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये सादर केले असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

चासकमान प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पनर्वसन अधिनियम, १९७६ चा कायदा लागू आहे. सदर कायदयानुसार चासकमान प्रकल्पासाठी जमिन संपादनाचा स्लॅब ०३ हे. २३ आर चा आहे. भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार जमिन संपादनाची कार्यवाही करणेत आलेली आहे. सदर संपादन करतेवेळी कलम ५. अ चौकशीमध्ये संबधित शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुददयांबाबत भूसंपादन अधिकारी निर्णय घेत असतात व तदनंतर अंतिम निवाडा जाहीर करणेत येतो. चासकमान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार जमिनीचे संपादन करणेत आलेले आहे. तसेच संबंधित खातेदारास भूसंपादनाची मोबदला रक्कम वाटप करणेत आलेली आहे व जमिनीचा ताबाही घेतलेला आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना संपादित जमिनीचे वाटपही करण्यात आलेले आहे. संपादित जमिनीचा ताबा घेण्यापुर्वी भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४८ (१) अन्वये अपर आयुक्त यांच्याकडे दाद मागणे आवश्यक होते अशी दाद मागितली नसल्यास अशा जमिनी आज रोजी संपादनातुन वगळण्यात येणार नाही.

प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करतेवेळेस भूमी संपादन अधिकारी यांचेकडील पारीत करणेत आलेला निवाडयानुसार गावी तयार झालेले अधिकार अभिलेखे (फेरफार, ७/१२ व ८ अ ) तसेच प्रकल्पग्रस्त यांचे वैयक्तिक कागदपत्रे घेऊन संबंधित प्रकल्पग्रस्त यांची जमिन वाटपाबाबतची पात्रता निश्चित करण्यात येते. तद्नंतर महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींनुसार प्रकल्पग्रस्त यांचेकडून प्राप्त जमीन मागणी प्रस्तावाची पडताळणी करून संबंधित प्रकल्पग्रस्ताला पर्यायी जमीनीचे वाटप करण्यात येते. उपलब्ध संकलन रजिस्टर चा वापर हा फक्त संदर्भासाठी केला जातो.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील १९९९ कलम १६(१) (अ) नुसार प्रकल्पग्रस्त यांची बाधित क्षेत्रातील जमिन प्रकल्पग्रस्त व्यक्तींने पुर्वी धारण केलेले भोगवटा विषयक स्थितीसह त्या व्यक्तीस मंजुर करण्यात येते. प्रकल्पग्रस्त यांची बाधित क्षेत्रातील जमिन भोगवटदार वर्ग १ ची असल्यास त्यास लाभक्षेत्रात मंजुर करण्यात आलेली जमिन भोगवटदार वर्ग १ वर देण्यात येते. त्यामुळे लाभक्षेत्रातील वाटप करण्यात आलेली जमिन विक्रीबाबत शासनाचे कोणतेही निर्बंध प्रकल्पग्रस्त यांचेवर राहत नाहीत.

बुडीत क्षेत्रातील संपादन जमिनीचे सर्व पुणे जिल्हातील २५ प्रकल्पातील उपलब्ध संपादन निवाडे प्राप्त करण्यात आले असुन त्या निवाडयाची माहिती संगणकीकृत करण्यात आली आहे. जेणेकरून प्रकल्पग्रस्तांची पात्रता तपासणे सोईचे होईल याच बरोबर लाभक्षेत्रातील बंदी दिनांकापासूनचे संपादनातील निवाडयातील जमिन गट नं तसेच शासकीय जमिनी वाटप केले असतील अशा जमिनीचे जमिन गट नंबर व क्षेत्र इत्यादी ची माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. सदर जमिन गटावरील बंदी दिनांकापासुनचे सर्व फेरफार व त्याचा तपशिल, हस्तांतरण इत्यादी बाबतची २६ मुददयाची माहिती तलाठी व मंडल अधिकारी स्तरावरून जमा करुन ती डिजीटल स्वरुपात संगणकीकृत करण्यात आली आहे. अशा सर्व डिजीटल माहितीच्या आधारे पुनर्वसन

विभागातील Software संगणक प्रणाली करण्याचे नियोजित आहे. यामुळे संकलन रजिस्टर मधील तफावती, दुबार वाटप व जमिनीच्या हस्तांरणाबाबत माहिती उपलब्ध होउ शकेल या साठी पुणे जिल्हयात SRS (System Regu Studies) करण्यात आला असून राज्यस्तरावर संगणकप्रणाली करण्याबाबत पुनर्वसन विभागाकडून नियोजित आहे. सदरची माहिती संकलित करण्याबाबत कालावधी लागणार आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयामार्फत पुनर्वसन शाखेची तपासणी करण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली होती. सदरील समितीने सादर केलेल्या अहवालातील नोंदविलेल्या निष्कर्षास अनुसरुन संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची एकत्रित विभागीय चौकशी करणेचे प्रस्तावित आहे.

निरा देवघर प्रकल्पाला सातारा व उजनी प्रकल्पाला सोलापूर येथे लाभक्षेत्र आहे. वीर प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना वीर बाजी पासलकर व पानशेत पकल्पाच्या लाभक्षेत्रात पर्यायी जमिन वाटप करण्याकामी मान्यता देण्यात आलेली आहे. टेमघर आरळ कळमोडी व भामा आसखेड यांना स्वतः चे लाभक्षेत्र नसल्याने त्यांना उपलब्ध पुनर्वसन जमिनीमधुन महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०६/२०२२ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दती/ प्राधन्यक्रमनुसार जमीन वाटप करणेचे दक्षता घेण्यात येत आहे.

सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी विचारलेली माहिती सन १९७९ पासुन असल्याने आवाका विस्तृत स्वरूपाचा आहे. सदरची माहिती एकत्रितरित्या उपलब्ध नसल्याने भूसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या स्तरावरून प्राप्त करून संकलित करण्याबाबतची कार्यवाही अदयाप ही सुरू आहे. तरी जिल्हाधिकरी कार्यालयामार्फत उपलब्ध असणारी माहिती संकलित करुन दिनांक ०६/०६/२०२२ रोजी सन्माननीय विधानसभा सदस्य यांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती संकलित झाल्यानंतर तात्काळ उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रातील व लाभक्षेत्राबाहेरील पर्यायी जमीन वाटप करण्याबाबत शासन निर्णय दि.१४.१०.२०२१ अन्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे. महसूल व वन विभागाच्या दि. १८ जानेवारी २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील हवेली तालुक्यातील १६ गावे व दौंड तालुक्यातील ०९ गावांच्या ७/१२ च्या इतर अधिकारातील पुनर्वसन राखीव शेरे कमी करणेबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यलयामार्फत शासनास प्राप्त प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरू आहे.

-----------------------------------

८.

लक्षवेधी सूचना क्र.०४

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी)अधिवेशन

ॲड. आशिष शेलार,ॲड.पराग अळवणी,श्री.अमित साटम,श्री.प्रशांत ठाकूर,श्री.योगेश सागर,श्रीमती मनिषा चौधरी,श्री.किसन कथोरे,श्री.सुनिल राणे,श्री.लहू कानडे,श्री.अमित विलासराव देशमुख, श्री.बाळासाहेब थोरात,श्री.कुणाल पाटील,श्री.नानाभाऊ पटोले,डॉ.नितीन राऊत,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),श्री. धिरज देशमुख, श्री. झीशान सिद्दिकी,श्री. संजय पोतनीस,डॉ. राहुल पाटील, श्री.अबू आजमी,श्री.धनंजय मुंडे, श्री.अजय चौधरी, श्री. अस्लम शेख,श्री. अमिन पटेल, श्री. राजेश पवार,श्री.अतुल भातखळकर,श्री.संतोष दानवे, श्री.रमेश कोरगांवकर, श्री. मंगेश चव्हाण,श्री. मंगेश कुडाळकर,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यात मुला-मुलींची ४४५ वसतिगृहे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू असून ज्यामध्ये पन्नास हजाराहून अधिक विधार्थी शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या नियमानुसार निर्वाह भत्ता,शैक्षणिक साहित्य,गणवेश भत्ता,छत्र्या,रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय असताना मागील सहा महिन्यापासून रखडलेला असल्याने तसेच कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता अद्यापी देण्यात आलेल्या नसल्यामुळे सदरहू विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी होऊन त्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होणे, कोरोना काळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद असली तरीही या दरम्यान शाळा, महाविद्यालयेही बंद असलीतरीही ऑनलाइन शिक्षण सुरू असणे, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून गावांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने ऑनलाइन शिक्षण घेणे कठीण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी बाहेर भाड्याची खोली घ्यावी लागणे,मात्र या काळात केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने पर्यायाने शासनाने या काळातील १९ महिन्याचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांच्या खर्चही विद्यार्थ्यांना देण्यास नकार दिल्यामुळे या विद्यार्थ्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांना बाहेर भाड्याच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण करता यावे म्हनून स्वाधार योजना असणे, कोरोना काळात स्वाधार योजनेच्या लाभर्थ्यांना सर्व लाभ देण्यात येणे, मात्र वसतीगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोरोना काळात केवळ वसतिगृह बंद असल्याचे कारण देत त्यांना निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्यापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे समान तत्वावर सुरू असलेल्या दोन योजनाच्या लाभार्थीमध्ये शासन भेद करीत असल्याने नाराजी व्यक्त करून कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता मिळावा म्हणून शासनाकडे रीतसर लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, सदर मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसणे, तसेच मागील सहा

रोयम/1339 (700-3-23)

८क्र.मा.प.

महिन्यापासून रखडलेला निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य भत्ता आदी तसेच कोरोना काळातील १९ महिन्याचे भत्ते विनाविलंब देण्याचे दृष्टीने शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवशक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

.............................................................................................. ..............................

**श्री.एकनाथ शिंदे,मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन**

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात मागासवर्गीय मुलामुलींची ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यान्वित असून या वसतीगृहांची मान्य संख्या ४३,३५८ इतकी आहे. शासन निर्णय,दिनांक १६ मे, १९८४ आणि शासन निर्णय,दिनांक २६ जुलै,२०११ अन्वये शासकीय वसतीगृहातील प्रवेशितांना निवास, भोजन, इत्यादी आवश्यक सोयी सुविधा व निर्वाह भत्ता देण्यात येतो.

राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. यापैकी काही वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये माहे ऑक्टोबर,२०२२ पर्यंत निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय भत्ता अदा करण्यात आलेला आहे. तर काही वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या वर्षामध्ये तरतूदीच्या अनुपलब्धतेमुळे निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय भत्ता अदा करणे शक्य झालेले नाही.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यातील बहुतांश वसतीगृहे ही जिल्हा प्रशासनाने क्वारंटाईन सेंटर म्हणून अधिग्रहित केली होती. या कालावधीत विद्यार्थी वसतीगृहामध्ये राहत नव्हते. परंतु शैक्षणिक संस्थाचे अभ्यासक्रम ऑनलाईन सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाईन सुरू होते. शासन निर्णय, दिनांक २६ जुलै, २०११ नुसार शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची तरतूद आहे. तथापि,कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशानुसार विभागांतर्गत शासकीय मुलामुलींची वसतिगृहे बंद ठेवण्यात येवून सदर वसतिगृहे कोविड सेंटर म्हणून वापरात होती. लॉकडाऊन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमानुसार देय नसल्याने निर्वाह भत्त्याची रक्कम देण्यात आलेली नाही.

सन २०२२-२३ या वर्षात निर्वाह भत्ता इ. साठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून निधीच्या उपलब्धतेनुसार वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रलंबित असलेला निर्वाह भत्ता प्राधान्याने अदा करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

*****

H-1339-1 अ.

## महाराष्ट्र विधासभा १०५ अन्वये सुचना
## सन २०२२ च्या चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन
## श्री.प्रताप सरनाईक वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार
## दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७५३ पुढील प्रमाणे आहे:-

"समाजात असलेले तृतीय पंथीय म्हणजेच किन्नरांच्याही विविध मागण्या प्रलंबित असणे, किन्नर समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी गेल्या अधिवेशनात त्यांच्या मागण्या सरकारकडे मांडलेल्या असणे, किन्नर लोकांना समाजात बहिष्कृत केले जाते किंवा वाईट वागणूक मिळत असणे, त्यांना रोजगारही मिळत नसल्याने ते भीक मागतात ट्रॅफिक सिग्नलवर किंवा इतर ठिकाणी दिसत असणे, महाराष्ट्र हा प्रगत राज्य तर आहेच पण देशाला दिशा दाखवणारे राज्य आहे त्यामुळे तृतीय पंथीयांना समाजात समानतेचा अधिकार देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी " किन्नर कल्याण महामंडळ " स्थापना करण्याची नितांत आवश्यकता, तसेच किन्नरांसाठी स्वतंत्र शौचालये नसल्याने त्यांची प्रचंड कुचंबना होणे, त्यामुळे अशी शौचालये तातडीने बांधणे अत्यावश्यक असणे, त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण, पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र सेल, रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी किन्नरांसाठीच स्वतंत्र बोगी,सरकारी अर्जामध्ये स्त्री,पुरुष याप्रमाणेच किन्नर असा तिसरा कॉलम यासह त्यांच्या रोजगार,घर,शिक्षण याबाबत अशा त्यांच्या विविध मागण्या असणे, तसेच काही दिवसांपूर्वी शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेमध्ये मा.उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करुन तृतीय पंथियांना सामावून घेण्यासंदर्भात आदेश दिलेले असणे, त्यामुळे तृतीय पंथियांना देखील समाजात मान -सन्मान मिळावा हे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावरुन दिसून येणे, त्यासाठी शासनाने किन्नरांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे शिक्षण, रोजगार, घर आणि इतर कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महामंडळाची स्थापना करणे गरजेचे असणे, समाज कल्याण खात्याच्या अंतर्गत किन्नरांच्या सर्व मागण्या, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी कृती आराखडा बनविणे त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी तृतीय पंथियांना समानतेचा अधिकार देण्याकरिता शासनाने लवकरात लवकर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे निवेदन

राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी राज्य स्तरावर व विभागीय स्तरावर राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबतचा शासन निर्णय दि.१३/१२/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या मंडळाच्या संरचनेनुसार राज्यस्तरावरील तृतियपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळावर (राज्यस्तर) सदस्यांची दि. ८ जुन,२०२० च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

२. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयांमध्ये तृतीयपंथीयांच्या समस्यांच्या/तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची स्थापना दि. ७ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

३. त्याचप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या खसरा क्र.११९,१२० मौजा-चिखली (देव) येथील ४८३८.३१ चौ.मी. क्षेत्रावर अभिनव घरकुल योजनेंतर्गत ९ माळयांच्या ३ इमारतींचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यासद्वारे करण्यात आले असून या इमारतीमध्ये एकुण २५२ सदनिका सवलत दरात तृतीयपंथीयांना देण्याचा मानस आहे.

४. तृतीयपंथीयांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी बीज भांडवल योजनाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

५. तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी तसेच तृतीयपंथींची लिंगनिहाय ओळख करुन तृतीयपंथीयांचा विकास आणण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज/ आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" या पर्यायासोबत " तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देण्याचे अनिवार्य करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

६. राज्यातील तृतयपंथीयांचे कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी तृतियपंथीयांचे कल्याणमंडळ ( २२३५ सी १९९) या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ या लेखाशिर्षाखाली रु. १० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

७. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये ऑनलाईन अर्ज सादर करावयाच्या प्रणालीमध्ये तृतीयपंथीय व्यक्तींकरिता पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यानुसार पोलीस शिपाई पदाकरिता ६८ व चालक पोलीस शिपाई पदाकरिता ०५ असे एकूण ७३ तृतीयपंथी उमेदवारांनी पोलीस शिपाई भरतीकरिता आवेदन अर्ज सादर केले आहेत. तसेच, मा. उच्च न्यायालयाने दि. २८ फेब्रुवारी,२०२३ पर्यंत तृतीयपंथीयांच्या शारीरिक मोजमापाचे निकष ठरविण्याबाबत निर्देश दिल्यानुसार याबाबतची कार्यवाही गृह विभागाकडून चालू आहे.

८. राज्यातील तृतीयपंथीयांना नवीन शिधापत्रिका मिळविण्यासाठी येणा-या अडचणींचा सहानुभूतीपूर्व विचार करुन त्यांना राष्ट्रीय सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी सुलभ कार्यपध्दती अनुसरुन पात्रतेनुसार योग्य ती शिधापत्रिका देणे व यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी विशेष मोहिमेचे आयोजन करण्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून दि.२७ सप्टेंबर,२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

९. तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची (शौचालय) सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत सूचना देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी तृतीयपंथीयाना स्वतंत्र बोगी उपलब्ध करुन देणे ही रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीतील बाब असल्याने या अनुषंगाने त्यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.

१०. तरी वरीलप्रमाणे तृतीयपंथीयांसाठी शिक्षण, रोजगार, घर व इतर कल्याणकारी योजना प्रस्तावित असून राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकाची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच पुनर्वसनासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

************************************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र-१८०८

**मा. श्री. रमेश कोरगांवकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८०८ पुढील प्रमाणे आहे :-**

"सामाजिक न्याय विभागाने डी. आर. अत्राम यांना दि. ३० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास सह आयुक्त, समाजकल्याण या पदावर १ दिवसासाठी पदोन्नती देण्यात येणे, ज्या दिवशी पदोन्नती दिली त्याच दिवशी ते सेवानिवृत्त होणे, सह आयुक्तांची ४ पदे गेल्या कांही दिवसांपासून रिक्त असतानांही सदर पदे भरण्यात न येणे, तसेच डी. आर. अत्राम यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी केवळ एक दिवसांची पदोन्नती देण्यात आल्याने इतर अधिकारी यांच्यात पसरलेले तीव्र नैराश्याचे वातारण, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन समाजकल्याण विभागातील सह आयुक्तांची रिक्त असलेली पदे भरण्यास दिरंगाई करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची तसेच रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

**मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन**

उपायुक्त संवर्गामधून सहआयुक्त या संवर्गामध्ये १०० टक्के पदोन्नतीने पदे भरण्याची तरतूद आहे.

समाज कल्याण आयुक्तालयाच्या अधिनस्त सहआयुक्त/सहसंचालक संवर्गातील एकूण ५ पदे मंजूर असून पैकी २ पदे भरण्यात आली असून ३ पदे रिक्त होती.

शासन स्तरावरुन उपायुक्त संवर्गाची दि. ०१.०१.२०१४ रोजीची सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द झाली त्यानुसार पदोन्नतीकरिता केवळ उपायुक्त संवर्गातील दोनच अधिकारी उपलब्ध होते. याशिवाय उपायुक्त संवर्गामध्ये कार्यरत असलेल्या अन्य अधिकाऱ्यांचा सेवाजेष्ठता यादीमध्ये समावेश नसल्याने निवडसूचीनुसार त्यांचा विचार करण्यात आलेला नाही.

कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे पदोन्नतीकरिता आवश्यक असलेल्या अभिलेख्यामध्ये प्रामुख्याने गोपनीय अहवाल, संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे किंवा कसे या सबंधित माहिती तसेच, संगणक प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली.

श्री. आर. डी. आत्राम, तत्कालिन प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नागपूर यांच्या विरुध्द शासन स्तरावर विभागीय चौकशी सुरु होती. सदरच्या विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय शासन आदेश दि. ०३.०१.२०२२ रोजी निर्गमित झाला. त्यामुळे ते वरीष्ठ पदावर पदोन्नतीसाठी विचारार्थ राहीले.

केटा/ह्च-१२५५ (७५०-३-२०२३) [कृ.मा.प.

तसेच पदोन्नतीकरिता आवश्यक असलेल्या सद्याच्या पदावरील स्थायित्व प्रमाणपत्राबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येऊन शासनाचे दि. ०४.०५.२०२२ रोजीच्या प्रमाणपत्राव्दारे श्री. आर. डी. आत्राम यांना स्थायित्व प्रमाणपत्र शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेले आहे.

आयुक्तालयाचे पत्र क्र. सकआ/आस्था-१/सहआयुक्त पदोन्नती/१२२३, दि. १२.०४.२०२२ अन्वये शासनास उपायुक्त संवर्गातून सह आयुक्त संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासबंधीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता. पदोन्नतीकरिता सेवाजेष्ठता यादी अंतिम होणे आवश्यक होते. उपायुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ संवर्गाची सेवाज्येष्ठतासूची शासन स्तरावरुन दि. १६.०६.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील आस्थापना मंडळाकडे पदोन्नतीचा प्रस्ताव सादर केला असता पात्रता धारण केल्याने उपायुक्त संवर्गातून सहआयुक्त या पदावर शासन आदेश दि. ३०.०८.२०२२ अन्वये श्री. आर. डी. आत्राम यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यानुसार ते पदोन्नतीच्या पदावर दि. ३०.०८.२०२२ रोजी हजर झाले.

*******

## महाराष्ट्र विधान सभा

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.राजेश नरसिंगराव पाटील, **मा.विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९२४ पुढीलप्रमाणे आहे :-**

" कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदार संघ महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर असून या ठिकाणी सीमा भागालगत राहत असलेले अनेक मराठी भाषिक विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण महाराष्ट्र राज्यात येवून मराठी भाषेचे पूर्ण केलेले असणे, या विद्यार्थ्यांना कन्नड भाषा येत नसल्याकारणाने त्यांना कर्नाटक राज्यातील स्पर्धा परिक्षा देणेचे गैरसोयीचे होत असणे, या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्यातून परिक्षा देण्याचे ठरविल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षामध्ये समाविष्ट होणेसाठी रहिवासाची अट घातली असल्यामुळे या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्यातून परिक्षा देता येत नसणे, तसेच कन्नड भाषा येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांची परिस्थिती " ना घर का ना घाट " अशी होत असणे, मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता रहिवासी दाखलाही शिथिल करुन सीमा भागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी 10 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची प्रतिक्रया."

---

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलिन करण्यात आले. खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी करुन कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर महाराष्ट्र शासनाने दावा केला. सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दावा केला असून तो अद्यापही न्यायप्रविष्ठ आहे.

" कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदार संघ महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर असून या ठिकाणी सीमा भागालगत राहत असलेले अनेक मराठी भाषिक विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण महाराष्ट्र राज्यात येवून मराठी भाषेचे पूर्ण केलेले असणे " ही वस्तुस्थिती आहे. या विद्यार्थ्यांना कन्नड भाषा येत नसल्याकारणाने त्यांना कर्नाटक राज्यातील स्पर्धा परिक्षा देण्याचे ठरविल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षामध्ये समाविष्ट होणेसाठी रहिवासाच्या अटीबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक, क्र.मकसी- १००८/प्र.क्र.३६/का-३६, दिनांक १० जुलै, २००८ अन्वये निर्णय घेतला आहे. आयोगामार्फत आयोजित पदभरतीकरीता सामाजिक अथवा समांतर आरक्षणांतर्गत पदे वगळता व राखीव पदावरील निवडीसाठी महाराष्ट्रातील रहिवासी अट लागू नाही. त्यामुळे महाराष्ट्र - कर्नाटक सीमाभागालगत वास्तव्यास असलेल्या मराठी भाषिक विद्यार्थ्यांना आयोगामार्फत आयोजित स्पर्धा परिक्षांमध्ये समाविष्ठ होण्यासाठी अराखीव पदाकरीता अर्ज करण्याची मूभा आहे.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांना महाराष्ट्र राज्यातून परिक्षा देण्याचे ठरविल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांमध्ये समाविष्ट होण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुका अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार तयार करण्यात आलेल्या सेवा प्रवेशाच्या नियमाच्या प्रारुप २.१ सर्वसाधारण पात्रता **भारताचा नागरीक** अशी पात्रता विहित करण्यात आली असून यामध्ये महाराष्ट्र राज्यात किमान वास्तव्याची अट अंतर्भूत करण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातींमध्येही अशा प्रकारची अट विहित केलेली नसते. त्यामुळे महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षेकरीता उमेदवारी अर्ज करणे गैरसोयीचे ठरत नाही.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना संबंधित पदांच्या सेवाभर्ती नियमांतील सर्व अटींची ते पूर्तता करीत असल्यास त्यांना महाराष्ट्र शासनाच्या

शेरा (H-1463-2-720)

सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व त्यांची गुणानुक्रमे निवड होत असल्यास महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नेमणुकीस ते पात्र ठरतील. मात्र सदर उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये महाराष्ट्रात सतत १५ वर्षे वास्तव्याची अट विहित करण्यात आली असेल त्या पदासाठी अर्ज करताना त्यांचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य आहे किंवा नाही या अटीची छानबीण करताना त्यांचे सदर ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य विचारात घेण्यात येते. तथापि, सदर ८६५ गावांतील मागासवर्गीय उमेदवारांना महाराष्ट्रातील आरक्षणाच्या सोयी अनुज्ञेय होणार नाहीत. याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१२/२००८/प्र.क्र.४१४/मावक-५, दिनांक १२ सप्टेंबर, २००८ अन्वये "महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदावरील नियुक्ती संदर्भात महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीयांचे लाभ अनुज्ञेय नसल्याबाबत" निर्णय घेण्यात आला आहे.

संसदेस भारतातील संपूर्ण क्षेत्राकरीता किंवा विशिष्ट क्षेत्राकरीता कायदा करण्याचा अधिकार आहे. तसेच राज्य विधानमंडळास त्यांच्या राज्यापुरताच कायदा करण्याचा अधिकार आहे. राज्य शासनाने केलेले कायदे राज्यातील क्षेत्रापूरतेच लागू होतात. यास्तव आरक्षणसंदर्भात किंवा सेवाभरती संदर्भात महाराष्ट्र शासनामार्फत विधानमंडळात पारीत केलेले कायदे इतर राज्यातील भागाकरीता लागू होणार नाहीत. यास्तव सीमा भागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षण ठेवण्याप्रकरणी महाराष्ट्र शासनामार्फत कायदा करणे इष्ट होणार नाही.

*****

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

मा.श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर १,२,३,४ तसेच ९ आणि १० याठिकाणी सिडकोने सुमारे ४० वर्षापूर्वी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम गट, उच्च उत्पन्न गटाकरिता सदनिका बांधणे, सदर सदनिका २ ते ४ मजली इमारतीमध्ये असणे, या इमारतीमधील बहुतांश तळ मजल्यावर निवासी वापराकरिता देण्यात आलेल्या सदनिकांचे रुपांतर वाणिज्यिक वापरासाठी करण्यात येऊन बेकायदेशीररित्या किराणा दुकाने, औषधालय, रेस्टॉरंटस्, केश कर्तनालय, बँक ए.टी.एम. मिठाईची दुकाने, दुध डेअरी, भाजीपाला विक्री, वाहनांचे टायर विक्री, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु विक्री व दुरुस्ती इत्यादी सुरु असणे, सध्या इमारती मोडकळीस आलेल्या असून इमारतींची दुरावस्था झालेली असल्यामुळे केव्हाही इमारत कोसळण्याची भिती निर्माण झालेली असणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण होणे, सदर इमारतींच्या तळ मजल्यावरील सदनिकाधारकांनी त्यांच्या निवासी वापराकरिता असलेली घरे वाणिज्यिक वापरासाठी अवास्तव भाड्याने दिलेली असणे, वाणिज्यिक वापरासाठी भाड्याने दिलेल्या सदनिकाधारकांचा पुनर्विकासला प्रचंड विरोध असणे, पहिल्या ते चौथ्या मजल्यावरील रहिवाशी पुनर्विकासासाठी अनुकूल असून देखील वाणिज्यिक वापरासाठी दिलेल्या सदनिकाधारकांकडून १ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास धाकदपटशहाच्या मार्गाने स्थानिक रहिवाश्यांना पुनर्विकास होऊ नये याकरिता धमकावणे, त्यामुळे पुनर्विकास प्रक्रिया रखडणे, याकरिता सिडको तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांना संयुक्तरित्या सर्व इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करण्याची नितांत आवश्यकता असणे व सिडकोच्या सर्व जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन कालबद्ध योजना तयार करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका."

---

## मा.मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

नवी मुंबई येथील वाशी, सेक्टर १,२,३,४,९ आणि १० या ठिकाणी सिडको महामंडळाने १९८० च्या सुमारास आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम गट, उच्च उत्पन्न गटाकरीता निवासी सदनिकांचे तसेच निवासी + वाणिज्य इमारतींचे (तळमजला +४) बांधकाम केलेले आहे. सदर सेक्टर १,२,३,४,९ आणि १० येथील निवासी वापराकरिता वाटप झालेल्या सदनिकांचे वाणिज्यिक वापराकरिता करावयाच्या बदलाबाबत सिडकोचे कोणतेही धोरण नसल्याने संबंधित रहिवाशांना गृहनिर्माण संस्थेमधील वापर बदलाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र सिडकोने दिलेले नाही. काही इमारतींमध्ये तळमजला व काही ठिकाणी पहिल्या मजल्यावरील रहिवास वापराऐवजी किराणा दुकाने, औषधालये, रेस्टॉरंट, केश कर्तनालय, बँक, ए.टी.एम. मिठाईची दुकाने, दुध डेअरी भाजीपाला विक्री, वाहनांचे टायर विक्री, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु विक्री व दुरूस्ती इत्यादींसाठी बेकायदेशीर वापर करीत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यावर नियोजन प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

सिडकोनिर्मित वसाहतीतील इमारती कालांतराने जीर्ण, मोडकळीस व धोकादायक होत आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सिडकोने विकसित केलेल्या इमारती पुनर्बांधणी/पुनर्विकासाबाबत दिनांक ०४.०२.२०१५ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम - १९६६ च्या कलम ३७(२) अन्वये विकास नियंत्रण नियमावली ४६(३) मध्ये योग्य ते फेरबदल करून धोरण निश्चित केले असुन त्या धोरणास अनुसरून एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील नियम १०.१०.२ मध्ये याबाबतच्या तरतूदी समाविष्ट केलेल्या आहेत. त्यानुसार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. धोकादायक इमारती म्हणून निश्चिती करणेकरिता सदर समितीकडे संबंधित गृहनिर्माण संस्थेने संरचनात्मक लेखा परिक्षण (Structural Audit Report) अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यावर समिती सदस्यांद्वारे इमारतींची स्थळपाहणी करून इमारती ह्या धोकादायक म्हणून निश्चिती करण्यात येते. सदर धोकादायक इमारतींचा पुनर्विकासाकरीता संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे पुनर्बांधकामाकरीता प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. नवी मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत सिडकोस त्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील तरतूदींनुसार कार्यवाही करून ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सिडकोमार्फत करण्यात येते.

सन २०१७-१८ मध्ये सिडकोने एकूण १४ अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन यांना पुनर्विकास ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. इमारतीच्या पुनर्विकासाकरिता प्रत्येक सदनिका धारकाने संमती देणे आवश्यक आहे. तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.०४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करावयाचा असल्यास एकूण सभासदांच्या ५१% पेक्षा कमी नाही इतक्या बहुमताने पारित झाल्यानंतर, व्यवस्थापन समितीस पुनर्विकासाबाबतची पुढील कार्यवाही करण्याकरिता पुनर्विकासाच्या ठरावाच्या बाजुने मत नोंदवणाऱ्या सभासदांचे लेखी संमतीपत्र घेणे सह-गृहनिर्माण संस्थेस आवश्यक आहे. वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर १,२,३,४,९ आणि १० मधील गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासास विरोध असल्याबाबत तक्रार सिडकोस प्राप्त झालेली नाही.

सिडको विकसित इमारतींच्या पुनर्विकासास चालना मिळावी, याकरीता सदर नियमावलीमधील तरतुद १०.१०.२ मध्ये प्रोत्साहनापर चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर नियमावली अंमलात आल्यापासुन सुमारे ०८ प्रस्तावांना पुनर्विकासाकरीता बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करणेत आलेल्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांवर प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे ~~तृतीय~~ चतुर्थ अधिवेशन

**श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंप्री चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड अंतर्गत ५५० किलोमीटर अंतराच्या इंटरनेट केबल नेटवर्किंगचे काम देशविघातक गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तींशी संबंधित कंपनीला दिले असण्याची बाब उघड होणे, शहरातील नागरिकांच्या खाजगी आयुष्याशी खेळ करणाऱ्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून ती निविदा त्वरित रद्द करावे अशी मागणी निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांना केलेली असणे, पिंप्री चिंचवड शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत ५५० किलोमीटर अंतराची भूमिगत फायबर केबल नेटवर्कचे डक्ट तयार करण्यात असून या प्रकल्पामुळे पालिकेस नेटवर्किंग कंपन्यांकडून भाड्यातून उत्पन्न मिळणे अपेक्षित असणे, सदर डक्ट भाड्याने देण्यासाठी स्मार्ट सिटी प्रशासनाने ३०० कोटींची निविदा नुकतीच प्रसिद्ध केली असून रेलटेल कॉर्पोरेशन, यु सी एन केबल आणि सुयोग टेली मॅट्रिक्स ली- फायबर स्टोरी कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड या तीन कंपन्यांनी निविदा भरली असणे, सुयोग टेली मॅट्रिक्स फायबर स्टोरी कम्युनिकेशन या भागीदारी कंपनीची निविदा पात्र ठरली असल्याचा दावा करण्यात आला असणे, दुबई आणि पाकिस्तानी नागरिकांच्या संपर्कातील तसेच बेकायदा टेलिफोन एक्सचेंज चालविण्याचा आरोपाअंतर्गत गुजरात राज्यात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या लोकांशी संबंधित कंपनीकडे पिंपरी चिंचवडचे केबल इंटरनेट कनेक्शन सोपविण्याचा प्रकार हा अत्यंत गंभीर व देश विघातक ठरण्याची शक्यता असणे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडून सदर कामांतर्गत नागरिकांचा डाटा चोरी जाणे, सायबर गुन्हेगारीस जबाबदार ठरणे, इंटरनेट द्वारे लोकांचे अकाउंट व खाजगी माहिती चोरी करणे यासारखे गंभीर प्रकार घडण्याची व्यक्त केली जात असलेली भीती, यावरून स्थानिक नागरिकांत पसरलेली भीती व स्थानिक प्रशासनाविरोधात पसरलेला असंतोष, यामुळे सदर निविदा रद्द करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानातर्गत पिंपरी चिंचवड शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत ऑप्टीकल फायबर नेटवर्क हा प्रकल्प राबविण्यात आला असून सदर नेटवर्कचे स्मार्ट सिटी घटकांना परस्परांशी जोडण्यासाठी आणि अद्ययावत व योग्य कृतीसाठी आवश्यक माहितीचा पुरवठा करण्यासाठी महत्त्वपुर्ण भूमिका आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून Integrated command and control centre (ICCC) जोडण्यासाठी ऑप्टीकल फायबर नेटवर्क व पोल्सचे जाळे टाकण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत City Network Infrastructure उद्योगातील दूरसंचार विषय तज्ञ / जानकार यांचे दिनांक १० मे, २०२२ रोजी नामांकन करुन त्याच्या मार्गदर्शनानुसार रेव्हेन्यू शेअरिंग मॉडेल तयार करण्यात आले आहे. रेव्हेन्यू शेअरिंग मॉडेल कामाची निविदा दिनांक ०५ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिध्द केली होती, तद्नंतर सदर निविदेस चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. प्रकल्पाची तांत्रिक

निविदा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ उघडण्यात आली. त्यामध्ये मे. रेलटेल कॉपोरेशन ऑफ इंडिया लि., मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. व मे. UCN केबल नेटकर्व प्रा.लि. या निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाधारकांकडून त्यांना कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्था किंवा कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी काळ्या यादीत समावेश नसल्याबाबत अथवा निविदेमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध नसल्याबाबत हमीपत्र घेण्यात आलेले आहे. तांत्रिक छाननीमध्ये तिनही निविदा पात्र ठरल्यामुळे त्यांचे आर्थिक बोलीचे देकार दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी उघडण्यात आले.त्यानुसार मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. In consortium with फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा.लि. या निविदा धारक कंपनीने किमान आश्वासित वार्षिक महसूलाच्या १०८ टक्के म्हणजेच रु.३२.४ कोटी व अतिरिक्त उत्पन्नाच्या २१ टक्के महसूल स्मार्ट सिटीला देणार असल्याने सदर उच्च दराची निविदा पात्र ठरली व सदर निविदा धारक कंपनीस दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या स्मार्ट सिटी संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली आहे.

मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि., मे. UCN केबल नेटवर्क प्रा.लि. यांच्या संदर्भात पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीकडे सदर कंपनीच्या माजी संचालक मंडळाच्या सदस्यांबाबत गुन्हा दाखल असल्याच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तथापि, कंपनीकडून प्राप्त खुलाश्यानुसार माजी कंपनी संचालकांनी त्यांच्या पदाचा राजीनामा सन २०२१ मध्ये दिलेला आहे व पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत राबविण्यात आलेली निविदा दिनांक ०५ ऑगस्ट, २०२२ रोजीची आहे. अशाप्रकारे कंपनीच्या विद्यमान संचालक मंडळातील कोणत्याही संचालक यांचा पोलीस गुन्ह्यात / एफआयआर मध्ये समावेश नसल्याने सदर ओएफसी नेटवर्क हे गंभीर गुन्हे असलेले व्यक्तींच्या कंपनीकडे सोपविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब सद्यस्थितीत सदर निविदेची कार्यवाही स्थगित अथवा रद्द करण्यासाठी कोणतेही कारण दिसून येत नाही. तसेच, सदर कामाचा कोणताही करारनामा अद्याप करण्यात आलेला नसून याबाबत कोणत्याही प्रकारचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही. तथापि, स्मार्ट सिटी संचालक मंडळाच्या दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने सर्वात जादा दर सादर केलेले मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. In consortium with फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा.लि.यांना Letter of Intent (LoI) दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी देण्यात आलेले आहे. तसेच, उपरोक्त नमूद तक्रारींच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत संबंधित तक्रारदारांना उत्तरे देण्यात आलेली आहेत असे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत कळविण्यात आलेले आहे.

*****

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

ॲड. माणिकराव कोकाटे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

"सिन्नर नगरपरिषदेने पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्ती करीता रु.७२ लक्ष खर्चाला सर्वसाधारण सभेत मान्यता देऊन दिलेली मंजुरी, सदरचा खर्च हा अवास्तव व लोकसंख्येच्या प्रमाणात झालेला नसणे, सदरची योजना ही हायड्रोटेस्टिंग न करता सुरु करुन ठेकेदारास बिल अदा करणे व सदर योजना सुरु करणे, दुरुस्तीसाठी किती खर्च आला ते उघड न करणे ही बाब संशयास्पद असल्याचे निदर्शनास येणे, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी कुठल्याही प्रकारच्या निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता मर्जीतल्या लोकांच्या जमिनी बाजारमूल्य दरापेक्षा अधिक दराने खरेदी करणे, याबरोबरच शहरातील सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करणेकरिता वैशिष्टयपूर्ण निधीतून १.७५ कोटींची मान्यता मिळालेली असताना प्रत्यक्षात कुठलेही काम झालेले नसणे, याउलट नदीपात्रात बाहेरुन माती, मुरुम आणून नदीपात्राची रुंदी कमी करणे, कामाची बिले ही संबधित ठेकेदारास अदा केल्याची बाब समोर येणे, अशाच पध्दतीने दयानंद बारादारी मठ बांधणे हे काम देखील पूर्ण झालेले नसताना ठेकेदारास बिले अदा केलेले असणे, नगरपरिषद हद्दीत सुर्वोदय संकुलाचे इमारतीस पार्किंगची व्यवस्था न करता आर्थिक संगनमत करुन बांधकाम करण्यास परवानगी देणे व पूर्णत्वाचा दाखला देणे, याबाबतची चौकशी होऊन मुख्याधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, वरील सर्व बाबींचे ऑडिट करताना जबाबदारी निश्चित करण्याची गरज, तसेच गैरव्यवहाराची चौकशी करुन संबधितांकडून वसुली होणे गरजेचे असणे, तसेच अतिवृष्टीमुळे शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीला महापूर येऊन नदी काठावर असणाऱ्या झोपडीधारकांची १९५ घरे व दुकानदारांची १८४ दुकाने वाहून जाणे, अतिक्रमित झोपडपट्टीधारक व दुकानदार या सर्वांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे महिला नगरसेविका व कर्मचारी यांचेशी अत्यंत उध्दट व बेजबाबदारपणे बोलणे, या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे व उपमुख्यमंत्र्यांकडे नगरसेविकेंनी प्रत्यक्ष भेटून दिलेली निवेदने, या संदर्भात मुख्याधिकारी यांना तातडीने बडतर्फ करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

सिन्नर नगरपरिषदेकरिता "सिन्नर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (कडवा धरण स्रोत)" दि.११ नोव्हेंबर, २०१९ रोजी एकूण क्षमतेच्या ५० टक्के म्हणजेच ४५० अश्वशक्तीच्या एका पंपाद्वारे प्रकल्प कार्यान्वयीत करण्यात आला. यानंतर सदर योजना उर्वरित क्षमतेच्या पंपाद्वारे दि.०७ जुन, 2021 रोजी

रोटा M/1164 (750-2-23)

कार्यान्वित करण्यात आली. सदर रु.८२.५६ कोटी इतक्या किंमतीची संपुर्ण पाणी पुरवठा योजना SCADA प्रणालीसह दि.०१ ऑक्टोबर, २०२१ पासून पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाली. यापैकी रु.७७.५९ कोटी इतक्या रकमेची देयके कंत्राटदारास अदा केलेली आहेत. नियुक्त कंत्राटदाराने करारातील तरतूदीनुसार १ वर्ष कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित होते. तथापि, सदर अट कंत्राटदारास मान्य नसल्याने याबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. मा. न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत पाणी पुरवठा योजना पुर्ण क्षमतेने सुरु ठेवणे आवश्यक असल्याने, नगरपरिषदेमार्फत देखभाल दुरुस्तीकरीता दि.०१ डिसेंबर, २०२२ पर्यंतचा खर्च अंदाजे रु.४४,५३,६६७/- इतका झाला आहे. सदर खर्च नगरपरिषद सर्वसाधारण सभा व प्रशासक, सिन्नर नगरपरिषद यांच्या मान्यतेने करण्यात आला आहे.

सिन्नर नगरपरिषदेद्वारे नियुक्त प्रकल्प सल्लागार डी.आर.ए., नागपूर व त्रयस्थ संस्था अमृत वाहीनी तंत्रनिकेतन यांनी प्रमाणीत केलेल्या अहवालाप्रमाणे संपुर्ण ऊर्ध्व वाहिनी व गुरुत्व वाहिनी (Rising Main DI K9/MS, Gravity Main DI K7) या मुख्य जल वाहिन्यांची तसेच वितरण प्रणाली मधील २५ कि.मी वितरण वाहिन्यांची जलदाब चाचणी सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत दि.२५ जानेवारी, २०२० ते दि. १० फेब्रुवारी, २०२० या कालावधीत करण्यात आली व यानुसार देय होणाऱ्या तसेच त्रयस्थ परिक्षण संस्था, तसेच प्रकल्प सल्लागार यांनी प्रमाणीत केल्यानुसार त्या प्रमाणात देयकाची अदायगी कंत्राटदारास करण्यात आली. वितरण प्रणालीमधील ज्या ४२ कि.मी. वितरण वाहिन्यांची जलदाब चाचणी घेण्यात आलेली नाही. अशा वितरण वाहिन्यांच्या जलदाब चाचणीची रक्कम ठेकेदारास नगरपरिषदेने अदा केलेली नाही.

सिन्नर नगरपरिषदेने सिन्नर येथील गट नं. १६७/१ ते ५/४ क्षेत्र १ हे. २२ आर. + पो.ख. ०० हे. २३ आर. असे एकूण क्षेत्र १ हे. ४५. आर. या मिळकती घनकचरा व मैला व्यवस्थापन प्रकल्पासाठी नगरपरिषद विशेष सभा ठराव क्र. २८१, दि. ०७ नोव्हेंबर, २०१७ अन्वये तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांचे दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजीचे आदेश विचारात घेऊन नोंदणीकृत दस्त क्र. ३९३८/२०१७, दि. १४ डिसेंबर, २०१७ अन्वये खरेदी केली आहे. नगरपरिषदेने शासकीय दराने जमीन खरेदी केल्याने नगरपरिषदेस आर्थिक फायदा होवून मोठीबचत झालेली आहे.

सिन्नर नगरपरीषदेमार्फत सरस्वती नदी सौंदर्यीकरण व विकास करण्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१.४७ कोटी इतकी होती. सदर काम ई-निविदा प्रकिया अवलंबून न्युनतम निविदाकारामार्फत पुर्ण केले आहे. सदर काम करतांना नदीपात्रात बाहेरुन माती, मुरुम आणुन टाकण्यात आलेला नसून, नदी प्रवाहित राहण्यासाठी आवश्यक कामे करण्यात आली.

सिन्नर नगरपरीषदेमार्फत दयानंद बारादारी मठ येथे दशक्रिया विधीकरिता शेड, एक स्लॅबची खोली व सरक्षण भिंत बांधण्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.३४.८० लाख इतकी होती. सदर कामाची ई-निविदा काढून न्युनतम दरधारकाकडून पुर्ण केले आहे. प्रत्यक्षात झालेल्या कामाचे रु.२८.१४ लाखाचे अंतिम देयक ठेकेदारास अदा करण्यात आले आहे.

सुर्योदय संकुल इमारतीच्या बांधकाम करण्यास नगरपरिषदेने दि.३१ जुलै, १९९७ रोजी बांधकाम परवानगी व दि.१४ जुलै, २००५ रोजी वाढीव बांधकामाकरिता सुधारीत बांधकाम परवानगी दिली. या बांधकाम परवानगीमध्ये तत्कालीन प्रचलीत बांधकाम नियमावलीमध्ये रहिवास व वाणिज्य अशा मिश्र स्वरुपाच्या इमारतीसंदर्भात, इमारतीच्या चारही बाजुला नियमानुसार सामासिक अंतर सोडता उर्वरीत जागा पार्कींग करिता वापरता येईल अशी तरतूद होती. सदर इमारत बांधकामामध्ये चारही बाजूस नियमानुसार असलेल्या सामासिक अंतरापेक्षा जास्तीचे अंतर सोडण्यात आले आहे. सदर इमारतीच्या चारही बाजूस सोडण्यात आलेली जास्तीची जागा पार्कींगकरिता पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. सदर इमारतीची बांधकाम परवानगी व पुर्णत्वाचे दाखले नियमानुसार दिलेले आहेत.

जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि. ०१ सप्टेंबर, २०२२ रोजी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या घरांचे व दुकानांचे दि.०२ व ०३ सप्टेंबर, २०२२ रोजी पंचनामे करुन घेऊन, नुकसान भरपाई मिळण्याबाबतचा प्रस्ताव दि.०५ सप्टेंबर, २०२ रोजी महसूल व वन विभागाकडे पाठविली. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.११ ऑगस्ट, २०२१ नुसार, जी घरे व दुकाने अनधिकृत आहेत, त्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय करण्यात आलेली नाही. तसेच सिन्नर शहरात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेली दुकाने, घरे व झोपड्या यापैकी जी नियमित व अधिकृत होती, अशा ७ दुकानांना प्रत्येकी रु.५० हजार प्रमाणे रु.३.५० लाख व १९५ घरांकरीता प्रत्येकी रु.१० हजार प्रमाणे रु.१९.५० लाख असा एकूण रु.२३.५० लाख इतका निधी बाधित व्यक्तींना वितरित करण्यात आला आहे.

सिन्नर नगरपरिषदेच्या महिला सदस्य व कर्मचाऱ्यांना अनुचित वागणूक दिल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि.२५ नोव्हेंबर, २०२० रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, शासनाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना चौकशी करुन अभिप्राय सादर करण्याबाबत सूचित केले. यानुसार उपविभागीय अधिकारी, निफाड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार आरोप मोघम स्वरुपाचे असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे व त्यास जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सहमती दर्शविली आहे.

* * * * * * *

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक – ५१७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**

**श्रीमती गीता जैन, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ५१७ पुढीलप्रमाणे आहे –**

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम येथील उत्तन, चौक, तारोडी, पाली तसेच भाईंदर पूर्व येथील नवघर गाव हि गावे समुद्र तसेच खाडी किनारी वसलेली असणे, सदरचा भाग सागरी क्षेत्र नियंत्रणात येत असणे, सदर अनेक गावातील रहिवाशी मासेमारी करून स्वत:ची तसेच स्वत:च्या कुटुंबाची उपजीविका करणे, पंरतु देशाला स्वतंत्र मिळून ७५ होऊनही सदर गावांना अजूनही वीज पुरवठा करण्यात न येणे, या संदर्भात तेथील लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वारंवार तक्रारी करून सुद्धा शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

**<u>मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन</u>**

मिरा – भाईंदर महानगरपालिका शहर मुंबई महानगरपालिकेलगत वसलेले असून मिरा – भाईंदर शहरांचे झपाट्याने नागरीकरण झाल्याने शहराची लोकसंख्या वेगाने वाढलेली आहे. मिरा – भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन, चौक, तारोडी, पाली, नवघर ही गावे सागरी किना-यावर वसलेली आहेत.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक ०६/०१/२०११ रोजी सागरी किनारी क्षेत्रामधील विकास कामांचे नियमन व सागरी पर्यावरणाचे संवर्धन / संरक्षण प्रयोजनार्थ सीआरझेड अधिसूचना, २०११ निर्गमित करण्यात आली होती. तद्नंतर केंद्र शासनाने दिनांक १८/०१/२०१९ रोजी नवीन सीआरझेड अधिसूचना, २०१९ निर्गमित केली आहे. सीआरझेड अधिसूचना, २०११ व सीआरझेड अधिसूचना,

२०१९ अंतर्गत, सीआरझेड-३ क्षेत्रात "Electric Substation" हे महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण च्या पूर्व परवानगीने अनुज्ञेय आहे. सदर अधिसूचनांमध्ये घरगुती वीज जोडणीसाठी तरतुदींचा उल्लेख आढळून येत नाही. सबब, महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाचे दिनांक १४/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये, अदानी पॉवर व टाटा पॉवर कंपन्यांना, घरगुती वीज जोडणीसाठी सीआरझेड-२ व सीआरझेड-३ क्षेत्राअंतर्गत महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची पूर्व परवानगी आवश्यक नसल्याचे कळविले आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या, जनहित याचिका ८७/२००६ मधील दिनांक १७/०९/२०१८ रोजीच्या आदेशान्वये, कांदळवन व त्याचे ५० मीटर मधील बफर क्षेत्रात बांधकाम अनुज्ञेय नाही. तथापि, जनहितास्तव प्रकल्पांना बांधकामासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाची पुर्वानुमती घेणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

*******

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

लक्षवेधी सूचना क्र.६२५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ६२५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पर्यावरण पूरक, स्वच्छ सुंदर आणि पर्यटकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या भारतातील "ब्लू फॉग" प्रमाणपत्रासाठी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाने १३ निवड केलेल्या सर्वोत्कृष्ट समुद्रकिनाऱ्यांमध्ये जि.सिंधुदूर्ग ता.वेंगुर्ले मधील भोगवे समुद्र किनाऱ्याचा समावेश होऊनही त्याबाबत "ब्लु फॉग" प्रमाणपत्र आले नसल्याचा प्रकार दि.१२.११.२०२२ रोजी निदर्शनास येणे, देशातील सर्वोत्कृष्ट १३ समुद्र किनाऱ्यामध्ये महाराष्ट्राचा एकाही समुद्र किनाऱ्याचे नांव नसल्याने ब्लु फॉग प्रमाणपत्र प्राप्त न होणे, त्यातच पात्रतेसाठी असलेल्या ३३ निकषांमध्ये अनेक निकष हे जाचक असून स्थानिक मच्छिमारांना विश्वासात घेऊन पात्रताबाबतच्या निकषामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकार बरोबर पाठपुरावा करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील विशेषत: कोकण सागर किनारपट्टीतील ग्रामस्थजनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया :

---

## मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे निवेदन

केंद्र शासनाने देशातील निवडक समुद्रकिना-यांना "ब्लु फ्लॅग" प्रमाणित करण्यासाठी महत्वाकांक्षी योजना हाती घेतली असून त्याअंतर्गत पर्यावरणीय शिक्षण, पर्यावरणीय व्यवस्थापन, स्नानासाठी पाण्याची गुणवत्ता तसेच सुरक्षा व सेवा या गुणवत्तेच्या निकषांची पूर्तता करणा-या समुद्र किना-यांना पर्यावरणीय (Eco-label) प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

"ब्लु फ्लॅग " प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता "ब्लु फ्लॅग " नामांकनासाठी सादर करण्यात येणा-या प्रस्तावांमध्ये पुढील पंधरा (१५) बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामध्ये समुद्र किना-याकडे पायी अथवा चार चाकी वाहनाने जाण्यासाठी रस्ता असणे आवश्यक आहे, समुद्र किनारी कुठलाही अडथळया शिवाय मोकळी जागा असणे आवश्यक आहे, सदर समुद्र किना-याजवळ किमान ६० ते ७० चारचाकी वाहनांसाठी पार्किंग जागा आवश्यक आहे, समुद्र किना-याजवळ पाणीपुरवठयाची सोय असणे आवश्यक आहे, समुद्र किनारी वीज पुरवठयाची सोय असणे आवश्यक आहे, समुद्र किनारी औदयोगिक किंवा अन्य सांडपाणी सोडलेले असू नये, समुद्र किनारा उघडयावर शौचमुक्त असणे आवश्यक आहे, समुद्र किनारी अनधिकृत झोपडपटटी अथवा कचरा टाकण्याची जागा असू नये, समुद्र किना-याजवळ कुठलीही भटकी जनावरे असू नये, समुद्र स्नान करण्याच्या पाण्याची रासायनिक व जैविक गुणवत्ता ही

विहित केलेल्या निकषांमध्ये बसणारी असावी, तेल किंवा घातक पदार्थ समुद्रामध्ये पसरल्यास आवश्यक असणा-या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे. समुद्र किना-याजवळ अधिकृत घनकचरा व्यवस्थापन जागा असणे आवश्यक आहे. ब्ल्यू फ्लॅग नामांकन समुद्र किना-याची लांबी ही किमान ५०० मीटर ते १ किलोमीटर असणे आवश्यक आहे. समुद्र किनारी भरती रेषा व ओहोटी रेषा या मधील अंतर हे किमान ३० ते ४० मीटर रुंद असणे आवश्यक आहे. समुद्र किनारी सुरक्षित पोहोण्याचे क्षेत्र असावे व सदर क्षेत्र हे जलक्रिडामुक्त असावे इ. बाबींचा समावेश आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग मानांकनासाठी ग्रा. पं. भोगवे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग येथील समुद्रकिना-याची निवड करण्यात आलेली होती. त्यानुसार ग्रामपंचायत भोगवे, ता. वेंगुर्ला हद्दीत समुद्रकिनारी प्रकल्पाच्या प्रमुख निकषापैकी एक निकष असणा-या २ हेक्टर शासकीय मालकीची जमिन उपलब्ध नसल्याने खाजगी मालकीच्या जमिनीवर सदर प्रकल्प उभारण्यासाठी जमिन मालकासोबत करारनामा करण्यात येऊन सदर प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले होते. सदर प्रकल्पामध्ये पायाभूत सोयी सुविधा व इतर अत्यावश्यक सेवा पुरविण्याकरिता ब्ल्यू फ्लॅग प्रकल्प नोडल अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी मे. युरेका फोर्ब्ज लि. मुंबई यांना ०२ वर्षांसाठी नियुक्त केले होते. दरम्यान सदर खाजगी जमिनीच्या मालकीविषयक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने प्रकल्पाचे काम थांबविण्यात आले होते.

तद्नंतर ग्रामपंचायत भोगवे, ता. वेंगुर्ला हद्दीतील समुद्रकिनारी असलेल्या दुस-या जमिन मालकाशी प्रकल्पासंबंधित ०५ वर्षे मुदतीचा करारनामा करण्यात आला होता. परंतु, अभियान प्रमुख यांच्याकडून सदर प्रकल्पासाठी कमीतकमी १५ वर्षाचा करारनामा असणे आवश्यक असल्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि १५ वर्षाचा करारनामा करण्याबाबत संबंधित जमिन मालक तयार नसल्याने सदर जागेचा प्रस्ताव रद्द करण्यात आला होता. ब्ल्यू फ्लॅग प्रकल्पास आवश्यक जागाअभावी सुरु होऊ न शकल्याने जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून पुन्हा दि. २७.०७.२०२० व दि. २३.१०.२०२० अन्वये ग्रामपंचायत भोगवे यांना सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीचे नोंदणीकृत दस्तऐवज सादर करण्याबाबत कळविले होते. तथापि, भोगवे समुद्रकिनारी शासकीय जमिनी उपलब्ध नसल्याने व खाजगी जमिनधारकाशी वाटाघाटी करून पोहोच रस्ता उपलब्ध असलेली जमिन उपलब्ध करण्याच्या प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने ब्ल्यू फ्लॅग प्रकल्प सुरु करण्यास विलंब होत आहे.

*****

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक - १७७७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. विनोद निकोले, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १७७७ पुढीलप्रमाणे आहे -

"राज्यात पालघर जिल्ह्यात तारापूर एम.आय.डी.सी. मधील बजाज हेल्थ केअर कंपनीतील रासायनिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे चोरीछुपे बाहेरील गटारात सोडण्याच्या प्रकार माहे, डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच याच बजाज हेल्थ केअर या कंपनीच्या प्लॉट क्र. टी ३० आणि प्लॉट क्र. एन २१९ वरील दोन प्लांटमध्ये कंपनीतील घातक रासायनिक सांडपाणी हे कोणतीही प्रक्रिया न करताच चोरी छुपे भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे बाहेरील गटारात सोडण्याचा गोरखधंदा गेली अनेक वर्षे बिनबोभाट पणे सुरु असणे, गटारात सोडण्यात येणारे हे घातक सांडपाणी पुढे नाल्यावाटे समुद्राच्या खाडीला जाऊन मिळत असल्याने या परिसरातील जल प्रदूषणाचा स्तर उंचावला असणे, या परिसरातील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत तारापूर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी या भागातील कारखान्यांची तपासणी मोहीम हाती घेणे, परंतु, कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, दि. ०६ डिसेंबर रोजी प्लॉट क्र. टी ३० वरील बजाज हेल्थ केअर या कंपनीचे घातक रासायनिक सांडपाणी गटाराच्या चेंबरच्या खालून पाईपलाईनद्वारे सोडण्यात यत असल्याचे उघडकीस येत, या प्रकरणी दोन्ही प्लांट मधील सांडपाण्याचे नमुने गोळा करण्यात आलेले असणे, राष्ट्रीय हरित लवादाने उक्त कंपनीवर प्रदूषणास जबाबदार धरत दंड ठोठावला असणे, त्या नंतर दुसऱ्या दिवशी दि. ०७ डिसेंबर रोजी पुन्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्लॉट क्र. एन २१९ वरील याच बजाज हेल्थ केअर कंपनीच्या दुसऱ्या प्लांटची तपासणी केली असता कंपनीच्या आतून भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे घातक रासायनिक सांडपाणी विना प्रक्रिया बाहेरील गटारात सोडत असल्याचे उघडकीस आलेले असणे, त्यामुळे आजूबाजूच्या शेतकरी - बागायतदार यांच्या शेतजमिनी, विहिरी - कूपनलिका या सारख्या पिण्याचे पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झालेले असणे, त्याच प्रमाणे मत्स्य उत्पादन देखील कमालीची घट होत असणे, तसेच स्थानिक आजूबाजूच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

मे. बजाज हेल्थकेअर लि., (मे.न्युट्राप्लस इंडिया लि)., प्लॉट क्र. टी-३० हा औषधनिर्मिती प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर, ता. व जि. पालघर येथे कार्यरत असून याकरिता सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे. या कारखान्यातून १० घन मिटर प्रतिदिन औद्योगीक सांडपाणी निर्माण होत असून संमतीपत्रामध्ये नमूद केल्यानूसार उद्योगास शुन्य

विर्सग (ZLD) करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १५.११.२०२२ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान उद्योगाकडून सेट्रीफ्युज या यंत्रणेच्या परिसरामध्ये औद्योगिक सांडपाणी सोडून ते बाहेरील पावसाळी पाण्याचे गटारामध्ये मिसळत असल्याचे तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच कंपनीबाहेर पावसाळी पाणी वाहून नेण्यासाठी असलेल्या गटारामध्ये अल्प प्रमाणात औद्योगिक सांडपाणी साचल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सदर गटारीमधील सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेच्या बाहेर असल्याचेही निदर्शनास आले होते. त्यामुळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि. ०१/१२/२०२२ रोजी सदर उद्योगास कारखाना बंद का करण्यात येऊ नये? अशा आशयाची नोटीस बजावण्यात येऊन त्यासंबंधी वैयक्तीक सुनावणी दिनांक १२/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतू उद्योग प्रतिनिधींच्या विनंतीनूसार वैयक्तीक सुनावणी दि. २६/१२/२०२२ रोजी आयोजीत करण्यात आली आहे.

मे. बजाज हेल्थकेअर प्रा. लि. प्लॉट क्र. एन-२१९ म. औ. वि. म. तारापूर, हा उद्योग सदर ठिकाणी उद्योगा मार्फत कच्च्या मालाची साठवणूक, पावडरचे पुनःश्च पॅकींग केले जाते. व प्लॉट क्र. एन-२१६/२१७ या ठिकाणच्या उद्योगांमधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करणेकरीता सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. या कारखान्यातून ४.८ घन मिटर प्रतिदनि औद्योगीक सांडपाणी निर्माण होते. यासाठी संमतीपत्रामध्ये प्रक्रियायुक्त सांडपाणी CETP कडे पुनर्प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी टँकरद्वारे पाठविण्यात येते. सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगाच्या दिनांक ०७/१२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान उद्योगांमधून निर्माण होणारे सांडपाणी भूमिगत बंदीस्त पाईप लाईनद्वारे उद्योगामध्ये असलेल्या सांडपाणीप्रक्रिया यंत्रणेच्या बाजूने बाहेरील आवारापर्यंत सोडत असल्याचे निदर्शनास आले होते. मे. बजाज हेल्थकेअर प्रा.लि. या उद्योगास छुप्या पद्धतीने असलेल्या पाईप लाईनची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२/१२/२०२२ रोजी कारखाना का बंद करण्यात येऊ नये? अशा आशयाची नोटीस बजावण्यात आली असून त्यासंबंधी कारखान्याची वैयक्तीक सुनावणी दिनांक ०९/०१/२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पालघर जिल्हयातील बोईसर - तारापूर औद्योगिक क्षेत्रात ग्रामीण रुग्णालय बोईसर तसेच प्रा.आ.केंद्र दांडी, मुरबे, तारापुर हया आरोग्य संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थांमध्ये बाहयरुग्ण व आंतररुग्ण विभागात आलेल्या रुग्णांमध्ये जलजन्य आजार असलेल्या रुग्ण संख्येत वाढ झालेली आढळुन आलेली नाही व माहे एप्रिल २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत प्राथमीक आरोग्य केंद्र मुंरबे परिसरातील ६० पाणी नमुने , प्राथमीक आरोग्य केंद्र दांडी परिसरातील २९ पाणी नमुने तसेच प्राथमीक आरोग्य केंद्र तारापुर परिसरातील ९४ पाणी नमुने असे एकूण १८३ पाणी नमुन्याचा जैविक तपासणी करण्यात आली असुन प्रा.आ.केंद्र मुंरबे अंतर्गत मोरपाडा विहिर येथील १ पाणी नमुना दुषित आढळुन आला आहे. त्यानूसार सदर पाणी साठयाचे पाणी शुध्दीकरण करुन सदर पाणी साठयाचा पाणी नमुना पुनर्तपासणी साठी पाठविण्यात आला आहे. तालुका कृषी अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार मे. बजाज हेल्थकेअर कंपनीमधून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील पिकांचे नुकसान झाल्याबाबत कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याबाबत कळविले आहे.

-----२-----

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन.

श्री.छगन भुजबळ, श्री.अजित पवार, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.जयंत पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना-

"जलसंधारण विभागाची कामे, नागरी स्थानिक स्वराज संस्थांच्या परिक्षेत्रातील अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे, प्रादेशिक पर्यटक विकासाची कामे, ग्रामीण भागातील मुलभूत सुविधांची २५१५ ची कामे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ते व पुलांची कामे या ग्रामीण व नागरी भागातील नागरीकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक असलेल्या कामांची स्थगिती रद्द करुन ही कामे सुरु करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २९ सप्टेंबर २०२२, दिनांक २१ सप्टेंबर २०२२, दिनांक १९ सप्टेंबर २०२२, दिनांक २० ऑगस्ट २०२२ व दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनान्वये मागणी केलेली असणे, राज्य शासनाने मुख्य सचिवांचे पत्र दिनांक १८ जुलै २०२२ अन्वये विकासाची कामे स्थगित करण्याचा तुघलकी निर्णय घेतलेला असणे, २५१५ ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे ही कामे तर दिनांक २ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रान्वये रद्द करण्यात येणे, वास्तविक विकासात्मक दृष्टीकोन ठेवून संबंधित लोकप्रतिनिधींच्या मागणी नुसार त्या-त्या जिल्ह्यात विकासकामांना मंजूरी दिलेली असणे, त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करुन निधी वितरीत करण्यासाठी मा.सभागृहाची सुध्दा मान्यता घेतलेली असून निधी वितरीत केलेला असणे, नवीन सरकारने मात्र या सभागृहाचा अवमान करुन सरसकट सर्व विकास कामे रद्द करुन त्याचा निधी थांबविलेला असणे, अल्पसंख्यांक, आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या त्या त्या घटकांसाठीच्या योजना यांचाही निधी रोखलेला असणे, विकसनशील व नव्याने निर्मिती झालेल्या नगरपंचायती तसेच नगरपरिषदा व नगरपालिका यांचाही विकास कामांचा निधी मोठ्या प्रमाणात रद्द केल्याने त्याचा विपरीत परिणाम या शहरांच्या विकास कामावर झालेला असणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचे पत्र दिनांक १४/१०/२०२२ काही ठराविक कामांवरील स्थगिती उठविलेली असणे, त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभाग, प्रादेशिक पर्यटन विभाग इ. विभागांनी ठराविक कामांवरील स्थगिती उठवलेली असणे, सरसकट सर्व कामांवरील स्थगिती उठविण्याची लोकप्रतिनिधींची मागणी असणे, तत्कालिन सरकारने मंजूर केलेल्या या विकास कामांचा निधी रद्द करुन नव्या सरकारने राजकीय दृष्टीकोन समोर ठेवून काही विशिष्ट लोकप्रतिनिधींना सदरचा निधी मोठया प्रमाणात पुनर्वाटप करणे, यामुळे इतर लोकप्रतिनिधींमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, नवीन सरकारच्या कार्यपध्दतीविषयी निर्माण झालेले संतापाचे वातावरण, लोकप्रतिनिधींच्या विधीमंडळातील सदस्य म्हणून हक्काची होत असलेली पायमल्ली, याविषयी सभागृहातील लोकप्रतिनिधींच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

*********

रोटा/एब-०००१[७५०-४-२०२३]-१

D:\Narendra\DS Dhuri\लक्षवेधी सूचना- २०.२.२३.docx

मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे निवेदन-

ग्रामीण भागातील मुलभूत सुविधांची लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत समाविष्ट कामे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ते व पुलांची कामे या ग्रामीण व नागरी भागातील नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक असलेल्या कामांची स्थगिती उठविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे विविध निवेदनान्वये मागणी केली आहे. जून-जुलै, २०२२ मध्ये शासनस्तरावर झालेल्या बदलाच्या पार्श्वभूमीवर विविध विभागातंर्गत योजनांच्या निधीतून पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या परंतु निविदा काढण्यात आलेल्या नाहीत तसेच ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत, अशा कामांचे पुनर्विलोकन करण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी स्तरावर मान्यता घेऊन स्थगिती देण्यात आली होती. त्यानुसार ग्राम विकास विभागाकडील लेखाशिर्ष २५१५ १२३८ या योजनेतंर्गत अशा सर्व कामांना दि.१९.०७.२०२२ व २५.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आलेली होती. सदर स्थगित केलेली कामे, शासन मान्यतेने दि.१२.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहेत. त्यानंतर सदर दि.१२.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील रद्द केलेल्या कामांच्या यादीतून दि.१८.११.२०२२, दि.३०.११.२०२२, दि.१५.१२.२०२२, दि.३०.१२.२०२२, दि.२५.०१.२०२३ व दि.३१.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही कामे वगळण्यात आलेली आहे. तसेच या प्रकरणी मा. न्यायालयात एकूण ६ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने ग्रामविकास विभागाच्या आदेशास अंतरिम स्थगिती आदेश दिला असून सदर याचिका संदर्भात अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. या अनुषंगाने स्थगिती/रद्द यादीतून कामे वगळण्याचे प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत. जलसंधारण विभागामध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.९४३८/२०२२ दाखल केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.२३.०७.२०२२ च्या पत्रान्वये विभागाच्या अखत्यारीतील रस्ते उपक्षेत्रांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, रेल्वे उड्डाणपूल व इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती घटकांतर्गत तसेच रस्ते परिरक्षण दुरुस्ती मधील विशेष दुरुस्ती व पूरहानी दुरुस्तीची दि.०१.०४.२०२१ पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली आहे. सदर कामांचे पुनर्विलोकन करण्याच्या अनुषंगाने या कामांना शासन स्तरावरुन दि.२३.०७.२०२२ च्या पत्राद्वारे देण्यात आलेली स्थगिती ही तात्पुरत्या स्वरुपातील असून भविष्यात हाती घेतलेल्या/घ्यावयाच्या कामांचे शासन स्तरावर पुनर्विलोकन करण्याकरीता दिलेली आहे. सदर कामांचे पुनर्विलोकन करुन रस्त्यांच्या कामांवरील स्थगिती टप्प्याटप्प्याने उठविण्यात येत आहे. तसेच शासन पत्र क्र .आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४(भाग-१३)/रस्ते-१, दि.११.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या नवीन पुल, पुल पुनर्बांधणी, पुलाची दुरस्ती, पुल जोड रस्ते (बांधणे/दुरुस्त करणे), घाटरस्ते सुधारणा, रेल्वे उड्डाणपूल या कामांवरील स्थगिती उठविण्यात आली

आहे. तसेच शासन पत्र क्र. बीडीजी२०२२/प्र.क्र.३३३/इमा-३, दि.११.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीततील इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती, तसेच सा.बां. विभागाव्यतिरिक्त अन्य सर्व प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील सा.बां. विभागामार्फत कार्यान्वित/बांधकाम होणाऱ्या राज्यातील विविध शासकीय निवासी व अनिवासी इमारतींची कामे आणि समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे या कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित कामांना देण्यात आलेल्या स्थगितीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठे येथे Writ Petition क्र. ९४२१/२०२२, ९४२२/२०२२, ९४३८/२०२२, ९३८३/२०२२, ११०११/२०२२, ११००६/२०२२, १३०८९/२०२२, ३१७४०/२०२२, १४८/२०२३ दाखल करण्यात आलेल्या आहेत.

नगर विकास विभागाने विविध योजनेंतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत निधीच्या अनुषंगाने ज्या प्रकरणी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, अशा प्रकरणी विविध योजनांवरील कामांना तात्पुरती स्थगिती दिलेली आहे. सदर स्थगितीमधून काही कामांवरील स्थगिती उठविण्यात आली असून उर्वरित कामांच्या स्थगिती बाबत कार्यवाही सुरु आहे.

नियोजन विभागांतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांना नियोजन विभागाच्या दि. ४ जुलै, २०२२ परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली होती. तथापि, सर्व जिल्ह्यांसाठी पालकमंत्री महोदयांच्या नियुक्त्या झाल्यानंतर नियोजन विभागाच्या दि. २७ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रान्वये सदर स्थगिती उठविण्यात आली आहे.

*********

श्री. राजेश पवार , वि.स.स. यांची म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ७८७

---

**राज्यातील सर्व सामान्य नागरिकांना प्रशासकीय पातळीवर प्रचंड त्रास होणे, लाचेची मागणी होणे, कामास विलंब होणे, सरकारी योजनांची उद्दिष्टांप्रमाणे अंमलबजावणी न होणे, याकरिता लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ सेवा हमी कायदा शासनाने अंमलात आणला असतानाही तसेच आता लोकसेवा हक्क अधिनियमामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी सेवेचा समावेश करण्यात येणे, त्यामुळे जात पडताळणी प्रमापणपत्र वेळेत देण्यात कसूर करणा-या अधिका-याला ५०० ते ५ हजार रुपयांपर्यन्त दंड आकाराला जाणार असल्याचे नुकतेच पत्रक काढण्यात येणे, असे असतानाही या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीची कारवाई होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे शासनाच्या गतिमान, गरीबांसाठी असलेल्या शासनाच्या धोरणास तडा जाणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व सतापाचे वातावरण, शासनाने या संदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.**

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला. सदर अधिनियम दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ नुसार या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणास बंधनकारक आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या तरतूदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ सदर अधिनियमामधील कलम १३ मधील तरतूदीनुसार दिनांक ३० जुलै, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" गठीत करण्यात आलेला आहे. सदर आयोगामध्ये एक राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, मुंबई आणि प्रत्येक महसुली विभागासाठी (कोकण/नाशिक/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद) एक (एकूण सहा) राज्य सेवा हक्क आयुक्त यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवा जनतेस विहीत कालमर्यादेत पुरविण्यात आल्या नाहीत तर , सदर अधिनियमाच्या तरतूदीमध्ये सेवा प्राप्त होण्यास होणा-या विलंबाबाबत प्रथम अपिल प्राधिका-याकडे प्रथम अपिल, द्वितीय अपिल प्राधिका-यांकडे द्वितीय अपिल तसेच राज्य सेवा हक्क आयुक्तांकडे तृत्तीय अपिल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम-१० अन्वये संबंधित अपिल प्राधिकारी हे सेवा देण्यास कसूर करणा-या पदनिर्देशित अधिका-यांवर प्रकरणी रुपये ५००/- ते ५०००/- पर्यन्तची शास्ती लागू शकतात. तसेच संबंधित पदनिर्देशित अधिका-यांने लोकसेवा देण्यामध्ये वारंवार केलेल्या कसूरी बद्दल अथवा वारंवार केलेल्या विलंबाबद्दल अपिलीय प्राधिका-यांच्या निदेशांचे अनुपालन करण्यास वारंवार केलेल्या कसूरीबद्दल सदर अधिका-यांविरुध्द वर्तणूक व शिस्तभंग विषयक नियमानुसार समुचित अशी शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करु शकतात.

महाराष्ट्र शासनाचे जात प्रमाणपत्र पडताळणीच्या सुधारीत अधिनियम महाराष्ट्र अनुसूचित जात, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन), अधिनियम,२००० तरतूदीनुसार महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी संवर्गाच्या अधिका-यांमार्फत जात प्रमाणपत्र दिले जाते या जात प्रमाणपत्राची पडताळणी करीता जिल्हा समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. अर्जदाराकडून अथवा शासनाच्या विभागाकडून प्राप्त होणारे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्राप्त होत असतात.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्याकडे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे समन्वयन व संनियंत्रण सोपविण्यात आले आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे ऑगस्ट,२०२० पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारले जातात. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर अर्जदारास अर्ज व अर्जाची प्रत व जातीचे दाव्याचे कागदपत्रे संबंधित समितीकडे सादर केल्यानंतर संबंधित अर्जदारास पोहच देण्यात येते. अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रकरणाची छाननी करुन सगळे कागदपत्रे योग्य असल्यास समिती एकमताने प्रकरणी वैध ठरवून अर्जदारास वैधता प्रमाणपत्र डिजीटल स्वाक्षरीच्या माध्यमातून अर्जदाराने नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविण्यात येते. ही प्रक्रिया नियमानुसार ९० दिवसात पूर्ण करणे बंधनकारक आहे. समितीकडे प्राप्त जाती दाव्यातील जातीचे पुरावे स्पष्ट नसल्यास अथवा त्रुटी असल्यास समिती अर्जदारास त्रुटी पूर्तता करण्यासाठी व समितीसमोर आपली बाजू मांडण्यासाठी बोलविते, त्यानंतर प्रकरणातील जाती दाव्याची वैधतेबाबत ६० दिवसात निर्णय देते. महाराष्ट्र अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणेच विनियमन) अधिनियम,२०१२ नुसार नियम १८ मधील तरतूदीनुसार अपवादात्मक परिस्थितीत दोन महिन्याचा जास्तीचा कालावधी असेल, तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये कालावधीची अट लागू राहणार नाही, अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कायद्यांतर्गत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव हे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सेवा पुरवणारे अधिकारी म्हणून घोषित केले आहेत व उपायुक्त तथा सदस्य हे प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी हे द्वितीय अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील, अशी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५३/समन्वय, दि.२४ नोव्हेंबर,२०१५ अन्वये तरतूद आहे. तथापि, जातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे. त्यामुळे अर्जदारांनी जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर त्याला सदर सेवा देण्याबाबतच्या कालावधीची गणना सुरु होते. तसेच याबाबत प्राप्त होणारी अपिले वा तक्रार यांची तात्काळ दखल घेऊन सदर तक्रार निकाली काढण्याच्या सूचना अपिलीय प्राधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच समितीच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी व संबंधितांना वेळेवर प्रमाणपत्र मिळणेसाठी बार्टीतर्फे वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

******************************************

लक्षवेधी सूचना क्र.१६८१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी अधिवेशन)

**मा.डॉ. देवराव होळी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना :-**

"तेलंगाना महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथे गोदावरी नदीवर मेडीगट्टा कालेश्वरम सिंचन प्रकल्प दोन्ही राज्याच्या संयुक्त संमतीने कार्यान्वित असणे, २३ ऑगस्ट २०१६ रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व तेलंगाना चे मुख्यमंत्री मा. के. चंद्रशेखर राव यांच्या स्वाक्षरीने झालेल्या संयुक्त करारनाम्यानुसार ३७८ हेक्टर आर जमिनीचे भूसंपादन करणे अपेक्षित असणे, मात्र अजुनही १७६ हेक्टरचे भुसंपादन करण्यात न येणे, त्यातच ज्या जमिनीचे भूसंपादन मंजुर करण्यात आले त्या मंजूर झालेल्या भुसंपादनाची प्रक्रिया अजून पर्यंत पूर्ण न होणे, जमीनही गेली उत्पादनही गेले, मोबदलाही मिळालेला नाही त्यामुळे आता शिल्लक काहीच राहिलेले परिणामी शेतकरी प्रचंड संकटात सापडलेला असणे, त्यातच या प्रकल्पातून वारंवार पाणी सोडत असल्यामुळे या प्रकल्पाचे पाणी सोडताना निर्माण होणाऱ्या अतीप्रवाहामुळे नडीकुडा, कोत्तुर, चितारवेला, रंगधामपेठा, अंकिसा, यासह अनेक गावातील शेकडो हेक्टर जमीन दरवर्षी वाहत जाऊन त्या जमिनीचे नदीत रुपांतर होणे, त्याचे प्रचंड नुकसान शेतकऱ्यांना होत असून अनेक शेतकरी भूमीहीन झाले तर अनेक शेतकरी भुमीहीन होण्याच्या मार्गावर असणे, याप्रकारे दरवर्षी जमीन नदीमध्ये रुपांतरीत होत असल्याने या नदीकाठावर संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण होणे, त्यामुळे ज्या शेतजमिनी भूसंपादना अंतर्गत मंजूर झालेल्या आहेत त्या शेतजमिनीची तात्काळ भूसंपादन प्रक्रिया करुन हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची आवश्यकता निर्माण होणे, याकरीता मागील अनेक वर्षापासून पीडीत शेतकरी सातत्याने याबाबतच्या मागण्या शासन स्तरावर करुनही अजून पर्यंत त्या मागण्यांचा विचार न करणे, या विरोधात करण्यात येत असलेले उपोषण आंदोलन याची दखल घेऊन शासनाने या मागण्यांची विचार करण्याची आवश्यकता, दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी संयुक्त स्वाक्षरीने केलेल्या करारनाम्यातील बाबींची पूर्तता करण्याची नितांत आवश्यकता असणे, ज्या जमिनीचे भूसंपादन अजून पर्यंत करण्यात आलेले नाही त्या जमिनीचे तातडीने भूसंपादन करून हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची कारवाई सुरू करण्याची आवश्यकता, शासनाने तातडीने करावयाची कारवाई, शासनाची प्रतिक्रिया".

---

**मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

कालेश्वरम सिंचन प्रकल्प हा तेलंगणा राज्यातील एक बहुउद्देशिय उपसा सिंचन प्रकल्प आहे. सदर प्रकल्प हा प्राणहिता नदीच्या संगमाच्या खाली गोदावरी नदीवर तेलंगणा राज्यातील मेडीगड्डा येथे बॅरेज बांधून मेडीगड्डा (लक्ष्मी बॅरेज) आणि श्रीपदा येल्लमपल्ली प्रकल्पादरम्यान अन्नाराम (सरस्वती बॅरेज) आणि सुंडिला (पार्वती बॅरेज) येथे आणखी दोन

बॅरेज बांधून मेडिगड्डा बॅरेज मधून श्रीपदा येल्लमपल्ली प्रकल्पाला १६० टिएमसी पाणी लिफ्टद्वारे पोहोचवून तेलंगणा राज्यातील सुमारे १६ लक्ष एकर क्षेत्रास सिंचन करण्याचे अनुषंगाने बांधण्यात आलेला आहे. महाराष्ट्र व तेलंगणा शासनाच्या कालेश्वरम आंतरराज्यीय प्रकल्प अंतर्गत मेडीगड्डा बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम जुन २०१९ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.

तेलंगणा शासनाकडून मेडीगड्डा बॅरेजचा प्रकल्प अहवाल दिनांक १६.०१.२०१६ ला प्राप्त झाला. मेडीगड्डा बॅरेज प्रकल्पाच्या मुळ प्रकल्प अहवालामध्ये नमुद असलेल्या १०२ मी. पूर्ण संचय पातळीस महाराष्ट्र राज्याने विरोध दर्शविला व पूर्ण संचय पातळी १००.०० मी पर्यंत कमी करण्याबाबत सांगण्यात आले. सदर बॅरजची पुर्ण संचय पातळी १००.०० मी घेण्याबाबत आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाच्या मार्च २०१६ मध्ये झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र व तेलंगणा शासनामध्ये सामंजस्य करार झालेला असुन सदर १००.०० मी. पुर्ण संचय पातळी गृहित धरुन तेलंगणा शासनातर्फे बॅरेजचे बांधकाम करण्यात आले आहे.

सर्वसाधारणपणे नद्यांवर बांधण्यात आलेले बॅरेजचे गेट हे पावसाळा कालावधीत उचलुन ठेवले जाते जेणेकरुन पुराचे पाणी सुलभतेने वाहून जाऊ शकेल. पावसाळा व्यतिरिक्त कालावधीमध्ये बॅरेजचे गेट हे बंद ठेवले जातात. परंतु मेडीगड्डा बॅरेजचे बांधकाम हे प्राणहिता नदीच्या संगमाचे खाली गोदावरी नदीमधुन प्रत्येक दिवशी २ टिएमसी अशाप्रकारे १६० टिएमसी पाणी उचल करण्याचे दृष्टीने बांधण्यात आलेला असून त्यानुसार पाणी उचल करण्यासाठी पावसाळा कालावधीत बॅरेजचे गेट बंद ठेवले जात असल्याने सन २०२० व २०२१ च्या पावसाळा कालावधीत बॅरेजच्या उर्ध्व भागातील अतिवृष्टीमुळे पाण्याचा येवा अचानक वाढत असल्याने बॅरेजचे गेट तातडीने उघडून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. पावसाळा कालावधीत बॅरेजची दरवाजे पूर्णपणे उघडले जात नसल्यामुळे बँक वाटर मुळे बॅरेजच्या वरच्या क्षेत्रातील संपादीत न झालेल्या जमिनी पाण्याखाली येत असल्याने सिरोंचा तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावातील बाधित लोकांमध्ये मेडीगड्डा बॅरेजबाबत प्रचंड नाराजी व जनप्रक्षोभ आहे.

सदर बाब लक्षात घेता या वर्षी सन २०२२ मध्ये मेडीगड्डा प्रकल्प यंत्रणेला पावसाळा कालावधीत बॅरेजचे सर्व गेट उघडलेल्या स्थितीत ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले. या वर्षी सन २०२२ मध्ये पावसाळा कालावधीत बॅरेजचे सर्व गेट उघडलेल्या स्थितीत ठेवण्यात आले असल्याने या पावसाळयात उद्भवलेली पूरस्थिती ही बॅरेजच्या उर्ध्व भागातील प्राणहिता, वैनगंगा, वर्धा व गोदावरी या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली आहे.

मेडीगड्डा बॅरेजमुळे बुडीत क्षेत्र कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या बाजूने ११ किमी. लांबीचा पूर बांध बांधण्यात आला आहे. पुर बांध सोडून इतरत्र बुडीत क्षेत्रात येणाऱ्या जमिनीचे भूसंपादन पुर्ण संचय पातळी १००.०० मी. च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील एकूण १८ गावांतील आवश्यक ३६९.१३ हे. खाजगी जमीनीपैकी २३४.९२ हे. खाजगी जमीन संपादीत करण्यात आलेली असून उर्वरीत १३४.२१ हे. जमीन संपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी (राजस्व) अहेरी, जि. गडचिरोली यांचेमार्फत प्राधान्याने प्रगतीत आहे.

एच-1058

मेडीगड्डा बॅरेजच्या महाराष्ट्राच्या हद्दीतील बुडीत क्षेत्रात येणा-या संपादीत करावयाच्या जमीनीपैकी भूसंपादन शिल्लक असलेल्या जमिनीवर पाणी येत असल्याने पिक नुकसानीच्या तक्रारी होत आहेत. याबाबतची वस्तुस्थिती तपासून भूसंपदानाची पुढील कार्यवाही करणेचे नियोजन आहे.

पावसाळ्यात बॅरेजच्या ऊर्ध्व भागातील मुसळधार पावसामुळे अनपेक्षीतपणे मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक बॅरेजमध्ये येते आणि अशा स्थितीत बॅरेजचे दरवाजे अचानकपणे उघडल्याने मोठ्या प्रमाणात विसर्ग प्रवाहीत होऊन बॅरेजच्या खालील बाजूस असलेल्या नदीकाठच्या शेत जमिनीच्या नुकसानीच्या व सुपीक जमीन खराब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

सिरोंच्या तालुक्यातील काही गावाची खाजगी, शासकीय जमीन बॅरेजमुळे बाधीत होत असल्याबाबत तक्रारी असल्याने बाधीत होत असलेल्या जमिनीचे संयुक्त सर्व्हे करणेबाबत दिनांक ०७/०९/२०२२ रोजी संपन्न झालेल्या आढावा सभेत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिलेल्या निर्देशानुसार बाधीत होत असलेल्या जमिनीचे संयुक्त सर्व्हे करणेकरीता तहसिलदार सिरोंचा यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये उपविभागीय अधिकारी (राजस्व), अहेरी यांचेकडे प्राप्त आक्षेपाच्या अनुषंगाने मेडीगड्डा बॅरेजच्या उपविभागीय अभियंता यांचे समन्वयाने संयुक्त सर्व्हेक्षणाचे काम दिनांक ०७/१०/२०२२ पासून सुरु करण्यात आले. सदर सर्व्हेक्षणाचे काम दिनांक १२/१०/२०२२ रोजी पूर्ण झालेले आहे. सदर सर्व्हेक्षण करतांना मेडीगड्डा बॅरेजच्या पूर्ण संचय पातळी १००.०० मी. अंतर्गत बुडीत होणारे क्षेत्र गृहीत धरण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये उपविभागीय अभियंता यांचे समन्वयाने संयुक्त सर्वेक्षणाचे काम करून संयुक्त सर्वेक्षण अहवाल कार्यकारी अभियंता, गडचिरोली पाटबंधारे विभाग, गडचिरोली या कार्यालयाचे पत्र क्र. २३३/चिशा/मेडीगड्डा बॅरेज/२०२२, दि. १२/१०/२०२२ जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार मेडीगड्डा बॅरेजचे वरील व खालील बाजूस असलेल्या नदीकाठावरील जमिनीचे झालेल्या Scouring बाबत संयुक्त सर्व्हेक्षण अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास कार्यकारी अभियंता, गडचिरोली पाटबंधारे विभाग, गडचिरोली या कार्यालयाचे पत्र क्र. २४८ / चिशा /मेडीगड्डा बॅरेज / २०२२, दि. २७/१०/२०२२ अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

सर्वसाधारणपणे बॅरेजचे बांधकामाकरीता पूर्ण संचय पातळी पर्यंत भुसंपादन केले जाते. मेडीगड्डा बॅरेजच्या बॅक वॉटर मुळे बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण करतांना सर्व्हेक्षणादरम्यान बॅंक वॉटर मुळे बाधीत होणाऱ्या गावातील भूधारकांनी अधिकचे क्षेत्र बुडीत होत असल्याबाबत निदर्शनास आणून दिलेले आहे. तथापि भुधारकांनी बुडीत होत असल्याबाबत सांगितलेल्या जमीनीच्या पातळीची क्षेत्रीय स्तरावर तपासणी केली असता शेत जमीनीचे तलांक १००.०० मी. चे वर असल्याचे आढळून आले आहे.

भुसंपादन करावयाचे जमिनीचे मुल्यांकन करण्याची कार्यवाही गडचिरोली महसुल विभागाकडून करण्यात येत आहे.

*****

H-1058

**लक्षवेधी सूचना क्रमांक ७०**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तिसरे (हिवाळी अधिवेशन)

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. छगन भुजबळ , श्री. अजित पवार, श्री. धनंजय मुंडे, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अतुल भातखळकर, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. हसन मुश्रीफ, श्री. अनिल पाटील, श्री. यशवंत माने, श्री. शेखर निकम, श्री. दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री. रोहित पवार, श्री. राजेश टोपे, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील, कु. आदिती तटकरे,श्री. प्राजक्त तनपूरे, श्री. संजय बनसोडे, ॲड. राहूल कुल, श्री. जयकुमार गोरे, श्री.लक्ष्मण जगताप, श्री. प्रशांत बंब वि.स.स.यांनी विचारलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७० खालीलप्रमाणे आहे.

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा परीक्षा -२०२२ च्या पदसंख्येत वाढ करण्याची लोकप्रतिनिधींनी दि. २८ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणारी राज्यसेवा परीक्षा २०२२ ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पध्दतीने होणारी शेवटची परीक्षा असणे, सन २०२० आणि २०२१ या मागच्या २ वर्षांमध्ये कोरोनामुळे शासकीय नोकर भरती प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे राबविली गेली नसणे, त्यात २०२३ पासून परीक्षा पध्दती बदलणार असल्याने परीक्षार्थीना नव्या पध्दतीने तयारी करावी लागणार असणे, मागच्या ४-५ किंवा त्यापेक्षा अधिक वर्षांपासून राज्यसेवा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो परीक्षार्थीचा राज्यसेवा परीक्षा २०२२ हा शेवटचा प्रयत्न असणार असणे, त्यामुळे राज्यसेवा २०२२ परीक्षेच्या माध्यमातून जास्तीत जास्त म्हणजे किमान १००० पदांची भरती करण्यात यावी अशी मागणी हजारो परीक्षार्थीकडून करण्यात येत असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार राज्यसेवा परीक्षा- २०२२ द्वारे २१ वेगवेगळ्या संवर्गातील ५०१ पदांसाठी भरती प्रक्रिया राबविली जाणार असणे, या भरती प्रक्रियेत ११ संवर्गातील एकाही पदाचा समावेश नसल्याची तसेच २१ संवर्गातील रिक्त असलेल्या अनेक पदांचा समावेश नसल्याची माहिती परीक्षार्थीनी दिली असणे, शासनाकडून मागणीपत्र प्राप्त न झालेल्या ११ संवर्गातील रिक्त पदांचा तसेच २१ संवर्गातील अजून काही रिक्त पदांचा राज्यसेवा- २०२२ भरती प्रक्रियेत समावेश झाल्यास पदांची संख्या १००० पर्यंत जाऊ शकते असा प्राथमिक अंदाज असणे, कोरोनामुळे २ वर्ष रखडलेली भरती प्रक्रिया आणि २०२३ पासून परीक्षा पध्दतीत बदल होणार असल्याने अधिक आव्हानात्मक होणारी भरती प्रक्रिया या दोन्ही बाबींचा संवेदनशीलपणे विचार करुन राज्यसेवा २०२२ भरती प्रक्रियेतील पदसंख्या १००० पर्यंत वाढविण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

### मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

राज्य सेवा परीक्षा, २०२२ च्या पदसंख्येमध्ये वाढ करण्यासंदर्भात मा. विधानसभा सदस्यांचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून या

विषयासंदर्भात विधानसभा / विधानपरिषद सदस्यांची इतर निवेदने देखील प्राप्त झाली आहेत. या निवेदनांच्या अनुषंगाने मा. लोकप्रतिनिधींना वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा परीक्षा, २०२२ साठी विविध संवर्गातील गट अ व गट ब (राजपत्रित) पदांसाठी संबंधित प्रशासकीय विभागांकडून प्राप्त मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आली होती. त्यानुसार राज्य सेवा (पूर्व) परीक्षा, २०२२ करिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ११/०५/२०२२ रोजी १६१ पदांची जाहिरात प्रसिध्द केली होती. या पदांमध्ये अधिकतम वाढ होण्यासाठी विहित कार्यपध्दती अनुसरुन संवर्गनिहाय रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला आहे. तद्नंतर विविध संवर्गातील वाढीव पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा परीक्षा, २०२२ करीता ६२३ पदांकरीता दिनांक ३१/१०/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे.

राज्य सेवा परीक्षा, २०२०,२०२१ व २०२२ करीता पदभरती केलेल्या तसेच नियोजित पदभरतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षा | पदांची संख्या | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | राज्य सेवा परीक्षा , २०२० | २०० | दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ पासून निवडप्राप्त उमेदवारांना नियुक्ती दिली आहे. |
| २ | राज्य सेवा परीक्षा, २०२१ | ४०५ | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मुख्य परीक्षा घेण्यात आली आहे. |
| ३ | राज्य सेवा परीक्षा, २०२२ | ६२३ | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. ३१/१०/२०२२ जाहिरात प्रसिध्द केली आहे |
| | एकूण पदे | १२२८ | |

उपरोक्त नमूद केल्यानुसार आगामी काळात राज्य सेवा परीक्षा, २०२१ अन्वये ४०५ पदांसाठी आणि राज्य सेवा परीक्षा, २०२२ अन्वये ६२३ पदांसाठी अशी एकूण १००० पदांपेक्षा अधिक पदांसाठी भरती प्रकीया राबविण्याचे नियोजित आहे.

-------

लक्षवेधी सूचना क्रमांक १६५१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक१६५१ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील शेतकऱ्यांची शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी मागणी मोठ्या प्रमाणात प्रलंबित असणे, प्रलंबित असलेल्या वीज जोडणी पैकी शासनाने ३१ मार्च २०१८ पूर्वी quotation भरलेल्या शेतकऱ्यांनाच वीज जोडणी दिली असणे, ३१ मार्च २०१८ पासुन आजतागायत प्रलंबित शेती पंपासाठी वीज जोडणी संख्या मोठ्या प्रमाणत असणे, नालिजत्सोव जोडणी न मिळालेल्या शेतकऱ्यांनी अनधिकृत पदतीने वीज घेण्याचा प्रयत्न करणे, त्यामुळे रोहित्रवर अतिरिक्त लोड येऊन रोहित्र मध्ये वारंवार बिघाड होणे, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक मानसिक नुकसान होणे, शासनाने प्रलंबित वीज मागणी बाबत धोरण जाहीर करून तत्काळ करवायाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्यामध्ये मागील ५ वर्षात सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ पर्यंत महावितरण कंपनी मार्फत ४.९२ लक्ष कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आलेल्या असून, मार्च, २०२२ अखेर १,८०,१०४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

राज्यात मार्च, २०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा करण्यासाठी शासनाने दि. ०५.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनेस मंजूरी दिली आहे. तसेच दि. १५.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये उच्चदाब वितरण प्रणाली योजनेच्या सुधारित खर्चास (रु.४७३४.६१ कोटी) व सदर योजनेस दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे. दि. ३१.०३.२०१८ नंतर उच्चदाब वितरण प्रणाली योजना प्रत्यक्ष सुरु होईपर्यंत, विविध योजनांतर्गत कृषीपंपांचे कनेक्शन देण्यात आले आहेत. उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत एकूण १,३९,५३७ कृषीपंपांना वीज पुरवठा देण्याचे उद्दिष्ट आहे. यापैकी, दि. २१.०२.२०२३ पर्यंत एकूण १,३७,४९३ कृषीपंप अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित २०४४ कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच राज्यातील दि. ०१ एप्रिल, २०१८ पासून पैसे भरून प्रलंबित असलेल्या कृषीपंपांना वीज जोडण्या देण्याकरीता शासनाने दि. १८.१२.२०२० च्या शासन निर्णयान्वये "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" मंजूर केले आहे. सदर धोरणानुसार ० ते २०० मीटर पर्यंत अंतर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना महावितरण स्वनिधीतून वीज जोडण्या देत आहे. तसेच २०१ ते ६०० मीटर पर्यंत अंतर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना शासनाकडून भागभांडवलाच्या माध्यमातून प्राप्त निधीमधून वीज जोडण्या देण्यात येत आहेत. शासनाने दरवर्षी रु.१५०० कोटी भागभांडवलापैकी सन २०२०-२०२१ यावर्षी रु. ५०० कोटी महावितरण कंपनीला वितरीत केले असून, सदर निधी अंतर्गत रु.३६५.७१ कोटीचे २५७ कार्यादेश देण्यात आले आहेत व रु. १५०.०१ कोटीचे २९१ सूचीबध्द कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर कार्यादेश अंतर्गत २०१ ते ६०० मिटरपर्यंत अंतर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत दि.०१ एप्रिल, २०१८ पासून दि.२० फेब्रुवारी, २०२३ पर्यंत एकूण २,०९,०७४ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून, उर्वरीत पैसे भरून प्रलंबित असलेल्या १,२९,२१२ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सन २०२२-२३ मध्ये दि. २१.०२.२०२३ पर्यंत ५९,९०८ रोहित्रे नादुरुस्त झाले असून त्यापैकी, ५९,३५२ रोहित्रे बदलण्यात आलेली आहेत. उर्वरीत ५५६ रोहित्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नादुरुस्त रोहित्रे तातडीने दुरुस्त करण्यासाठी महावितरणने विभागनिहाय रोहित्र दुरुस्त करण्यासाठी एजन्सी नियुक्त केल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात एकुण १९३४ LOE देण्यात आले आहेत. नादुरुस्त वितरण रोहित्रे वेळेत बदलुन देण्यासाठी एकुण २२,५६६ थ्री फेज वितरण रोहित्रे चक्राकार पध्दतीने उपलब्ध आहेत. सन २०२२-२३ मध्ये आजतागायत क्षेत्रिय कार्यालयांना ७७३४ किलोलिटर ऑईलचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सध्या मध्यवर्ती भांडारगृहात १५१६ किलोलिटर ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असून ऑईल अभावी रोहीत्रे नादुरुस्त राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.

******************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९४१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पालघर जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात केळी, चिकू, पेरू, काजू, आंबा या सारखी पिके घेत असणे, महावितरण कंपनीकडून जागेची (फळबागेची) पाहणी करून विजेचा वापर फळ शेतीसाठी करत असल्या कारणास्तव ३२३/दिनांक ३-४-२०२१ रोजीच्या वाणिज्य परिपत्रकानुसार शेती इतर व कोल्ड स्टोरेज या वर्गवारी दरानुसार दरात फळबागांची वीज देयके येत असणे, त्यामुळे पत्रकानुसार म्हणजेच वाढीव दराने वितरित होत आहेत. महावितरण मुख्य कार्यालय संचालक यांचे कार्यालय प्रकाशगड बांद्रा (पू) पत्रक संचालक ०२९९००८ दि २२/११/२०२२ अन्वये कृषी वीज देयक वसुली बाबत कृषी ग्राहकांकडून एका चालू वीज देयकांचा भरणा करून घेण्यात येणे, या व्यतिरिक्त इतर कोणताही पर्याय किंवा जास्तीच्या थकबाकी वसुली करिता सक्ती करण्यात येऊ नये अशा प्रकारचे स्पष्ट निर्देश असताना मुख्य अभियंता कल्याण परिमंडळ यांनी त्यांच्या पालघर विभागीय कार्यालयाला ही सवलत शेती इतर या वर्गातील शेतकऱ्यांना लागू नाही त्यांच्याकडून थकबाकी सहित देयके वसूल करण्यात यावीत अशा प्रकारचे आदेशित केले आहे पत्रामध्ये अशा कोणताही प्रकारची वर्गवारी नमूद केलेली नाही आणि ही वर्गवारी जरी ग्राह्य असली तरी सर्व शेतकरी वर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. या थकबाकीसाठी मूळ कारण म्हणजे वीज ग्राहकांना दिली गेलेली सदोष देयके वीज मीटर बंद अवस्थेत असताना सरासरी वापरानुसार भरमसाठ बिले आकारून शेतकऱ्यांच्या माथ्यावर अव्वाच्या सव्वा बिलांची आकारणी मारून थकबाकीचा फुगीर आकडा दाखवून शेतकऱ्यांची जोडणी कापण्याचे आदेश देऊन महावितरण कार्यालयाचा अणा गोंदी कारभार समोर आला आहे. यामुळे पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यावर अन्याय होत असणे, निसर्गाचा लहरीपणा म्हणजेच अतिवृष्टी येणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना जबर आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणे, या वाढीव दराने वीज बिल आकारणी केल्यास शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही. फळ बागायतदारांना शेती इतर व कोल्ड स्टोरेज या वर्गवारीनुसार वीज देयके येत असल्यामुळे कृषी पंपाच्या वीज देयकाच्या कुठल्याही परिपत्रकाचा लाभ देण्यास महावितरण जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावर टाळाटाळ करत असणे विज बिल भरण्यासाठी तगादा लावून शेतकऱ्यांकडून थकबाकी वसुली करिता सक्ती करणे, दिनांक १०/१२/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार कृषी ग्राहकांच्या वीज पुरवठा खंडित न करणे बाबत सूचना देण्यात आले असणे, त्यानुसार फळबागायतदारांचाही वीजपुरवठा खंडित करण्यात येऊ नये याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले

रेटा H/1009(800-2-23)-1

आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार एकूण महसुलाची गरज व त्याचप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरीता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर करावा लागतो या प्रस्तावाची मा. आयोगाकडून पडताळणी झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात येते. त्यानंतर मा. आयोगातर्फे राज्यातील महसूली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहिर सुनावणी घेण्यात येते. ग्राहकांनी उपस्थित केलेल्या सूचना/ हरकती/ अभिप्राय विचारात घेऊन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करून मा. आयोगातर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो.

मा. आयोगाने दि. ३० मार्च, २०२० रोजी आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष या कालावधी साठी (प्र.क्र.३२२/२०१९) बहुवर्षिय वीजदर आदेश निर्गमित केलेला आहे. त्यानुषंगाने सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता महावितरण कंपनीने वाणिज्य परिपत्रक क्रमांक ३२३ दि.०३/०४/२०२० अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित केले आहे.

महावितरणच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्राहकांना सदर आदेशानुसारच वीजदर श्रेणी व वर्गवारीनुसार वीज दरांची आकारणी करण्यात येत असून, त्यात बदल करण्याचे अधिकार महावितरणला नाहीत. जून, २०१५ पूर्वी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या वीजदर आदेशामध्ये कृषी तथा कृषी पुरक कारणांसाठी "कृषी" ही एकच वर्गवारी लागू होती.

मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर आदेश क्र.१२१/२०१४, दि. २६/०६/२०१५ नुसार कृषी ग्राहकांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे :-

<u>लघुदाब कृषी :-</u> कृषी मीटर असलेले व मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांचा यामध्ये समावेश आहे. सदर वीज वापर हा शेतीपंपाकरीता व पंप हाऊस मधील ४० वॅट पर्यंतच्या बल्बच्या वापराकरीता आहे.

<u>लघुदाब कृषी इतर:-</u> सदर वर्गवारी कृषी संबंधीत इतर घटकांसह खालील घटकांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

(१) फलोत्पादन, (२) फुल शेती, (३) रोपवाटिका (नर्सरी), (४) वृक्षारोपण, (५) मत्स्यपालन, (६) रेशीम शेती, (७) पशुपालन फार्म इत्यादी.

सदर आदेशान्वये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेणाऱ्या बागांना म्हणजेच फलोत्पादनाकरीता वीज वापर असलेल्या ग्राहकांना "कृषी-इतर" या वर्गवारीत समावेश करण्यात आला असून त्यानुसार वीज दर आकारणी करण्यात येत आहे.

मा. आयोगाकडे मध्यावधी आढावा याचिका (आर्थिक वर्ष- २०१९-२० ते २०२२-२३ करीता समायोजन व आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ करीता वीजदर सुधारणा) सादर करण्यात येत आहे. सदर याचिकेमध्ये फलोत्पादन (फळबागा) यांचा समावेश कृषी इतर मधून कृषी वर्गवारीमध्ये करण्यात यावा किंवा कसे याबाबत मा. आयोगाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे.

H11009-1a

कृषी पंपाचे थकित वीज देयके वसूल करण्याबाबत व वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत असे नमूद करण्यात येते की, महावितरण हा स्वतः सुध्दा एक ग्राहक असून ज्यास वीज खरेदी करावी लागते तसेच पायाभूत सोयीसुविधांची देखभाल व दुरुस्ती करावी लागते. महानिर्मिती, महापारेषण व इतर कंपन्या त्यांच्या देयकात महावितरणला कोणतीही माफी किंवा सवलत देत नाही.

जे ग्राहक देय दिनांकापर्यंत वीज देयकाचा भरणा करत नाहीत, अशा ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे नोटीस दिल्या जातात. महावितरणच्या स्थानिक कर्मचाऱ्यांद्वारे ग्राहकास वीज देयक भरणा करण्याबाबत वारंवार तोंडी सूचना दिल्या जातात. त्यानंतर विद्युत अधिनियम २००३, कलम ५६ नुसार वीजपुरवठा खंडीत करण्याच्या नोटीस देण्यात येतात. तसेच वारंवार पाठपुरावा करुन देखील वीज देयक न भरलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा नोटिस कालावधी संपल्यानंतर नाईलाजास्तव खंडीत करण्यात येतो.

"कृषी वीज पंप जोडणी धोरण-२०२०" नुसार कृषी ग्राहकांना सप्टेंबर, २०२० पासून त्यांचे चालू वीज देयक भरणे क्रमप्राप्त होते. परंतु शेतकऱ्यांचे यावर्षी अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व सध्या सुरु असलेला रब्बी हंगाम विचारात घेवून मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार कृषी पंप ग्राहकांचा वीजपुरवठा चालू किंवा थकीत देयकाच्या वसुलीकरीता खंडीत करण्यात येवू नये असे महावितरणने त्यांच्या दि.१०.१२.२०२२ च्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी शेती व शेतीइतर या सर्व वर्गवारीतील ग्राहकांसाठी कल्याण परिमंडळ कार्यालयाकडून करण्यात आली. कल्याण परिमंडळाअंतर्गत कुठल्याही शेती व शेतीइतर वीज ग्राहकाचा वीजपुरवठा थकबाकीकरिता खंडीत करण्यात आलेला नाही. परंतु हे पत्र निर्गमीत होण्यापुर्वी २९१ शेती+ शेतीइतर ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आलेला होता. तो पूर्ववत जोडून देण्यात आलेला आहे.

पालघर जिल्ह्यात मीटर बसविलेल्या एकुण शेती + शेती इतर या ग्राहकांपैकी माहे नोव्हेंबर, २०२२ या महिन्यांचे एकूण ८,१८१ ग्राहकांची प्रत्यक्ष मीटर वाचनाप्रमाणे, ६१६ ग्राहकांची सरासरी वीज वापराप्रमाणे व ३८२० ग्राहकांची फॉल्टी मीटर वाचनाप्रमाणे वीज आकारणी करण्यात आलेली आहे. एकूण ५३२ ग्राहकांचे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२२ या महिन्यात वीज बिलात दुरुस्ती करण्यात आली आहे.

आजमितीस पालघर जिल्ह्यात १३,४१४ शेतीपंप ग्राहकांपैकी ७,७३० ग्राहकांची थकबाकी ही माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर ही रु.८.०५ कोटी इतकी आहे. तसेच ६,८७६ शेती इतर ग्राहकांपैकी ३,६५९ ग्राहकांची थकबाकी ही माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर ही रु.९.२९ कोटी इतकी आहे.

*************************

H/1009-2

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधान सभा

## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

**श्री. दिलीप मोहिते पाटील, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:**

"नाशिक जिल्हा ता.येवला,येथील विष्णू रामचंद्र भागवत नामक ठगानी माऊली मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी उज्वलम अग्रो प्रा. लिमिटेड, संकल्प सिद्धी प्रॉडक्ट इंडिया लिमिटेड नावाच्या वेगवेगळ्या कंपन्या स्थापन करून एम. एल. एम मार्केटिंग द्वारे ४५५ कोटी रु च्या ठेवी गोळा केल्या गेल्या असणे, मात्र त्याचा परतावा दिलाच नसणे.त्या आधारे दाखल झालेला प्रकार आळेफाटा पोलीस स्टेशन येथील २०१/२०१९ या गुन्ह्यात आरोपींना अटक झाली असणे, तसेच तपासादरम्यान महागड्या किमतीच्या रेंज रोव्हर,फॉर्च्यूनर, इनोव्हा, अशा गाड्या वगळता कुठलीही रिकव्हरी झाली नसणे. तपासणी अधिकाऱ्याच्या वारंवार बदली सूचना झाल्या मात्र तपासात काही एक निष्पन्न झाले नाही. सदर प्रकरणात आरोपीने गुंतवणूकदारांना पालघर जिल्ह्यातील मौजे विक्रमगड या गावाची स्वताच्या व संचालकाच्या नावाचे ६०० एकर जमिनीचे खोटे ७/१२ दाखवून व देऊन ठेवीदारांची फसवणूक केली असणे. या कंपन्यांच्या सीईओ च्या श्री. प्रफुल निस्ताने यांचे जबाबानुसार १ ऑक्टो २०१८ पासून ते मार्च २०१९ पर्यंत संकल्प सिद्धी प्रॉडक्ट इंडिया या कंपनीने एकूण २३,०५७ ठेवीदारांची फसवणूक केल्याची नोंद असणे, त्यानुसार ४६७ रुपये कोटी रुपये जमा झाले होते. त्यापैकी २७५ कोटी ४२ लक्ष इतका रुपये परतावा दिला गेला, मात्र २१० कोटी देणे बाकी असणे. परंतु अद्यापही उर्वरित सभासदांना परतावा दिला गेला नसणे.त्यामध्ये कै. सुरेश धोंडीभाऊ आवटी व कै दत्तात्रय शंकर पोखरकर यांचा धसका घेऊन मृत्यू झाला असणे,उच्च न्यायालयाने जिल्हा व सत्र न्यायालयाने सदर प्रकरणाची फाईल दोन वर्षात सुरू न केल्याचे कारण देत आरोपींचा जामीन मंजूर केला असणे, विष्णू भागवत यांने यापूर्वी देखील २०११ साली औरंगाबाद, मुकुंदवाडी येथे अशाच प्रकारचा गुन्हा दाखल करून महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेर त्यांच्यावर ११ गुन्हे दाखल आहेत. सदरचे २१० कोटी रुपये नेमके कुठे आहेत याचा तपास अद्यापही लागलेला नसणे. तसेच विष्णू रामचंद्र भागवत यांचा भाऊ रुपचंद रामचंद्र भागवत यांच्याकडे रक्कम असल्याचा आरोप साक्षीदार/ सभासद / ठेविदार करत असणे, तसे असताना पोलीस यंत्रणेकडून रुपचंद भागवत यांना अटक न करणे, तसेच दोषारोप पत्रात देखील त्यांच्या नावाचा समावेश केलेला नसणे, हेतू पुरस्कर या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणे, याच्यामागे राजकीय शक्ती असल्याचा आरोप सभासद/ ठेवीदार यांच्याकडून होत असणे,त्यामुळे शेतकरी सभासद/ ठेवीदार यांच्यामध्ये असंतोषाची तीव्र भावना झाली असणे,या लक्षवेधीच्या माध्यमातून सदर प्रकरण हे सीआयडी यांच्याकडे वर्ग करावे ही मागणी व नव्याने तपास करून ठेवीदारांचे ठेवी परत कराव्यात त्यासाठी शासनाने तातडीने करावयाची ठोस कारवाई, केलेली कार्यवाही व शासनाच्या उपाययोजना इ..."

≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈

## मा. उपमुख्यमंत्री, गृह यांचे निवेदन

विष्णू रामचंद्र भागवत या व्यक्तीने श्री माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, उज्वलम ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड व संकल्प सिद्धी प्रॉडक्ट इंडिया लिमिटेड या वित्तीय संस्था स्थापन करुन या संस्थांमार्फत एकूण ३५५० गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी या वित्तीय संस्थांविरुध्द महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण १४ गुन्हे दाखल आहेत व त्यामधील तपासानुसार ठेवीदारांची रुपये १०७.४४ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे.

रोहा/सं.प ११५७(७९०-२-२०२३

(कृ.मा.प.)

उपरोक्त १४ गुन्ह्यांपैकी एका प्रकरणी फिर्यादी व इतर ३५८ साक्षीदारांना उक्त तीन वित्तीय संस्थांमध्ये पैसे गुंतवणूक करुन घेऊन दामदुप्पट रकमा देण्याचे आमिष दाखवून, त्यांच्याकडून ठेव स्वरुपात रकमा स्वीकारल्या व अशा ठेवी विहीत मुदतीत परतफेड न करता, त्या रकमांचा स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वापर करुन ठेवीदारांची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी आळेफाटा पोलीस ठाणे, जिल्हा पुणे येथे गु.र.क्र. २०१/२०१९, भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४०९, ४२० सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तपासादरम्यान ४३७ ठेवीदारांची साक्ष नोंदविण्यात आली असून सदर तपासात रुपये ५५.५१ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले असून सदर दाखल गुन्ह्यामध्ये एकूण ०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात उक्त वित्तीय संस्था व संस्थेचे संचालक याची पुणे जिल्ह्यातील ०४ व अहमदनगर जिल्ह्यातील ०६ अशा १० स्थावर मालमत्ता, ०२ वाहने व १५ बँक खाती जप्त करण्याबाबतचा जिल्हाधिकारी, पुणे यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर मालमत्ता जप्त करण्याबाबतचे शासन आदेश काढण्याच्या दृष्टिने अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे शाखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक २६.१२.२०२२ रोजी अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

यापूर्वी उक्त वित्तीय संस्थांच्या नावे दाखल गुन्ह्यांपैकी मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे दाखल गु.र.क्रमांक २०९/२०१९ या गुन्ह्यामध्ये पालघर येथील अस्तित्वात नसलेल्या ६०० एकर जमिनीसंदर्भात बनावट सातबारा तयार करुन फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित तलाठी याच्या विरोधात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाखल गुन्हा प्रकरणी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील ०८ स्थावर मालमत्ता, २६ बँक खाती व १२ वाहने अशा मालमत्ता जप्त करण्याबाबतचे दिनांक १२ एप्रिल २०२१ रोजी शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

याशिवाय उक्त वित्तीय संस्थांविरोधात दाखल गुन्ह्याप्रकरणी मुख्य आरोपी विष्णू भागवत याच्या विरोधात मुकुंदवाडी पोलीस ठाणे, औरंगाबाद शहर येथे दाखल गुन्ह्यामध्ये विष्णू भागवत यासह इतर ११ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर सर्व आरोपींविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच आरोपी विष्णू भागवत याचा भाऊ रुपचंद रामचंद्र भागवत यास मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक शहर व धुळे तालुका पोलीस ठाणे, धुळे येथे दाखल गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली असून त्याच्या विरोधात मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

श्री माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, उज्वलम ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड व संकल्प सिद्धी प्रॉडक्ट इंडिया लिमिटेड या संस्थांविरोधात गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्यामध्ये दाखल असलेल्या एकूण १४ गुन्ह्यांप्रकरणी एकूण ११ गुन्ह्यांमध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून १ गुन्हा "बी" समरी नुसार न्यायनिर्णयासाठी सादर आहे व उर्वरित **०२** गुन्हे तपासावर आहेत. सद्य:स्थितीत मुख्य आरोपी विष्णू भागवत हा न्यायालयीन कोठडीत आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक १६७६ — गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

मा.श्री. नितेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६७६ खालीलप्रमाणे:-

"श्रीरामपूर येथील अल्पवयीन मुलगी हि शिर्डी येथे साईबाबाच्या दर्शनास गेली असताना तीला लव जिहाद च्या जाळयात फसवून आरोपी अमन शेख रा.वार्ड नं. २ याने अपहरण करुन घेऊन जाणे, तसेच अल्पवयीन तरुणीचे अपहरण होऊन १९ दिवस उलटून गेल्यावरही शोध न लागणे, आरोपी अमन याने पीडित मुलीस मी हिंदू आहे असे भासवून बनावट आधार कार्ड देखिल बनवून घेतले असणे, पोलीसांकडे मुलीचे पालक वारंवार चौकशी करण्यास गेल्यावर त्यांना काहीच सांगत नसणे तसेच हे मुलीच्या पालकांना चिंता वाटणे स्वाभाविक आहे असे म्हणणे, त्यामुळे मुलीचा आई वडिलांनी अमरण उपोषण करण्याचा निर्णय घेणे, त्याप्रमाणे मुलीच्या पालकांनी पोलीस विभागात रीतसर परवानगी देखील घेतली असणे, दिनांक २/१२/२०२२ रोजी मुलीचे पालक उपोषणास श्रीरामपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयासमोर बसने, यावेळी विविध दलित संघटनेचे पदाधिकारी देखील उपोषण स्थळी बसले असणे, काळी वेळातच श्रीरामपूर पो.स्टेशन चे प्रभारी हर्षवर्धन गवळी, काही पो. हवालदार, पो.उपनिरीक्षक जीवन बोरसे यांनी तर पोलीस गणवेशावर न येता आणि गॉगल घालून सिंघम पध्दतीने तेथे येणे आणि पोलीस विभागाचा प्रोटोकॉलचा देखील अपमान करुन उपोषण स्थळी पालकांना अर्वाच्य भाषेत बोलून बळजबरीने ओढून त्यांना शिर्डी येथे नेण्यात येणे, याबाबत समाजमांध्यमांवर व्हिडिओ देखील मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले असणे, असे आदेश अप्पर पोलीस अधीक्षक स्वाती भोर यांचे आहेत असे पोलीस कर्मचा-यांनी सांगितले असणे, एकंदरीत हा दलित समाजावर झालेला अन्याय असणे, कारण उपोषण स्थळावरुन असे ओढून नेण्याचा कोणताही लिखित आदेश पोलीस अधिका-यांकडे नसणे, या संदर्भात स्वाती भोर यांच्या दिलेल्या आदेशाची उच्चस्तरीय चौकशी(SIT) चौकशी होणे गरजेचे असणे, संबंधित पोलीस अधिका-यांवर IPC Section 354 आणि ॲट्रॉसिटी अंतर्गत कारवाई होणे गरजेचे असणे, सदर प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत असंतोषाची भावना मोठया प्रमाणात निर्माण होणे, सदर प्रकाराबाबत शासनाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

पिडीत अल्पवयीन मुलगी तीच्या नातेवाईकासोबत शिर्डी येथे दि. ११.११.२०२२ रोजी देवदर्शनाकरीता गेली असता ती मंदीर परिसरातून बेपत्ता झाली. पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन शिर्डी पोलीस ठाणे, अहमदनगर गु.र.नं. ५४५/२०२२ भा.द.वि. कलम ३६३ प्रमाणे दि.१२.११.२०२२ रोजी गुन्हा नोंद करुन मुलीच्या शोधासाठी पोलीसांची पथके निर्माण करुन राजस्थान, मध्यप्रदेश, अहमदनगर, शिर्डी येथे मुलीचा व आरोपीचा शोध घेण्यात आला असता दि. ०२.१२.२०२२

रोजी आरोपी अमन अमजद शेख यांचे सोबत मिळून आली. त्यांना ताब्यात घेतल्यानंतर आरोपीची झडती घेतली असता त्याचेकडे हिंदु असल्याचे बनावट आधार कार्ड मिळून आलेले नाही किंवा तपासात तसे निष्पन्नही झालेले नाही. उपोषणासंदर्भात पिडीत मुलीचे पालक व इतर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयासमोर उपोषणाकरीता बसले होते. त्यात दलीत संघटनेचे कोणतेही पदाधिकारी उपस्थित नव्हते. उपोषणाच्या ठिकाणी श्री. दत्तात्रय खेमनर, जिल्हाध्यक्ष, भटके विमुक्त आघाडी व राष्ट्रीय श्रीराम संघाचे सागर बेग व त्यांचे इतर गुन्हेगार साथीदार होते.

सहायक पोलीस निरीक्षक श्री. बोरसे यांनी उपोषण स्थळी साध्या वेशात जाऊन पिडीतेचे आई-वडील व उपोषणकर्ते यांना सर्व कायदेशीर व गोपनियतेच्या बाबी समजावुन सांगुन देखील उपोषणकर्ते पिडीतेचे आई वडीलांना शिर्डी येथे जाण्यापासून रोखत आहे असे पोलीस निरीक्षक गवळी यांना कळविल्याने पोलीस निरीक्षक गवळी यांनी महिला पोलीसांसह उपोषणस्थळी जावुन मुलीचे आई वडीलांना व उपोषणकर्ते यांना गुन्हयाचे गांर्भीर्य व गोपनियता समजावुन सांगितल्याने पिडीत मुलीचे आई वडील पोलीसांसोबत येण्यास स्वखुशीने तयार झाले. त्यांना पोलीसांनी बळजबरीने ओढलेले नाही अथवा कोणतीही अर्वाच्य भाषा वापरलेली नाही. पिडीतीचे आई-वडील व उपोषणकर्ते यांना कायदेशीर बाबी समजावून पिडीतेच्या आईवडीलांच्या संमतीने त्यांना शिर्डी येथे कायदेशीर बाबींची पूर्तता करणेकामी नेण्यात आले होते. पोलीसांनी त्याना दमदाटी न केल्याचे, बळजबरीने ओढत नेऊन धक्काबुक्की न केल्याबाबत तसेच कोणतीही वाईट वागणूक न दिल्याबाबत पीडीतेच्या आई-वडीलांनी त्यांचे जबाबात नमूद केले आहे.

उपोषण स्थळी उपस्थित असलेल्या लोकांविरुध्द अहमदनगर व इतर जिल्हयात गंभीर गुन्हे दाखल असून त्यांनी अर्धवट व त्यांच्या सोयीचे व्हीडीओ प्रसार माध्यमावर प्रसारीत करुन सर्वसामान्य जनतेची दिशाभूल केली असून पोलीसांविषयी गैरसमज पसरविले आहेत.

सदर गुन्हयाच्या तपासात पिडीत मुलीस पळवुन नेणारा अमन अमजद शेख यांचेविरुध्द मुलीने दिलेल्या जबाबावरुन शिर्डी पोलीस ठाणे गु.र.नं.५४५/२०२२ भा.द.वि.कलम ३७६, ३७६(२)(एन), ३६३, ३६६, ३४, पोक्सो का. कलम ४, ५(एल),६, १२ सह अ.जा.ज.प्र.का.कलम ३(१)(w)(i)(ii),३(२)(v) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा तपासावर आहे.

-----------------------------

**लक्षवेधी सूचना**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री. संतोष बांगर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"मुंबईत टिळकनगर येथील इमारत क्र.४९ एलिना, सी. एस. टी. क्र. ३५ (भाग), सर्वे नं. १४ व्हिलेन चेंबूर या ठिकाणी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी श्री.मेहुल जाधवजी शहा, हेमाग शहा, रीखव शहा, रिषभ शहा, पियुष शहा या पाच लोकांनी मेसर्स हुजीश रीअल इस्टेट डेव्हलपर्स (एल.एल.पी.) नामक कंपनी स्थापन करणे, सदर प्रकल्पातील भागीदारी श्री.राजेश मेहता २५ टक्के, कांतीलाल शहा २५ टक्के व उर्वरीत ५० टक्के उक्त नमूद पाचजण असी भागीदारी असणे, उक्त भूखंडावर १४ मजली बांधकाम पूर्ण करण्यात येणे, सदर प्रकल्पातील सर्व सदनिका मेहुल जाधवजी शहा यांनी विकून टाकूण राजेच मेहता व कांतीलाल शहा या भागादारांची केलेली फसवणूक, उक्त फसवणूक प्रकरणी मेसर्स हुजीश रीअल इस्टेट डेव्हलपर्स (एल.एल.पी.) या कंपनीच्या उक्त नमूद ५ जनांविरुध्द तक्रार २०२० पासून टिळकनगर पोलीस ठाण्यात फसवणूक झालेल्या भागदारांकडून तक्रारी व पत्रव्यहार करण्यात येणे, तथापी त्यांच्यावर कोणतीच कारवाई न होणे वा एफ.आय.आर. दाखल करण्यात न येणे, याप्रकरणी मा.मुख्यमंत्री कार्यालय, गृह विभाग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६, मुंबई यांच्याकडेही तक्रार दाखल करण्यात येणे, उक्त प्रकरणी चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा असे आदेश गृह विभागाकडून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६, मुंबई यांना दि.१२ डिसेंबर, २०२२ रोजी लेखी पत्राव्दारे देण्यात येणे, तथापी त्यांची दखल न घेता गृह विभागाच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात येणे, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीचे चौकशी करुन प्रकल्पातील भागादार श्री.राजेश मेहता यांची फसवणूक करणाऱ्या मेसर्स हुजीश रीअल इस्टेट डेव्हलपर्स (एल.एल.पी.) या कंपनीच्या ५ जनांविरुध्द एफ.आय.आर. दाखल करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच एफ.आय.आर. दाखल न करता फसवणूक करणाऱ्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याची चौकशी करुन त्यांच्यावरही कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही."**

---

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

अर्जदार श्री. राजेश चंपकलाल मेहता व त्यांचे भागीदार श्री. कांतीलाल शाह यांची गैरअर्जदार मे. ह्युजेस रिअल इस्टेट डेव्हलपर्स, श्री मेहुल शहा, हेमांग शहा रिखव शहा, रिषभ शहा, पियुष शहा व इतर यांनी बांधकाम व्यवसायातील भागीदारीमध्ये विश्वासघात करून फसवणूक केल्याबाबत दिनांक २१.१२.२०२० रोजी

शेशाम/1224-1 (700-3-23)

[पृ.मा.प.

आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांनी गैरअर्जदार रिखव शहा यांचा जबाब नोंद करून घेऊन त्यानुसार सखोल चौकशी केली असता, अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये कोणताही दखलपात्र गुन्हा उघड होत नसल्याचे निष्पन्न झाल्याने चौकशी बंद करण्यात आली. त्यानुसार संदर अर्जाच्या अनुषंगाने चौकशी बंद करण्यात आल्याबाबत अर्जदार व गैरअर्जदार यांना दिनांक १२.०४.२०२१ रोजी कळविण्यात आले आहे.

दरम्यानच्या कालावधीत अर्जदार श्री. राजेश मेहता व त्यांचे भागीदार कांतीलाल शाह यांनी टिळकनगर पोलीस ठाणे येथे गैरअर्जदार यांच्याविरूध्द तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रारीमध्ये अर्जदाराने फसवणूक झालेली रक्कम ही १० कोटींपेक्षा जास्त असल्याचे नमूद करण्यात आल्याने अर्जदार यांचा अर्ज पुढील कार्यवाहीस्तव आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग करण्यात आला. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे प्राथमिक चौकशी क्रमांक २०७/२०२१ अन्वये केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये अर्जदार यांनी टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे नव्याने तक्रार अर्ज दिला असून आर्थिक गुन्हे शाखेकडे केलेला सदरचा तक्रार अर्ज मागे घेत असल्याचा जबाब दिला. त्यास्तव आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे सुरू असलेली चौकशी बंद करून त्याबाबत अर्जदारास दि. २१.१२.२०२१ रोजी लेखी कळविण्यात आले.

दरम्यान अर्जदार मेहता यांनी टिळकनगर पोलीस ठाणे येथे दिनांक ११.१०.२०२१ रोजी तक्रार अर्ज दिला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार रिखव पियूष शहा व रूषभ पियुष शहा यांचे जबाब नोंदवून सदर प्रकरण हे दिवाणी स्वरूपाचे असल्याने कोणताही दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नसल्याने सदरचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असल्याचे अर्जदारास दि.०५.११.२०२२ रोजी लेखी कळविण्यात आले.

अर्जदार श्री. राजेश मेहता यांनी मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडे केलेला तक्रार अर्ज गृह विभागाकडे प्राप्त झाल्याने दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे. तसेच गैरअर्जदार याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक २७८८८/२०२१ दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-------------------

H/1224-19

**लक्षवेधी सूचना**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) मौजे नारपोली येथील सर्व्हे नं – ९४ मधील ४० गुंठे जमिन लक्ष्मीबाई डुकले या आदिवासी महिलेच्या नावावर असणे, सदर आदिवासी महिलेची बनावट सही करून तिऱ्हाईत महिलेस उभे करून अपर तहसिलदार यांच्या नावाने बनावट बिनशेती परवाना (NA) परवानगी तयार करणे, सदर आदिवासी महिलेची व शासनाची ५० कोटी रूपयांची फसवणूक सुर्यकांत मंगलदास सामाणे विकासकाने करणे, यासंदर्भात नारपोली पोलीस स्थानकात अनुसूचित जाती-जमाती कायदयाअंतर्गत तक्रारी करूनही पोलिसांनी कोणतीही कार्यवाही न करणे, सदर गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री, मा. नगरविकासमंत्री, नगरविकास विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे, अधीक्षक भूमीअभिलेख, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आयुक्त, तहसीलदार, यांच्याकडे .... नगरविकास विभागाच्या अवर सचिवांनी भिवंडी महानगरपालिकेस पत्र देऊन तात्काळ अहवाल सादर करण्यास कळविले, सदर गैरव्यवहाराची चौकशी उच्च पातळीवर करण्याची आवश्यकता यासंदर्भात शासनाने वेळोवेळी व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."**

---

### मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

फिर्यादी काळुराम पांडया धापसी, रा. फेणेगाव, ता. भिवंडी जि. ठाणे यांच्या मामी लक्ष्मीबाई चंद्रया डुकले या आदिवासी समाजाच्या असल्याचे माहिती असून देखील सुर्यकांत मंगलदास सामाणी याने फिर्यादी यांचे मामीच्या नावे असलेली नारपोली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ९४ येथील ३५ गुंठे जमीन बेकायदेशीर बळकावण्याच्या उद्देशाने कोणतीही शासकिय परवानगी न घेता सदर मिळकत भाडे तत्वावर घेऊन सदर मिळकतीचा बिनशेती केल्याचा खोटा दस्तऐवज तयार करून फसवणूक केल्याबाबत अर्जदार नामे काळुराम पंडया धापशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नारपोली पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु. र. क्र. २२७/२०२२ अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) सुधारित अधिनियम, २०१५ चे कलम ३, (१) (ग), ३(१) (फ), भा. दं. वि. कलम ४२०, ४६४, ४६५, ४६८, ४७१ नुसार दि. २९ एप्रिल, २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये प्राप्त कागदपत्रांवरून सदर प्रकरणामध्ये फसवणुकीचा, खोटे दस्ताऐवज बनविल्याचा तसेच ॲक्ट्रॉसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा होत असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मा. न्यायालयात "क" समरी अहवाल दि. ३०/०६/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरण मा. न्यायालयात न्यायनिर्णयाकरिता प्रलंबित आहे. तसेच, अर्जदार यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २६८१९/२०२२ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर प्रकरणी श्री. काळूराम पांडया धापसी यांचे कुलमुखत्यारधारक श्री. २५/११/२०२२ रोजी भिवंडी महानगरपालिकेस पाठविला असून प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणाची पडताळणी करुन भिवंडी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र. ९४३

**श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९४३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र औद्योगिक प्राधिकरणांच्या (MIDC) भुसंपादनाच्या प्रकियेतून सि. टी. एस. न. २५, मौजे व्यारवली, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील भूखंड अपिलार्थी बिंद्रा कन्स्ट्रक्शन यांच्या मागणीनुसार सशर्थ काही भागम्हणजे (MIDC) च्या सार्वजनिक उपक्रमापैकी मंजूर रस्त्याखालील क्षेत्र सुमारे C-५ = ९५० मी. क्षेत्र १ करून उर्वरितबाबत भुसंपादन अधिकारी यांचेकडून योग्य ते सविस्तर आदेश घेण्याचा अटीवर तत्कालीन मा. महसूल मंत्रीयांनी सन २०१४ रोजी पूनर्वसनासाठी आदेश पारीत केले असणे, विकासक बिंद्रा - सातेरी कन्स्ट्रक्शन यांनी राजकीयदबावाचा वापर करून असे निदेर्शित आदेश न घेता प्रकरण दाखल करून सुरू केले असणे, पुनर्वसन क्षेत्र है- ३ Special Industrial Zone साठीच्या आरक्षणासाठी आरक्षित असल्यामुळे एकूण बांधकाम क्षेत्राच्या २५% BUAऐवढे बांधकाम हे I-३ म्हणून देणे बंधनकारक असणे, तसेच मान्यता व आराखडा विकासक यांनी प्राधिकरणातून Approval करून घेतला असणे, LIO No-SRA/ENG/२८११/ KE/PL/LIO नुसार मान्य असणे, परंतु पुन्हा एकदा आपले राजकीय वजन वापरून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे रद्द झालेले दि. १६/११/२०१६ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे दि. २४/६/२०१७ रोजी Revised LOI घेताना सदर-३ चे द्यावयाचे क्षेत्र रद्द करून घेतले असणे, एका राजकीय पक्षाचे विद्यमान नेते हे बिंद्राकंपनीचे ४०% भागीदार असणे, सदर Reules LOI हा श्री विश्वास पाटील, तात्कालीन (CEO/SRA) यांची कारकिर्ती मधील असून माहे जून २०१७ च्या श्री विश्वास पाटील, तात्कालीन (CEO/SRA) असताना केलेल्या अप्रशासकीय पध्दतीने मान्यता देण्यात आलेल्या पैकी असणे, त्यामुळे I-३ चे आरक्षित क्षेत्र ६५५ चौ. मी. क्षेत्र BUA प्राधिकरणाकडून मिळणे अपेक्षित असणे, जेणेकरुन मा. पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या Start up India/Made in India, सारख्या MSME उद्योगांसाठी शहरात प्राधिकरणांच्या जागांमध्ये संधी उपलब्ध करुन देण्यात येऊ शकत असणे, सदरचे आरक्षण काढून घेताना Buildable Reservation रस्त्यावर देता येते असे प्रकारचा प्रयोजन विकासनियंत्रण नियमावली १९९१ मध्ये नसणे, तरीही विकासकांना आर्थिक लाभ पोहचवण्यासाठी अवैध पद्धतीने देण्यात आले असणे, सदरहू गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाहीव प्रतिक्रिया."

---

**उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

मौजे व्यारवली, अंधेरी (पूर्व), न.भू.क्र. २५ येथील त्र्यंबककर इस्टेट एस. आर. ए. गृहनिर्माण संस्थेसाठीचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव विकासक मे. बिंद्रा सतेरी कन्स्ट्रक्शन्स यांच्या वतीने अनुज्ञाप्राप्ती धारक सर्वेक्षक मे. एलोरा प्रोजेक्ट कन्सल्टंट प्रा. लि. यांनी प्राधिकरणाकडे सादर केला होता. सदर प्रस्ताव दि.०७/०१/२०१५ रोजी स्वीकृत करण्यात आला आहे. तद्नंतर सदर योजनेसाठी सुधारित आशयपत्राचा प्रस्ताव नवनियुक्त वास्तुविशारद श्री. अरुणकुमार दुबे यांनी दाखल केला असून त्यानुसार सुधारित आशयपत्र (LOI) दि.०३/१०/२०१७ रोजी निर्गमीत करण्यात आले आहे.

मौजे व्यारवली, न.भू.क्र. २५ हा भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाकरीता भूसंपादनासाठी प्रस्तावित होता. त्यानुसार भूसंपादन अधिकारी यांनी सदर जमिनीचा निवाडा दि.०६/०१/१९६८ रोजी घोषित केला होता. परंतु सदर जमिनीचा ताबा प्रस्तावित प्रयोजनाकरीता न घेतल्याने जमिनीचे मुळ मालक श्री. बी. आर. त्र्यंबककर यांच्यातर्फे श्री. पी. एस. बिंद्रा यांनी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांचेकडे अपील दाखल केले होते. सदर अपील अर्जावर मा. मंत्री (महसूल) यांनी दि.०२/०१/२०१४ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले :-

मौजे-व्यारवली, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर, सर्वे क्र. ५, हिस्सा क्र. १ (न.भू.क्र. २५) या जमिनीपैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रस्त्याखालील क्षेत्र व भखंड क्र. सी-५ ( क्षेत्र ९५० चौ.मी.) हे क्षेत्र

वगळता उर्वरित क्षेत्र भूसंपादनातून कमी करण्यासाठी शासनाची मान्यता प्रदान करण्यात येते. या अनुषंगाने भूसंपादन कक्षाने आवश्यक आदेश निर्गमित करावेत. तथापि, सदर आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ उपविभाग, अंधेरी (पूर्व) यांच्या अभिप्रायात योजनेखालील भूखंड हा शासन मान्यतेने भूसंपादनातून वगळण्यात आल्याचे नमूद केले आहे. तसेच असे देखील नमूद केले आहे की, स.क्र.५, हिस्सा क्र.१ (न.भू.क्र. २५) या जमिनीपैकी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या रस्त्याखालील क्षेत्र व भूखंड क्र. सी -५ (क्षेत्र ९५० चौ.मी.) वगळून उर्वरित महामंडळाच्या अखत्यारीत नसल्यामुळे महामंडळाच्या विशेष नियोजन प्राधिकरणाकडून मंजुरी देता येत नाही. महामंडळाच्या रस्त्याखालील क्षेत्र (महामंडळाच्या नकाशानुसार) रोड क्र. २२ मे. बिंद्रा कन्स्ट्रक्शन यांनी स्वखर्चाने बांधावा, कंपनी धारकांना पर्यायी रस्ता नसल्यामुळे न.भू.क्र. २५ विकसित झाल्यानंतर सदर रस्त्याचा वापर करण्यात येईल. मा.मंत्री (महसूल) यांनी पारीत केलेले आदेश, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ उपविभाग, अंधेरी (पूर्व) यांचे अभिप्राय तसेच विकासकाने सादर केलेल्या मालमत्ता पत्रकाच्या आधारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून सदर योजनेस आशयपत्र निर्गमीत करण्यात आले आहे.

सदर योजनेचे एकूण क्षेत्रफळ ३९३८.०० चौ.मी. इतके असून, सदर क्षेत्रफळापैकी ३०६९.२ चौ.मी. क्षेत्रफळ झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत आहे. उर्वरित ८६८.८० चौ.मी. क्षेत्र हे झोपडपट्टी विरहीत क्षेत्र आहे. मंजूर विकास आराखडयानुसार योजनेखालील भूखंड हा औद्योगिक क्षेत्रामध्ये (I-3 Zone) मोडत आहे.

विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(१०) Appendix-IV उपखंड ७.२ मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राखालील I-3 Zone मध्ये मोडणाऱ्या भूखंडाकरीता विकास नियंत्रण नियमावलीच्या विनिमय ५७ अन्वये सुविधा भूखंड प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही. तसेच औदयोगिक क्षेत्रामध्ये रहिवासी वापराकरीता परवानगी घेण्याची देखील आवश्यकता नाही.

उर्वरीत ८६८.८० चौ.मी. मोकळ्या भूखंडापैकी १८५.१२ चौ.मी. क्षेत्रफळ हे रस्त्याने बाधित होत आहे. त्यामुळे उर्वरित ६८३.६८ चौ.मी. क्षेत्रफळावर विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ५७ नुसार ५ % सुविधा भूखंड म्हणजेच ३४.१८ चौ.मी. भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक होते. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. ३०/०३/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार ज्या योजनांमध्ये रस्त्याखालील जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली नाही; तसेच हस्तांतरीत करावायच्या सुविधा भूखंडाच्या बदल्यात रस्त्याखालील भूखंडाचे क्षेत्रफळ जास्त आहे. अशावेळी सदर सुविधा भूखंड हस्तांतरीत करण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे ३४.१८ चौ.मी. सुविधा भूखंड हस्तांतरीत करावयाचे होते. परंतु रस्त्याखालील भूखंडाचे क्षेत्रफळ हे १८५.१२ चौ.मी. असल्याने व ते सुविधा क्षेत्र भूखंडाच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त असल्याने योजनेस सुधारीत आशयपत्र निर्गमित करताना सदर अट काढून टाकण्यात आली आहे.

********

**श्री. संजय रायमुलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"दादर, मुंबई येथील समाधान सहकारी गृहनिर्माण संस्था (झो.पु.प्रा.) येथील विकासक रेर्नसन कंस्ट्रक्शन यांनी झोपुप्रा परिपत्रक क्र.५३ चा लाभ/ सूट घेवून प्रकल्पग्रस्त सदनिका महापालिकेस उपलब्ध न करता विकासक यांनी सदर मालमत्तेमध्ये महापालिकेचे ३० करोड रुपयांचे अतिरिक्त विकास क्षेत्र व ३० करोड रुपयांची ३८ प्रकल्पग्रस्त सदनिका गिळंकृत करणे, तसेच सदर योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात झोपुप्रा. शासकीय व मुंबई महानगरपालिका अधिकारी वर्गाने सदर विकासकांच्या ६० करोडच्या आर्थिक फायद्याकरिता मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याबाबत दि.१.११.२०२२ रोजीच्या सुमारास मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना योगेश खेमकर यांनी तक्रार दिली होती, परंतु मुंबई महापालिका व झोपुप्रा यांनी वेळोवेळी अर्जदारांच्या तक्रारीला बगल देऊन व शासनाला खोटा अहवाल सादर करून अप्रत्यक्षरित्या गैरव्यवहारातून विकासकास अनियमितता व अगुणवत्तेच्या आधारावर मदत करुन विकासकास करोडो रुपयांचा फायदा करवून दिला आहे, त्यामुळे विकासकासह संबंधित जबाबदार शासकीय अधिका-यांनी केलेल्या अनागोंदी कारभाराबाबत शासनाचे झालेले अतोनात नुकसान व फसवणूकीसाठी विकासकांकडून करोडोंचा महसूल वसूल करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक खाते व गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडून सखोल चौकशी होण्याकरिता शासन स्तरावरती ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

नगर रचना योजना, माहीम विभाग, दादर (पश्चिम) या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंड क्र.१३ वरील अस्तित्वातील झोपडपट्टीमधील झोपडीधारकांनी समाधान एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) स्थापन करून विकासक मे. रेनिसन्स कन्स्ट्रक्शन व वास्तुविशारद श्री. एस. जी. दळवी यांच्यामार्फत विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र.३३(१०) अंतर्गत राबवावयाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा रितसर प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयास दि.०१.०२.२०१० रोजी सादर केला होता. सदर योजनेंतर्गत बांधावयाच्या दोन विंग ( विंग 'ए' व 'बी' ) असलेल्या संयुक्त इमारतीचे नकाशे मंजूर करण्यात आले. तसेच दि. १७.०१.२०११ रोजी सदर संयुक्त इमारतीस बांधकाम परवाना प्रमाणपत्र (सी.सी) देण्यात आले.

न. भू.क्र.२/२९२(भाग), ११/२९२ (भाग) व १८ / २९२, माटुंगा डिव्हीजन येथील साईदर्शन (एस.आर.ए) सह. गृह.संस्था (मर्या.) या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसोबत एकत्रीकरण (clubbing) करावयाचा प्रस्ताव वास्तुविशारद श्री. एस. जी दळवी यांनी दि.१३.०४.२०१२ रोजी सादर केला होता. सदर एकत्रीकरणाच्या प्रस्तावास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम क्र. ३३ (१०) च्या परिशिष्ट-४ मधील उप विनियम क्र. ७.८ च्या तरतुदीनुसार, दि. १०.०५.२०१२ रोजीच्या सुधारीत आशयपत्राद्वारे मंजुरी देण्यात आली. सदर आशयपत्रानुसार योजनेंतर्गत एकूण ( ४७+१४) = ६१ प्रकल्पाग्रस्तांकरीताच्या सदनिका (पी.ए.पी.) प्रस्तावित होत्या. तथापि, तद्नंतर समाधान एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित) मधील

रेप म/१०४४ (750-2-23) टिकानाप.

अतिरिक्त झोपडीधारक पात्र ठरल्यामुळे दि.०६.०१.२०१५ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आले. त्यानुसार एकूण ५२ प्रकल्पग्रस्त सदनिका (पी.ए.पी.) मंजूर होत्या.

एकत्रीकरण केलेल्या सदर योजनेंतर्गत वेळोवेळी सुधारीत नकाशे मंजूर करण्यात आले. समाधान (एस.आर.ए) सह.गृह. संस्थेच्या विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील तळ + ७ मजले असलेल्या पुनर्वसन विंग 'ए' करिता दि. ३०.०७.२०१४ रोजी व विक्री घटकाच्या विंग 'बी' करिता दि. ०७.०८.२०१५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले, तसेच साई दर्शन (एस. आर. ए -सह. गृह, संस्थेच्या संयुक्त इमारतीस दि. ३०.०५.२०१५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. साईदर्शन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजने सोबत केलेल्या एकत्रिकरणास (Clubbing) विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र. ३३ (१०) च्या परिशिष्ट- ४ मधील कलम ७.८ च्या तरतुदीनुसार परवानगी देण्यात आली असून पी. ए. पी. सदनिकांचे साईदर्शन सह. गृहनिर्माण संस्थेच्या योजनेमध्ये स्थलांतरण करण्यात आले आहे.

सदर एकत्रित योजनेत ५२ प्रकल्पग्रस्तांच्या सदनिका (PAP Ts) बांधण्यात आल्या होत्या. संचालक (प्रकल्प), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांनी त्यांच्या दि.१६.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये, मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाने बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी सदर योजनेतील ४१ पी.ए.पी. सदनिका व ३ सुविधा सदनिका, अशा एकूण ४४ सदनिकांची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे केली होती. त्यावेळी साईदर्शन (एस.आर.ए) सह. गृह संस्था (मर्या.) मधील १८ झोपडीधारकांची पात्रता अपिलात निर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे सदर १८ झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी भविष्यकाळातील सदनिकांची गरज विचारात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी (झो.पु.प्रा) यांच्या मंजुरीनुसार ३४ पी.ए.पी सदनिका मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला हस्तांतरीत करण्यात आल्या. तसेच दि. ३०.१०.२०१५ रोजी ताबा पावती देण्यात आली. तद्नंतर उर्वरीत १८ झोपडीधारकांपैकी १६ झोपडीधारक पात्र ठरल्यामुळे त्यांना योजनेतील उर्वरीत १८ सदनिकांपैकी १६ सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरित ०२ पीएपी सदनिका मिळकत विभाग, झोपुप्रा यांच्या ताब्यात आहेत. याबाबत श्री. योगेश खेमकर यांनी मा.लोक आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नसल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन ती तक्रार मा. लोक आयुक्त यांनी त्यांच्या दि.२६.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये बंद केलेली आहे.

उपरोक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजना सन, २०१५ मध्ये पूर्ण होऊन या योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या संयुक्त इमारतीस दि. ०७/०८/२०१५ रोजी संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखालील संपूर्ण भूखंड हा झोपडपट्टीने व्याप्त होता, भूखंडावर गल्ली-बोळा व्यतिरिक्त कोणतीही मोकळी जागा नव्हती. त्यामुळे या पुनर्वसन प्रकल्पात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.५३ नुसार मोकळी जागा परत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. या योजनेंतर्गत विकासकास कोणतेही अतिरिक्त विकास क्षेत्र देण्यात आलेले नाही. विनियम ३३ (१०) नुसार अनुज्ञेय असलेले विक्री घटकाचे क्षेत्र मंजूर करण्यात आलेले आहे. तक्रारदाराने तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे कोणतेही अतिरिक्त क्षेत्र अंतर्भूत केलेले नाही. तसेच शासनाच्या कोणत्याही प्रकल्पग्रस्त सदनिका गिळंकृत करण्यात आलेल्या नाहीत.

********

**श्री. अजय चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" " मुंबईतील एफ उत्तर विभागातील प्लॉट नं. ८ ९ (पी.टी.) या भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, संबंधित विकासकाने उक्त भुखंडावर सदगुरू एसआरए गृहनिर्माण संस्थेचे अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले असणे, सदर बांधकाम करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या मंजूरी पेक्षा जास्तीचे बांधकाम करणे, २६७ चौ. फूटाच्या सदनिका बांधकामास मंजूरी असतांना ३६१ चौ. फूटाच्या सदनिकांचे बांधकाम करणे, तसेच इमारतीचे बांधकाम सुरू असतांना झोपू प्राधिकरणाडून १ ते १० मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणे, मंजूर आराखड्याप्रमाणेच इमारतीमध्ये ७ लिफ्ट लावणे आवश्यक असतांनाही सदर विकासकाने इमारतीतील रहिवाश्यांना लिफ्टची सुविधा न देणे, इमारतीच्या मंजूर आराखड्या प्रमाणे बांधकाम नसतांना देखील इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देणे, विकासकाने हा सर्व गैरप्रकार जीएसटीची रक्कम भरण्यापासून वाचण्यासाठी केलेली असणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व विकासकाला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एसआरएकडे केलेली असणे, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करून संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही." "

---

## मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

विषयांकीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना एफ/ उत्तर विभागातील प्लॉट नं. ८९ (पी.टी.) सॉल्ट विभाग (क्षेत्रफळ ४२०१.२७ चौ.मी.) या भूखंडावर सदगुरू गृहनिर्माण संस्था म्हणून विकसित करण्याकरीता विकास नियंत्रण नियमावली-१९९१ नुसार २६९ चौ. फूट सदनिकाकरीता दि. १९.०९.२००८ रोजी आशयपत्र देण्यात आलेले आहे. तद्नंतर सदर योजनेस सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०३४ नुसार ३०० चौ.फूट सदनिकांकरीता दि. ०१.०७.२०२० रोजी सुधारीत आशयपत्र (Revised LOI) देण्यात आलेले आहे. यानुसार विकासकामार्फत योजनेचे बांधकाम सुरू करण्यात आलेले आहे. सदर योजनेत एकूण १८६ झोपडपट्टीधारक आहेत. तसेच योजनेत विठ्ठल रखुमाई रामनगर सहकारी गृहनिर्माण संस्था योजनेतील एकूण ३० झोपडीधारक व समता सहकारी गृहनिर्माण संस्थेतील एकूण ११ झोपडीधारकांचे सदगुरू सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजनेत एकत्रिकरण करुन विकासकास दि. १५.०६.२०१२ रोजी नव्याने एकत्रित आशयपत्र देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सदगुरू सहकारी गृहनिर्माण संस्थेतील समप्रमाणात विक्री घटकाचे क्षेत्रफळ हे उपरोक्त नमूद दोन्ही योजनेत समाविष्ट करण्यात आलेले आहे.

रा.टे.H/1066 (750-2-23) ८ क्र अ.प.

सद्य:स्थितीत सदगुरू गृहनिर्माण संस्थेमधील पुनर्वसन इमारतीस दि.०८.०९.२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) देण्यात आलेले आहे. यामध्ये सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०३४ नुसार ३०० चौ.फूट प्रमाणे सर्व झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. तसेच सदर पुनर्वसन इमारतीत मंजूर आराखड्यानुसार ४ उदवाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर योजनेत विक्री घटकाचे ४० मजले बांधण्यास मंजुरी दिलेली असून ३८ मजल्याचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या इमारतीमध्ये १० मजल्यांसाठी भागश: भोगवटा प्रमाणपत्र दि.१०.०८.२०२२ रोजी देण्यात आलेले आहे. तर विक्री घटकाच्या इमारतीत मंजूर नकाशाप्रमाणे ७ उदवाहनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर योजनेबाबत माहे डिसेंबर, २०२२ मध्ये तक्रार प्राप्त झालेली नाही.

******

# महाराष्ट्र विधानसभा

**डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.अजित पवार, श्री.जयंत पाटील, श्री.छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिल पाटील, श्री.यशवंत माने, श्री.शेखर निकम, श्री.दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री.रोहीत पवार वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२४**

**"कोल्हापूर, सांगली, सातारा परिसरातील पावसाचे अतिरिक्त पाणी कर्नाटकातील अलमट्टी धरणात जमा केले जात असणे, दरवर्षी पावसाळयात होणा-या अतिवृष्टीत कर्नाटकमध्ये उभारण्यात आलेल्या अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे नेहमीच महापुराचा सामना करावा लागत असणे, त्याचा प्रचंड फटका येथील नागरीकांना बसत असून जीवित तथा वित्त हानीस सामोरे जावे लागत असणे, सुरवातीस ५०० मीटर उंचीच्या अलमट्टी धरणाची उंची कर्नाटक सरकारने वेळोवेळी आणि वेगवेगळी कारणे देत ५०५, ५१२ नंतर ५१९ आणि आता ५२४ मीटरपर्यंत वाढविण्याचा धक्कादायक निर्णय जाहीर केलेला असणे, वास्तविक पाहता अलमट्टी धरणाची असलेली ४९८.९४ मीटरची तळपातळीमध्ये जसजसे धरण भरत जाते तसतसे त्याचे बॅकवॉटर कृष्णा आणि पंचगंगा नद्यांच्या माध्यमातून सांगली-कोल्हापूरकडे सरकायला सुरूवात होत असणे, अलमट्टी धरण ५१९ मीटरपर्यंत भरताच सांगलीतील पाण्याची पातळी ५२७ वरून ५४६ म्हणजेच १९ मीटरने वाढत असणे व कोल्हापुरातील पंचगंगेच्या पाणी पातळीतही ५३० वरून ५४९ मीटरपर्यंत वाढत होत असून अनेकदा कृष्णेची सांगलीत ५७ फुटापर्यंत पाणीपातळी जात असणे, अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे या दोन जिल्हयातील शेकडो गावे आणि हजारो हेक्टर शेती पाण्याखाली जात असणे, कोल्हापूर, सांगलीत महापूराची परिस्थिती निर्माण झाल्यास अलमट्टी धरणातील पाणी सोडल्यास येथील महापूर ओसरत असल्याचे स्पष्ट झालेले असतांनाही कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची १६.५ फुटांनी वाढण्याची कार्यवाही सुरू केलेली असल्याने सांगली, कोल्हापूर जिल्हयात पलयंकारी महापूर येऊन प्रचंड हाहाकार निर्माण होणार असणे, असे असतांनाही महाराष्ट्र शासनाकडून कोणत्याही प्रकारची प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जात नसल्याची चिंताजनक परिस्थिती उघडकीस येणे, येथील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधींनी, शेतकरी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री तथा मा.पालकमंत्री यांचेकडे दि.०७ डिसेंबर, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी करूनही आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, प्रत्येक पावसाळयात महापूरामुळे जिवीत तथा वित्त हानीला नेहमीच सामोरे जावे लागत असल्याने त्यांचेमध्ये भिती, चिंतेची तथा असुरक्षिततेची भावना पसरलेली असणे, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी दि.१९ डिसेंबर, २०२२ पासून सुरू होणा-या नागपूर येथील विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, या चिंताजनक परिस्थितीसंदर्भात युध्दस्तरावर कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."**

---

## मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

उपरोक्त विषयाबाबत विधानमंडळ सचिवालयाकडुन प्राप्त महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१२४ नुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे:-

- कृष्णा ही आंतरराज्य नदी असून ती महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशातून वाहते. ही नदी महाराष्ट्रातील महाबळेश्वर जवळ उगम पावून आंध्रप्रदेशातील राजमहेंद्री येथे बंगालच्या उपसागराला मिळते.
- कृष्णा नदीच्या एकुण १४०० कि.मी. लांबीपैकी महाराष्ट्र राज्यातील कृष्णा नदीचा प्रवास २८२ कि.मी. आहे. महाराष्ट्र हद्दीत कृष्णा नदीस कोयना, पंचगंगा, दुधगंगा व वारणा या महत्वाच्या उपनद्या मिळतात.

शोध H/1167 (70D-2-23)

- महाराष्ट्र-कर्नाटक राज्यांच्या हद्दीपासुन २३५ कि.मी. अंतरावर कृष्णा नदीवर कर्नाटक राज्याने अलमट्टी धरण बांधलेले आहे. या धरणाची पूर्ण संचय पातळी ५१९.६० मी. असून प्रकल्पीय साठा १२३.०० अघफू आहे. अलमट्टी धरणात २००५ साली प्रथमच पूर्ण संचय पातळीपर्यंत पाणी साठवण्यात आले होते.
- कर्नाटक शासनाने उर्ध्व कृष्णा प्रकल्पांतर्गत अलमट्टी व नारायणपूर धरणाचे नियोजन सन-१९६३ पासून सुरू केले होते. पहिल्या कृष्णा पाणी तंटा लवादासमोर या प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध होण्यासाठी मागणी करण्यात आली होती. तथापि, लवादाने वाढीव पाणी उपलब्ध होत नसल्याने अलमट्टी धरणाचा पाणीसाठा ५१९.६० मी. पर्यंत करण्यास सांगीतले.
- कृष्णा पाणी तंटा लवाद-२ समोर कर्नाटक शासनाने अलमट्टी धरणाची उंची ५२४.२५६ मी. पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव सादर केला होता. सन २००५-२००६ मध्ये आलेल्या महापूराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावास विरोध केला होता. याबाबत लवादाने नेमलेल्या M/s Tojo Vikas International (Pvt) Ltd. या संस्थेने अभ्यासाअंती सादर केलेल्या अहवालानुसार, अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यास त्याचा महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये परिणाम होणार नाही असा अहवाल सादर केला. त्यामुळे दुस-या कृष्णा पाणी तंटा लवादाने कर्नाटक शासनास अलमट्टी धरणाची उंची ५२४.६० मी. पर्यंत वाढविण्यास परवानगी दिली आहे.
- सन-२०१९ च्या पावसाळयात जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये कृष्णा खो-यात अतिपर्जन्यमानामुळे अभूतपूर्व पूरपरिस्थिती उद्भवली होती. विशेषत: सांगली व कोल्हापूर जिल्हे मोठया प्रमाणात बाधित झाले. मोठया प्रमाणामध्ये जीवित व वित्त हानी झाली.
- सांगली शहराजवळ आयर्विन पूल कृष्णा नदीची धोका पातळी ४५ फूट असून सांगली शहराच्या वरील धरणाच्या व मुक्त पाणलोट क्षेत्रात दि.२७.०७.२०१९ ते दि.१३.०८.२०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या विर्सगामुळे नदीपात्रात पाण्याची पातळी टप्प्या-टप्प्याने वाढत जावून ५०.५ फूटापर्यंत पोहोचली.
- कोल्हापूर शहराजवळ राजाराम बंधारा येथे पंचगंगा नदीची धोका पातळी ४३ फूट असून कोल्हापूर शहराच्या वरील धरणांच्या व मुक्त पाणलोट क्षेत्रात दि.२७.०७.२०१९ ते दि.१३.०८.२०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या विसर्गामुळे नदीपात्रात पाण्याची पातळी टप्प्या-टप्प्याने वाढत जावून ५५ फूट ७ इंचापर्यंत पोहोचली.
- त्याअनुषंगाने भिमा व कृष्णा खो-यात सन-२०१९ मध्ये उद्भवलेल्या पूरपरिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाययोजनात्मक अहवाल तयार करण्यासाठी जलसंपदा विभागाने शासन निर्णय क्र.पूरनि-२०१९/प्र.क्र.२९१/२०१९/सिंव्य(म), दि.२३ ऑगस्ट, २०१९ अन्वये श्री.नंदकुमार वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली जलक्षेत्रातील विश्लेषक यांची तज्ञ समिती स्थापन केली. या कृष्णा पूर अभ्यास समितीने कृष्णा उपखो-याचा अभ्यास अहवाल दि.२७ मे, २०२० रोजी शासनास सादर केलेला आहे.
- या समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यानंतरही अलमट्टी व हिप्परगी धरण हे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरपरिस्थिती निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, अलमट्टी धरणातील पाणीसाठा उंची वाढविल्यानंतरही पाण्याचा फुगवटा कर्नाटक हद्दीतच राहतो असे नमूद केले आहे.

- जलसंपदा विभागाने शासन निर्णय क्र.पूरनि-२०२१/प्र.क्र.२७५/२०२१/सिंव्य(म), दि.१२ ऑक्टोंबर, २०२१ अन्वये कृष्णा पूर अभ्यास समितीने (वडनेरे समिती) दि.२७ मे, २०२० रोजी सादर केलेल्या अहवालातील १८ शिफारशी पैकी १० स्वीकृत, ५ अंशत: स्वीकृत, १ सुधारणेसह स्वीकृत व २ अस्वीकृत केल्या आहेत.
- सदर समितीच्या स्वीकृत व अंशत: स्वीकृत शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही सूरू आहे. धरणांचे जलाशय परिचालन आराखडे सुधारीत करण्यात येत आहेत. तसेच पूर पूर्वानुमान प्रणाली अद्ययावत करण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.
- पूर नियंत्रणासाठी शासनाने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने सांगली व कोल्हापूर जिल्हयातील पूरविषयक उपाययोजनांच्या कामांचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करून महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.मकृखोविम-२९/(४५०/२०२१)/३४१४, दि.२३.०५.२०२२ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.
- या प्रस्तावामध्ये संपूर्ण खो-यामध्ये प्रगत तंत्रज्ञानाचे Real Time Data Acquisition System (RTDAS) कार्यान्वित करणे, जलाशय परिचालन आराखडे सुधारीत करणे, मुख्य नदीच्या लांबीतील सर्व भागात पूररेषा आखणी करणे, नदी व मोठे नाले रूंदीकरण करणे, खोलीकरण करणे व त्यातील गाळ काढणे, नदीला पूरसंरक्षक बांध घालणे इत्यादी पूर नियंत्रण विषयक उपाययोजना कामांचा समावेश आहे.
- या उपाययोजना कामांसाठी जागतिक बँक अर्थसहाय्य करणार असून जागतिक बँकेमार्फत तयार करण्यात आलेला प्राथमिक प्रकल्प अहवाल व उपाययोजना कामांचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.मकृखोविम-११/(४४९/२०२२)/७४४८, दि.११.११.२०२२ अन्वये शासनास मान्यतेसाठी प्राप्त झाला असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
- प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर पूर नियंत्रण उपाययोजना कामांचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करून सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्याबाबत संबंधित कार्यालयांना सूचित करण्यात येईल.

**********

## लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. संजय शिरसाट, सन्माननीय विधान सभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना २००६ पुढीलप्रमाणे आहे.:-

"नाशिक, कोपरगाव येथील पाटबंधारे विभागात उपविभागीय पदावर असताना सागर शिंदे यांनी अभियंता श्री. मिसाळ यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन कॅनलच्या कामात प्रत्यक्षात काम न करता कोटयावधी रुपयांचा शासकीय निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदरहू अधिकारी यांनी त्र्यंबकेश्वर येथील घाट व गोदावरी नदीचा घाटाच्या बांधकामात स्टीलचे बार कमी वापरुन गैरप्रकार करुन भ्रष्टाचार करणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली असता सदरहू अधिकारी यांचेवर कारवाई न करता केवळ वेतनवाढ बंद करणे, अदयाप याबाबत चौकशीची कार्यवाही पूर्ण न होणे, जलसंधारण विभागात पदोन्नतीने कार्यकारी अभियंता पदावर रुजू झाल्यापासून सागर शिंदे या अधिकाऱ्याने मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात येऊन गिरणारे व चांदशी येथे ६ एकर जमीन विकत घेऊन व त्यावर आंब्याची लागवड करुन काही जागेत कोटयावधी रुपये किंमतीचा बंगला बांधण्यात येणे, पर्यटनाची कामे अधिकची जास्तीची टक्केवारी दिली नसल्यामुळे २/३ वर्षे तसेच पडून राहणे, तसेच शिंदे यांनी नाशिक पाटबंधारे विभागात दरवर्षी कॅनलचा गाळ काढणे, गवत काढण्याकरिता मिळणारा १०-१५ कोटी रुपये निधी प्रत्यक्षात कोणतेच काम न करता, काम केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात येऊनही हया कालव्यांमध्ये मोठया प्रमाणावर झाडे व गवत वाढलेले दिसत असणे, सदरहू कामात कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात येऊन शासकीय निधीचा मोठया प्रमाणात झालेला अपव्यय, कॅनलची दुरुस्ती व देखभाली अभावी या परिसरातील शेती सिंचनावर त्याचा झालेला अनिष्ट परिणाम, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या सर्व बाबींची व सागर शिंदे यांनी यापूर्वी केलेल्या सर्व कामांची गुणनियंत्रक व दक्षता पथकामार्फत चौकशी करुन श्री. सागर शिंदे व अभियंता श्री. मिसाळ यांना तातडीने निलंबित करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

श्री. सागर शिंदे व श्री. सुभाष मिसाळ हे गोदावरी उजवा तट कालवा, उपविभाग राहता, जि.अहमदनगर येथे अनुक्रमे उपअभियंता व शाखा अभियंता पदावर कार्यरत होते. सन २०१०-११ या कालावधीत देखभाल दुरुस्तीची कामे करताना झालेल्या अनियमिततेबाबत श्री सागर शिंदे, तत्का. सहा. अभियंता श्रेणी-१ व श्री. सुभाष कारभारी मिसाळ, तत्का. शाखा अभियंता यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अनुसार एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. या विभागीय चौकशीअंती श्री. शिंदे व श्री. मिसाळ यांना दि.०४.०९.२०१८ च्या शासन आदेशान्वये " त्यांची पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षाकरिता रोखण्यात यावी." अशी शिक्षा देण्यात आली आहे.

श्री. सागर शिंदे, तत्का, सहायक अभियंता श्रेणी-१ हे दि. १६.०७.२००९ ते दि. १९.०५.२०१६ या कालावधीत गोदावरी उजवा तट कालवा उपविभाग, राहता येथे कार्यरत होते. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीवर सन २०१५ मध्ये सिंहस्थ दरम्यान घाटाची कामे करण्यात आली. सदर कामे गुण नियंत्रण विभागाच्या देखरेखीखाली पार पाडलेली आहेत.

शासन आदेश, जलसंपदा विभाग, दि. १९ मे,२०१६ अन्वये श्री. सागर शिंदे यांची कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नती झाली. त्यांना जलसंधारण विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक येथे पदस्थापना देण्यात आली. या पदावर श्री सागर शिंदे हे दि. २०.०५.२०१६ ते दि.१४.०६.२०१९ या कालावधीत लघु स्तर जलसंधारण विभाग, नाशिक येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. या कालावधीत जलसंधारण विभागाकडून त्यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित नाही.

श्री. सागर शिंदे यांनी त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेबाबत सन २०१६-१७ ते सन २०१९-२० अखेरची मत्ता व दायित्त्वाची विवरणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांना वेळो-वेळी सादर केली आहेत.

श्री. सागर शिंदे, कार्यकारी अभियंता हे बदलीने दि. १२.१२.२०१९ पासून जलसंपदा विभागांतर्गत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक येथे कार्यरत आहेत. श्री सागर शिंदे यांच्या कार्यकाळात पर्यटन विभागासोबत डिसेंबर,२०२० मध्ये करारनामा करून गंगापूर धरणावरील बोटक्लब कार्यान्वित करण्यात आला आहे. नाशिक पाटबंधारे विभागांतर्गत ४ मोठे, ४ मध्यम, ३५ लघु व १० को प. बंधारे असे एकूण ५३ प्रकल्प व त्या प्रकल्पांतर्गतचे सुमारे ४३० कि. मी. लांबीचे मुख्य कालवे, ११५० कि.मी. लांबीच्या वितरिका व त्यावरील एकूण १,००,७९५ हे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र येते. देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रकल्पांवरील यांत्रिकी भागाची दुरुस्ती तसेच प्रकल्प व कालव्याची नियमित व आकस्मिक देखभाल दुरुस्ती करण्यात येते. उपलब्ध निधीतून दरवर्षी कालव्याच्या काही ठराविक लांबीतील कामाची देखभाल दुरुस्ती करणे शक्य असते. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

सदर प्रकल्प व कालव्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी झालेला निधी/खर्च, प्रत्यक्ष सिंचन व वसूल करण्यात आलेली पाणीपट्टी ची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | निधी/खर्च (रु. लक्ष) | प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र (हे.) | पाणी पट्टी वसुली (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| २०१९-२० | १३०६.०० | ११७२४१ | ५७९७ |
| २०२०-२१ | १४४६.७९ | १४६६२८ | ४८०० |
| २०२१-२२ | २०७९.९८ | ११७७६६ | ५५२६ |

वरील वस्तुस्थितीच्या आधारे श्री. सागर शिंदे यांच्या कार्यकाळात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक अंतर्गतच्या सर्व प्रकल्पांतर्गतची पाण्याची आवर्तने सुरळीतपणे पार पाडल्याचे व धरण/ कालवा दुरुस्तीची कामे पार पाडल्याचे निदर्शनास आले असून दि. १२.१२.२०१९ ते आजपावेतो त्यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रलंबित नाही.

**********************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

चतुर्थ

श्री. रवि राणा, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११७९ खालीलप्रमाणे आहे :-

"अमरावती जिल्ह्यातील भातकुली हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी तालुक्याच्या तहसील कार्यालयासह व इतरही संबंधित कार्यालय एकत्रित कार्यालय प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मौजे भातकुली भाग क्र. १ सरकारी ई क्लास गट न.३६५.३६०,२०७ या जागेवर करण्यासाठी व अधिकारी कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम मंजूर करण्यासाठी सरकारकडे संबंधित लोकप्रतिनिधिनी वेळोवेळी मागणी केली असणे त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय तिवसा, भातकुली यानी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ११५८/२०२२ दिनांक ३१.१०.२०२२ रोजी तहसीलदार यांना सर्व संबंधित एकत्रित जागेचा प्रस्ताव मागविला असणे त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी महसूल विभाग यांचे पत्र क्रमांक ४६८-२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व माहिती मागविली असणे सदर लोकाभिमुख बाब लक्षात घेण्याची आवश्यकता असणे त्याप्रमाणे सर्व एकत्रित तालुका कार्यालय एका ठिकाणी भातकुली या ठिकाणी असणे गरजेचे असणे संबंधित लोकप्रतीनिधी यांनी सर्व शासकीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यासोबत माहे ऑक्टोबर, २२ चे दरम्यान बैठक घेतली असणे तरीही अद्याप पर्यंत प्रस्ताव शासनाकडे जिल्हाधिकारी यांच्याकडून पाठविला नसणे जिल्हाधिकारी यांना शासनाने प्रस्ताव मागून प्रस्तावाला मान्यता देण्याची आवश्यकता वेळीच दखल घेऊन करावयाची कार्यवाही सरकारची भूमिका."

---

**मा. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

भातकुली तालुक्याची स्थापना सन १९८१ मध्ये झाली आहे. तथापि, सन १९८१ पासून भातकुली तालुक्याचे तहसिल कार्यालय अमरावती येथे कार्यान्वित असल्याने भातकुली तालुक्यातील नागरीकांना शासकीय कामासाठी अमरावती येथे जावे लागत असल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे नमूद करून तहसिल कार्यालय भातकुली येथे स्थलांतरीत करणेबाबत स्थानिक संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी विनंती केली होती.

मा. श्री. रवि राणा, विधानसभा सदस्य, यांनी दिनांक २९.०२.२०१६ च्या पत्रान्वये भातकुली तहसिल कार्यालयाचे मुख्यालय अमरावती येथून भातकुली येथे स्थलातंरीत करणेबाबत मागणी केली होती. त्यावरील तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या निर्देशास अनुसरून शासनाच्या दिनांक १३.०३.२०१६ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला.

त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ०८.०५.२०१७ व जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ३१.०३.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालात भातकुली तहसिल कार्यालय, अमरावती येथून भातकुली येथे स्थलांतरीत करण्यात यावे, अशी शिफारस केली.

विभार्गाय आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक ०८.०५.२०१७ च्या शिफारशीनुसार, भातकुली तहसिल मुख्यालय भातकुली येथे स्थलांतरीत करण्याबाबतची दिनांक ३१.०८.२००९ ची प्रारुप अधिसूचना अंतिम करण्याच्या विभागाच्या प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाली. त्यास अनुसरून अमरावती कॅम्प येथील भातकुली तहसिल कार्यालयाचे मुख्यालय भातकुली येथील प्रशासकीय इमारतीत स्थलांतरीत करण्यासंदर्भात अंतिम अधिसूचना विधी व न्याय विभागाच्या सहमतीने दिनांक २५.११.२०१९ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सद्य:स्थितीत भातकुली येथे तहसिल कार्यालय कार्यरत आहे.

तद्नंतर, दिनांक २५.११.२०१९ रोजी प्रसिद्ध सदर शासन अधिसूचनेविरूद्ध श्री. अमरदीप तेलखडे यांनी रिट याचिका क्र.७८८०/२०१९ दाखल केली. सदर न्यायालयीन प्रकरणी दिनांक ०५.१२.२०१९ रोजी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे सुनावणी झाली. सुनावणीअंती मा.उच्च न्यायालयाने सदर याचिका निकाली काढली आहे.

तथापि, भातकुली तहसिल कार्यालय, अमरावती येथील त्याच ठिकाणी ठेवणेबाबत मा. मंत्री (महिला व बाल विकास ) यांनी तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांना लिहिलेल्या दिनांक १८.०१.२०२० च्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी उपविभागीय अधिकारी, भातकुली व तहसिलदार, भातकुली यांना दिनांक २०.०१.२०२० च्या पत्रान्वये मा. मंत्री (महसूल) यांच्या निर्देषानुषंगे अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

---

सदर आदेशाविरूद्ध श्री. गिरीष कसाट व इतर यांनी महाराष्ट्र शास॰ व इतर यांच्याविरूद्ध मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.५२५/२०२० दाखल केली आहे. विषयांकित न्यायालयीन प्रकरणात दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी सुनावणी झाली असून सदर सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत व प्रकरणी उचित निर्णय घेण्याबाबत राज्य शासनास निर्देश दिले असून सदर प्रकरणाची पुढील सुनावणी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दि.१०/०३/२०२३ रोजी होणार आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय जो निर्णय देईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

***********

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक १५३८</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री. प्रकाश सुर्वे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"बोरिवली येथे ( मुंबई उपनगर ) कार्यरत असलेले नगर भूमापन अधिकारी हे भ्रष्ट अधिकारी असून कुठलेही काम करावयाचे असल्यास नेहमीच मोठ्या रक्कमेची मागणी करणे, पैसे न दिल्यास ते जनतेची कामे न करणे, तसेच जनसामन्यांशी नेहमीच उध्दटपणे वर्तन करणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या सुमारास लेखी निवदेनाद्वारे तक्रार केली असता अमुस (गृह) व प्र.स. (न.वि.२) यांना तात्काळ सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे दिलेले निर्देश, असे असतांनाही यासंदर्भात कोणतीच कारवाई न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधी मागाठाणे विधानसभा यांनी बोरीवली येथे कार्यरत असलेले नगर भूमापन अधिकारी हे अतिशय भ्रष्ट अधिकारी असून कुठलेही काम करावयाचे असल्यास नेहमीच मोठ्या रकमेची मागणी करतात, पैसे न दिल्यास ते जनतेची कामे करीत नाही तसेच जनसामान्यांशी ते अतिशय उध्दटपणे व अरेरावीने वागतात या कारणास्तव त्यांना नगर भूमापन अधिकारी या पदावरुन त्वरीत हटविण्यात यावे व त्यांच्या बेहीशेबी मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत त्वरीत चौकशी करुन त्यांची अतिदुर्गम भागात बदली करण्यात यावी अशी तक्रार दि.१७.१०.२०२२ रोजीच्या निवेदनान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे.

सन्माननीय विधानसभा सदस्य यांच्या उक्त निवेदनावरील मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशास अनुसरुन गृह विभागामार्फत संबंधित नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याच्या मुद्याच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करून अभिप्रायांसह अहवाल पाठविण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागास दि.२८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून संबंधित नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांची बदली करण्याच्या मुद्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याकरीता या विभागास दि.०७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. गृह विभागाचे सदरचे पत्र या विभागास दि.१४.१२.२०२२ रोजी प्राप्त झाले आहे. संबंधित नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचेबाबतचा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील चौकशीचा अहवाल गृह विभागामार्फत या विभागास प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधित नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांना सदर पदावरुन दि.२७.१२.२०२२ रोजी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.२००८.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२२ चे (हिवाळी) अधिवेशन

श्री. ज्ञानराज चौगुले, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २००८ पुढीलप्रमाणे आहे :-

"जिल्हा व तालुका नाशिक येथील चांदशी गावातील गट नं.६९/१, क्षेत्र ०२ हेक्टर आर या क्षेत्राची हिंदू महादेव कोळी महादु दगु धोंगडे नामक आदिवासीच्या नावे असलेली जमीन श्रीमती स्वाती सागर शिंदे, संदीप पाटणकर, सागर जाधव, राजेंद्र गोरडे या चार व्यक्तींनी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शासन परवानगी न घेता, खोटी कागदपत्रे बनवून जमीन नावे केल्याचा गंभीर गैरप्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू चारही व्यक्ती आदिवासी जातीचे नसताना, शासनास अंधारात ठेवून व शासनाची दिशाभूल करून चांदशी गावचे तलाठी, मंडळ अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांचेबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करून आदिवासींची कोटयावधी रुपये किंमतीची जमीन, नजराणा बुडवून व सर्वसाधारण गटातील दाखवून खोटया दस्तावेजाद्वारे शासन परवानगी न घेता परस्पर बेकायदा नावे केल्याचा प्रकार घडणे, मूळ आदिवासीचे निधन झाल्यानंतर वारसाची नावे दाखल करण्यास गेले असता मयताच्या वारसांना सदर जमीन वडिलांच्या नावेच नसल्याचा प्रकार निदर्शनास येणे, आदिवासीची बेकायदा जमीन खरेदी प्रकरणातील श्रीमती स्वाती सागर शिंदे या शासनातील नाशिक येथील जलसंपदा विभागातील, अधीक्षक अभियंता सागर शिंदे यांच्या पत्नी असणे, सदरहू जमीनीवर झालेल्या फेरफार नोंदीमधील नोंद क्र. १७३४ या नोंदीने आदिवासी शेरा कमी करुन जमीन बक्षीसपत्र दाखवून खरेदी करण्यात येणे, या संदर्भात तक्रार अर्ज दाखल करणाऱ्या श्रीमती लंकाबाई जानकीराम बगर व श्री. विजय जानकीराम बगर, रा. पंचवटी, नाशिक यांनी शासनास निवेदन देऊन सदरहू झालेला बेकायदा जमीन हस्तांतरण व्यवहार शासनाने चौकशी करून त्वरीत रद्द करून जमीनीच्या सातबारा उताऱ्यावरील बिगर आदिवासींची नावे रद्द करून मूळ आदिवासींना जमीन परत करण्याकरिता शासनाकडे मागणी करणे, सदर प्रकरणात सदरहू चार व्यक्तींनी आदिवासींची कोटयावधी रुपये किंमतीची जमीन तलाठी, सर्कल, तहसिलदार यांनी आर्थिक संगनमताने परस्पर हडप करून आदिवासींची फसवणूक करून त्यांना बेदखल केल्याचा घडलेला अमानुष प्रकार, यामुळे आदिवासींवर झालेला गंभीर अन्याय, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे आदिवासींमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील , मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे चांदशी, ता. जि. नाशिक येथील मिळकत गट नंबर ६९/१ क्षेत्र २ हे. ३८ आर. या मिळकती बाबत अधिकार अभिलेखाची पडताळणी करता सदर मिळकत ही मुळची श्री. वासुदेव महादेव जठार यांचे मालकीची होती. सदर मिळकतीस दगु रावजी धोंगडे हे कुळ होते. कुळकायदा अंतर्गत केस चालून दगु रावजी धोंगडे यांना कुळकायदा कलम ३२-ग व ३२-म नुसार मालक जाहिर करण्यात येवून कब्जेदार

सदरी त्यांचे नावाची नोंद करणेत येऊन मिळकतीचे इतर अधिकारात महाराष्ट जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६-अ अन्वये आदिवासींची जमीन असा शेरा नोंदविणेत आला होता.

वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना दगु रावजी धोंगडे हे दिनांक २१/०८/१९९२ रोजी मयत झाले त्यानंतर त्यांना एकमेव वारस म्हणून महादु दगु धोंगडे यांचे नाव मिळकतीस गावी नोंद नंबर १४२६ अन्वये दाखल झालेले आहे. श्री.महादु दगु धोंगडे यांनी उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांचेकडेस दिनांक २३/०५/२००२ व दिनांक ०४/०६/२००३ रोजी अर्ज करुन मिळकतीच्या इतर अधिकारात महाराष्ट जमीन महसूल अधिनियम ३६ व ३६-अ अधिन राहून आदिवासींची जमीन असा असलेला शेरा आम्ही आदिवासी नसलेने व हिंदु कोळी या जातीचे असल्याने कमी करणेत यावा अशी मागणी केली होती. त्यानुसार सदरचा अर्ज तहसिल कार्यालय, नाशिक येथे प्राप्त झालेनंतर सदरच्या अर्जानुसार गावी चौकशी करण्यात येऊन महादु दगु धोंगडे यांचे जबाब नोंदवून तहसिल कार्यालय, नाशिक येथील दिनांक ११/०३/२००३ अन्वये अहवाल उपविभागीय अधिकारी नाशिक उपविभाग, नाशिक यांना सादर करणेत आलेला होता.उप विभागीय अधिकारी, नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश दिनांक ०६/०६/२००३ अन्वये आदेश देऊन मौजे चांदशी, ता. जि. नाशिक येथील गट नंबर ६९/1 या मिळकतीचे इतर अधिकारातील आदिवासींची जमीन हा शेरा कमी करणेबाबत आदेश दिलेने गावी सदर आदेशानुसार नोंद नंबर १७१४ अन्वये वाद मिळकतीच्या इतर अधिकारातील आदिवासींची जमीन हा शेरा कमी करणेत आला होता.

तदनंतर जमीन मालक महादु दगु धोंगडे व त्यांचे वारस दशरथ महादु धोंगडे, बाबुराव हिरामण धोंगडे, प्रकाश हिरामण धोंगडे, मोतीराम महादु धोंगडे, केशव महादु धोंगडे, विष्णु महादु धोंगडे, पार्वताबाई महादु धोंगडे, लंकाबाई जानकीराम बगर, अलकाबाई शांताराम गाढवे व मिनाबाई अनिल बेंडकुळे यांचे सर्व वारसांतर्फे ज. मु. धारक दशरथ महादु धोंगडे यांनी मिळकतीच्या एकुण क्षेत्र २ हे ३८ आर पैकी १ हे ९८ आर क्षेत्र संदिप गजानन पाटणकर, सागर सुर्यभान जाधव यांना खरेदी दस्त क्रमांक ३६७७/२००३, दिनांक ०६/०८/२००३ अन्वये विक्री केलेले आहे. सदरची मिळकत मूळ मालक यांना कुळ कायद्याने मिळालेली असलेने महादु दगु धोंगडे यांनी उपविभागीय अधिकारी, नाशिक यांचेकडेस अर्ज करुन कुळ कायद्यान्वये असलेली मिळकत विक्री करणेकामी दिनांक ०४/०८/२००३ अन्वये परवानगी घेतलेली आहे. तदनंतर उर्वरीत क्षेत्र ०.४० आर क्षेत्र महादु दगु धोंगडे यांनी खरेदीदस्त क्रमांक ५२९१/२००७, दिनांक २५/०५/२००७ अन्वये राजेंद्र रामचंद्र गोरडे यांना विक्री केलेले आहे. त्यानंतर खरेदी घेणार राजेंद्र रामचंद्र गोरडे यांनी दस्त क्रमांक ११०४/२०१२, दिनांक ०१/१२/२०१२ अन्वये सदरचे क्षेत्र त्यांची भाची म्हणजे बहीणीची मुलगी स्वाती सागर शिंदे यांना बक्षीस पत्राने हस्तांतरीत केलेली आहे.

वरीलप्रमाणे मिळकत महादु दगु धोंगडे यांनी मिळकतीतील इतर अधिकारात असलेला महाराष्ट जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६-अ असलेला शेरा उपविभागीय अधिकारी, नाशिक यांचेकडेस अर्ज देऊन कमी करुन घेतलेला असून सदर शेरा कमी झालेनंतर मिळकत संदिप गजानन पाटणकर व सागर सुर्यभान जाधव व राजेंद्र रामचंद्र गोरडे यांना १ हे.९८आर विक्री केलेली आहे. तद्नंतर उर्वरीत क्षेत्र ०.४० आर महादु दगु धोंगडे यांनी खरेदीदस्त क्रमांक ५२९१/२००७, दिनांक २५/०५/२००७

अन्वये राजेंद्र रामचंद्र गोरडे यांना विक्री केलेले आहे. अशी परिस्थिती असतांना श्रीमती लंकाबाई जानकीराम बगर व विजय जानकीराम बगर यांनी दिनांक २१/१०/२०२२ रोजी अपर जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे अर्ज देऊन मौजे चांदशी, ता. जि. नाशिक येथील गट नंबर ६९/१ या मिळकतीबाबत खोटे पुरावे सादर करुन व मिळकत खरेदी करुन त्यांची फसवणुक केली असलेबाबत चौकशी होणेबाबत विनंती केली आहे.सदरचा अर्ज तहसिलदार नाशिक यांचेकडे दिनांक १४/११/२०२२ अन्वये चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे. चौकशी अंती नियम व कायदयातील तरतुदी तपासून गुणवत्तेवर तातडीने निर्णय घेणे बाबत दक्षता घेत आहोत.

*************

लक्षवेधी सूचना क्र.१२३२

**श्री. धर्मरावबाबा आत्राम,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२३२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"गडचिरोली जिल्हयाच्या दक्षिण टोक असलेल्या सिरोंचा तालूक्याला मौल्यवान सागवनाची नैसगिक देणगी लाभली असणे, मात्र या मौल्यवान सागवनाला तस्कराची वळवी लागली असल्याने तालूक्यातील सागवन तस्करी अनियंत्रित झालेली असणे, वन विभागाव्दारे तस्करांविरोधात कडक कारवाई करण्याची नितांत गरज निर्माण झालेली असताना सुध्दा वन विभागातील अधिकारी यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, परराज्यासह देशविदेशातून येथील सागवनाला मोठी मागणी असल्यामुळे तस्कर सक्रीय झाले असल्याचे निदर्शनात येणे, यासंदर्भात वन विभागाव्दारे तस्करीच्या कार्यवाही दाखविल्या जात असल्या तरी तस्करांच्या कायमस्वरुपी मुसक्या आवळण्यात मात्र अपयश दिसून येणे, परिणामी तालूक्यातील मौल्यवान सागवनासह इतर वृक्षाची कत्तल राजरोस सुरुच असणे, तालूक्यातील सागवन चोरी करणाऱ्या तस्करांना इतर राज्यात पकडले जाणे, परंतू सिरोंचा वन विभागातील अधिकारी यांना अपयश येणे, त्यामुळे तस्कर व वनविभागीतील अधिकारी यांचे संगनमत असल्याची आशंका निर्माण होणे , त्यामुळे या तस्करांचे समुळ उच्चाटन होण्यासाठी वनविभागाव्दारे विशेष पथकाची नेमणूक करण्याची मागणी सतत नागरीकांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमीका."

---

**सुधीर मुनगंटीवार**

**मा.मंत्री (वने)** **महसूल व वन विभाग**

## निवेदन

गडचिरोली जिल्हयाचे दक्षिण टोक असलेल्या सिरोंचा वनविभागाचे भौगोलिक क्षेत्र ३१५१ चौ.कि.मी. असून त्यापैकी २७७७.७९ चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे, सिरोंचा वनविभाग हा २ उपविभाग, ८ वनपरिक्षेत्र, ३१ उपक्षेत्र व १७५ नियतक्षेत्रामध्ये विभागला आहे. या वन विभागाच्या तिन्ही बाजूला आंतरराज्यीय सीमा असून सीमा भागात काही ठिकाणी घनदाट जंगले आहेत.

या वनविभागामध्ये छत्तीसगड व महाराष्ट्र आंतरराज्यीय सिमेत संघटीत लाकूड तस्करांना पलिकडच्या राज्यात आवागमन करण्यासाठी पोषक वातावरण असल्यामुळे वनविभागातील अतिसंवेदनशील भागातील उच्च दर्जाचे दुर्मिळ सागवानाची अवैध तोड होते. तस्करकर्त्यांच्या प्रलोभनास बळी पडून सिरोंचा वनविभागातील काही स्थानिक व बेरोजगार लोक सागवान वृक्षतोड करण्यास आकर्षित होतात. तसेच सिरोंचा वनविभागातील संपूर्ण क्षेत्र नक्षल प्रभावित आहे. तसेच अनपेक्षितपणे स्थानिक लोक आपल्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी अवैध वृक्षतोड करतात. या वन विभागाच्या तिन्ही बाजूला असलेल्या नदीपात्रात बारमाही पाणी वाहत असल्याने सागवान तस्कर अतिसंवेदनशील भागातील स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने नदीपात्रातून सागवान लठ्ठयांची तराफे तयार करुन त्यावर बसून पाण्याच्या प्रवाहाने अवैध वृक्षतोड केलेला माल परराज्यात स्थानांतरीत करतात.

सन २०१८ ते सन २०२१ या ४ वर्षामध्ये सिरोंचा वनविभागाच्या वनक्षेत्रात एकूण १५५९० वृक्षांची अवैध वृक्षतोड झाल्याने रु.३५९.९५ लक्ष एवढे नुकसान झाले आहे. थुटाजवळ व इतर ठिकाणी शोध मोहिम राबवून रु.६४१.८४ लक्ष किंमतीचा अवैध लाकडे जप्त करण्यात आली आहेत. सदर अवैध वृक्षतोड प्रकरणी एकूण २१५८ वनगुन्हे नोंदवून एकूण १५२ आरोपींना वनगुन्हयात पकडण्यात आले होते. त्यापैकी १३ प्रकरणात ४१ आरोपी विरुध्द न्यायालयात १४ प्रकरणे न्यायप्रविष्ट असून सदर १४ न्यायप्रविष्ट प्रकरणातील आरोपींची संख्या ४७ एवढी आहे.

माहे जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२२ अखेर वनक्षेत्रात एकूण ३०६२ वृक्षांची अवैध वृक्षतोड झाल्याने रु.१०३.७६ लक्ष इतके नुकसान झालेले आहे. बुडाजवळ व इतरत्र शोध मोहिम राबवून रु.१०४.९७ लक्ष किंमतीचे अवैध लाकडे जप्त करण्यात आली आहेत. सदर अवैध वृक्षतोड प्रकरणी एकूण ३६२ वनगुन्हे नोंदवून एकूण १३८ आरोपींना अवैध वृक्षतोडबाबतच्या वन गुन्हयात पकडण्यात आले असुन त्यापैकी ६ आरोपींविरुध्द १ प्रकरण न्यायालयात दाखल केले आहे.

सन २०१८ ते २०२१ या चार वर्षात प्रतिवर्षी सरासरी ३८ आरोपींना अटक करण्यात आली होती. परंतु सन २०२२ या एका वर्षात १३८ आरोपींना वनगुन्हयात पकडण्यात आले .

सिरोंचा वनविभागातील अवैध वृक्षतोड व अवैध वाहतुकीवर आळा घालण्यासाठी बामणी परिक्षेत्र,आसर अल्ली परिक्षेत्र व झिंगानूर परिक्षेत्र या तिन्ही परिक्षेत्राकरिता ३ बोट कॅम्प तयार करण्यात आले असून, त्यावर काम करण्यासाठी १ वनरक्षक व ५ हंगामी मजूर यांचे पथक कार्यरत आहेत. सदर पथक पाण्याव्दारे होणाऱ्या अवैध वाहतूकीवर निर्बंध लावण्याकरिता काम करित असतात.तसेच रस्त्याद्वारे होणाऱ्या अवैध वाहतुकीवर आळा घालणेकरीता सिरोंचा परिक्षेत्रात ३, प्राणहिता परिक्षेत्रात १,आसरअल्ली परिक्षेत्रात १ असे एकूण ५ तपासणी नाके कार्यरत आहेत. या नाक्याद्वारे २४ तास अवैध वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात येते. सिरोंचा वन विभागातील सर्व सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी व २६ क्षेत्रसहायक यांना बिट निरीक्षण कार्यक्रम देऊन त्यांच्याकडून आढावा घेण्यात येतो. आंतरराज्यीय तस्करीवर आळा घालण्यासाठी तेलंगणा राज्यातील वनविभागाशी समन्वय साधला जातो. त्यामुळे तेलंगणा येथील आरोपींना पकडण्यात यश आलेले आहे.

सिरोंचा वनपरिक्षेत्रात मागील ६ महिन्यात अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आल्याने १६ आरोपींची बयान घेऊन त्यापैकी ६ आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले आहे. तसेच सदर अवैध वृक्षतोड प्रकरणी वनरक्षक व वनपाल यांनी प्रकरणाच्या गांभीर्याबाबत वरिष्ठांना कोणतीच कल्पना न देता जाणीवपूर्वक प्रकरण लपविण्याचा प्रयत्न केल्यामुळे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी सिरोंचा यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता अवैध वृक्षतोड प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने वनसंरक्षक(प्रा), गडचिरोली यांनी त्यांना निलंबित केले आहे. संबंधित वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी सिरोंचा यांच्या विरोधात दोषारोप सादर केले असून चौकशी चालू आहे.

सागवान तस्करीमध्ये वनकर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग आढळून येत नाही. आसरअल्ली वनपरिक्षेत्रात व सिरोंचा वनपरिक्षेत्रात झालेल्या अवैध वाहतूकीमध्ये ५ वाहने व ४ आरोपी पकडण्यात आले आहेत. सन २०२१ मध्ये मेडीगट्टा तपासणी नाक्यावरील हंगामी मजूरावर हल्ला करुन जिवीत मारण्यात आले असल्याने काही कालावधीकरीता सदर नाका बंद करण्यात आला होता. परंतु सदर नाका सध्या पूर्ववत सुरु करण्यात आला आहे. कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी अवैध वृक्षतोडीबाबत कार्यवाही करतांना स्थानिक गावकऱ्यांकडून दबाव असतो.

सिरोंचा वनविभागाला लागून छत्तीसगड, तेलंगणा या राज्यांच्या सीमा असल्याने सागवान लाकडाची तस्करी रोखण्यासाठी त्या राज्यांच्या सीमेपलिकडे जाऊन कार्यवाही करण्यास मर्यादा येतात. तसेच सिरोंचा वनविभागातील बहुतांश लोक तेलगु भाषेचे असल्याने त्यांच्याशी समन्वय साधणे, खबऱ्यांचे जाळे तयार करण्यासाठी अडचणी येतात. सिरोंचा वनविभागाचा बहुतांश भाग नक्षल प्रभावित वनक्षेत्र, दुर्गम पहाडी असल्यामुळे तेथे नक्षल कार्यवाही चालू असतात. नक्षली प्रभावामुळे रस्त्यांचा विकास झाला नाही, परिणामी गस्त व फिरती करण्यास तसेच शस्त्र घेऊन गस्त करण्यास अडचणी येतात.

*********

५च-१२५७-१३

लक्षवेधी सूचना क्रमांक-९४६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन
## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-९४६

श्रीम.मेघना साकोरे बोर्डीकर, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९४६ पुढीलप्रमाणे आहे :-

"संयुक्त राष्ट्र संघटनेने मंजूर केलेल्या घोषणा पत्रानुसार सर्वांना घरे देण्याची योजना शासनाने जाहीर केलेली असणे, ग्रामीण भागात दरवर्षी एक कोटी घरकुले देण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला असताना प्रत्यक्षात मात्र घरकुल बांधणीचे उद्दिष्ट आणि घरकुल यांची निर्मिती यात मोठी तफावत दिसून येत असणे, प्रधानमंत्री आवास योजनेत एकूण २६९ चौरस फूट घरकुलाचे बांधकाम अपेक्षित असून त्यासाठी सरासरी १५०० रुपये प्रति चौरस फूट असा बांधकामाचा दर गृहीत धरला तर घरकुलाची किमत चार लाखाच्या घरात जाणे, प्रत्यक्षात घरकुलाच्या लाभार्थ्यांना मिळणारी मदत पुरेशी नसून बांधकाम साहित्य आणि मजुरीचे वाढलेले दर लक्षात घेता हे अनुदान वाढवण्याची गरज असणे, घरकुल लाभार्थ्याला स्वतःच्या मालकीची जमीन नसणे अशा भूमिहीनांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने पंडित दीनदयाल घरकुल जागा योजनेतून लाभार्थ्यास जागा खरेदीसाठी दिली जाते ही रक्कम सुद्धा वाढवण्याची गरज असतानाही न दिल्याने अनेक नागरिकांना घरकुल योजनेपासून वंचित व्हावे लागत असणे, ग्रामीण बेघरांची अतिक्रमणे नियमित करण्यासाठी राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने एक शासन निर्णय जाहीर केला असून अतिक्रमित कुटुंबांकडून जी रक्कम वसूल केली जाते ती बाजार भावापेक्षा जास्त असेल सरकारने मोडीत काढलेल्या जुन्या गावठाण विस्तार योजनेत शेतमजुरांना १००० फूट जागा विनाशुल्क उपलब्ध करून देण्याची असलेली तरतूद आता संपुष्टात आलेली असणे, घरकुलाचा लाभ देताना अनेकदा प्रशासकीय यंत्रणेकडून निर्देशांची पायमल्ली होत असणे, भटक्या विमुक्त जनसमूहांना स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी जुनी गावठाण योजना संपुष्टात आल्याने भटक्या विमुक्त जाती जमातींना निवारा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने अनेक शिफारशी केल्या मात्र कोणतीही तरतूद नसणे, विविध जाती पोट जातीमध्ये विखुरलेले भटकी विमुक्त मच्छीमार आदिवासी या सर्वांना स्थळे देण्याच्या दृष्टिकोनातून घरकुलांचा विचार होण्याची गरज, १८ ते ५९ वयोगटातील परितक्त्या विधवांना

पंतप्रधान आवास योजनेत स्वतंत्र घरकुल देण्याची तरतूद करण्यात आली. मात्र या सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याने घरकुलाची योजना अतिशय चांगली असतानाही बेघरांना त्याचा निश्चितपणे लाभ होण्याची गरज, याबाबत प्रशासनाकडून पुरेशी खबरदारी घेतली जात नसल्याने बीड जिल्ह्यात घरकुलाच्या मागणीसाठी उपोषणास बसलेल्या एका कुटुंबातल्या प्रमुखाचा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच मृत्यू होणे, त्यामुळे ही बाब गंभीर असून राज्यातील हजारो नागरिकांना घरकुलांचा लाभ तातडीने देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

" प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यरत आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत उद्दीष्ट केंद्र शासनामार्फत राज्यात वितरीत करण्यात येते. लाभार्थी निवड ही सामाजिक, आर्थिक, जात सर्वेक्षण २०११ नुसार निर्माण झालेल्या जनरेटेड प्राधान्यक्रम यादी (GPL) ग्रामसभेसमोर ठेवून ग्रामसभेने मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांची कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी तयार करण्यात येते. केंद्र शासनाच्या प्राप्त उद्दिष्टानुसार लाभ देण्यात येतो. ज्या पात्र लाभार्थ्यांची नावे जनरेटेड प्राधान्यक्रम यादीमध्ये नव्हती, अशा लाभार्थ्यांची केंद्र शासनाच्या सुचनांनुसार, ड यादी तयार करण्यात आली. सदर यादीतील लाभार्थ्यांच्या नोंदी आवाससॉफ्ट प्रणालीवर करण्यात आल्या. सद्य:स्थितीत या याद्यांना ग्रामसभेने मान्यता देऊन त्यांच्या प्राधान्यक्रम याद्या तयार करण्यात आल्या आहेत. सन २०२१-२२ या वर्षात प्राप्त झालेल्या उद्दिष्टांनुसार या यादीतून मंजूरी देण्याचे काम सुरू आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिला यांना प्राधान्याने लाभ देणेसाठी गुणांकन पध्दतीद्वारे प्राधान्यक्रम ठरविण्यात येतो.

त्याचबरोबर राज्यपुरस्कृत ग्रामीण आवास योजना जसे रमाई आवास योजना (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग), शबरी आवास योजना, आदीम आवास योजना, पारधी आवास योजना (आदीवासी विकास विभाग), यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (इतर मागास बहुजन कल्याण विभाग), धनगर समाजासाठी धनगर आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना या राज्य योजनांसाठी संबंधीत विभागामार्फत वर्षनिहाय व जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात येते. याकरीता आवश्यक निधीची तरतूद करण्यात येते.

सद्य:स्थितीत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना घरकुल बांधकामाकरीता ग्रामीण भागातील साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष व डोंगराळ / नक्षलग्रस्त डोंगराळ भागात १.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. या व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. १२०००/- व मनरेगा अंतर्गत ९० दिवस/ ९५ दिवस अकुशल मजूरी साधारणपणे रक्कम रु. २२,०००/- देण्यात येते. राज्य पुरस्कृत आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण या धर्तीवर राबविण्यात येतात.

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण करीता रु. २.५० लक्ष अर्थसहाय्य वाढवून मिळणेबाबतचा प्रस्ताव केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयास सादर करण्यात आला असता, त्यांनी सद्य:स्थितीत कुठल्याही प्रकारची वाढ करता येणार नाही, असे कळविले आहे. त्यानंतर या संदर्भात राज्य शासनाने दि.०१/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, केंद्र शासनास निधी वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत घरकुलास पात्र लाभार्थी, केवळ घरकुल बांधण्यासाठी स्वत:ची जागा उपलब्ध नसल्यामुळे घरकुलाच्या लाभापासून वंचित राहू नये, याकरिता राज्य शासनाने दिनांक १४ जुलै २०१७ पासून राज्यात "पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" लागू केली आहे. सदर योजनेंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांस ५०० चौ.फुटापर्यंत जमिन खरेदी करण्यासाठी रक्कम रू. ५०,००० पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेंतर्गत शासकीय जमिन विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येते. अद्यापपर्यंत सदर योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून ३२९३ इतक्या लाभार्थ्यांना व विनामुल्य जमिन उपलब्ध करून २१६७८ इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

ज्या ग्रामपंचायती शहरानजीक आहेत अशा ठिकाणी जागेची किंमत अधिक असल्याने, अशा ठिकाणी G+१ ते G+४ पर्यंत बहुमजली इमारती बांधणे व गृहसंकुले बांधणे अशा प्रकारचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले. याकरिता ५०० चौ. फुट जागा खरेदी करण्यासाठी प्रति लाभार्थी रक्कम रू. ५०,००० इतके अर्थसहाय्य देण्यात येते. राज्यात अद्यापर्यंत १७९२ बहुमजली इमारती व १०१२ गृहसंकुले उभारण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत दि. १६ फेब्रुवारी,२०१८ अन्वये शासन निर्णय

निर्गमित झालेला आहे. अतिक्रमणधारकाचे अतिक्रमित क्षेत्रावर नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचेकडील प्रचलित वार्षिक मुल्य दर (रेडीरेकनर) नुसार रक्कम आकारली जाते.

महसूल व वन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. GTN-१०८३/२१७/-१२, दि.१० फेब्रुवारी, १९८३ नुसार, लोकसंख्या वाढीमुळे गावठाण विस्तार करणे, भटक्या विमुक्त जाती, विमोचन जाती व मागासवर्गीय वर्गातील व्यक्तींचे पुनर्वसन, पुरग्रस्तांचे पुनर्वसन या बाबींकरिता योजना राबविली जाते. सदर परिपत्रकात पुढीलप्रमाणे तरतुदी नमूद केल्या आहेत :-

१. कुटुंबातील सदस्यांची संख्या विचारात न घेता बिगरशेती करणाऱ्यासाठी १५०० चौ.फुटाची तरतुद करण्यात आलेली आहे.
२. मागासवर्गीयांच्या मागणीनुसार गावठाण विस्तार :- या बाबीखाली अनुसूचित जाती व जमाती या तसेच विमुक्त/भटक्या जाती यांचे मागणीनुसार त्यांना विनामुल्य जमीन अथवा प्लॉट उपलब्ध करुन देण्याबाबतची तरतुद आहे.
३. लोकसंख्या वाढीमुळे गावठाण विस्तार :- लोकसंख्या वाढीमुळे मागणी प्राप्त झालेल्या गावात गावठाण विस्तार करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यामध्ये गावठाण विस्तार करण्यासंदर्भात सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. या योजनेचा खर्च जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून करण्यात येतो. लोकसंख्या वाढीमुळे करण्यात येणारा गावठाण विस्तार योजनेतील खर्च सर्व लाभार्थ्यांकडून वसूल करण्याची तरतूद आहे.

उपोषणकर्ता श्री.अप्पा भुजा पवार (मयत) यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने, शासकीय गायरान जमीन घरकुलासाठी प्रदान करता येणे शक्य नसल्याने, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत आणि खाजगी संस्था, जिल्हापरिषद कर्मचारी कल्याण निधी, रोटरी क्लब, लायन्स क्लब, बीड यांच्या सहकार्याने त्याच गावातील खाजगी व्यक्तिंची २ गुंठे जमिन त्यांना व संबंधित लाभार्थ्यांना घरकुल बांधण्याकरिता हस्तांतरित करण्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी लेखी आश्वासन दिले. याप्रमाणे शबरी आवास योजनेतील वासनवाडी, तालुका-बीड येथील लाभार्थ्यांना घरकुलासाठी जमिन उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यवाही करण्यात येत आहे.

**********************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे (हिवाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक ७७७

**श्री.राजेश पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील –**

---

**"ग्रामीण भागातील रुणांना जिल्ह्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागू नये तसेच त्यांना त्याच ठिकाणी आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय उभारले असणे, सदर रुग्णालयांवर कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही रुग्णांना त्याचा फायदा होत नसल्याचे दिसून येणे, नांदेड जिल्ह्यातील विष्णुपरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील प्रसुती विभागावर मोठ्या प्रमाणात ताण पडत असल्याचे नोव्हेंबर २०२२ मध्ये निदर्शनास येणे, परणभी, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्यातून येणा-या रुग्णांची संख्या अधिक असल्याने ११० खटांचा स्त्रीरोग विभाग कायम भरलेला असणे, येथे प्रसुतीसाठी येणा-या रुणांची संख्या पाहता, डॉक्टर, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व इतर कर्मचा-यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता असणे, सदरहू रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचा-यांची संख्या वाढवून रुग्णांना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

---

मा.मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

नांदेड जिल्हयात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत १ जिल्हा रुग्णालय, १ स्त्री रुग्णालय, १०० खाटांचे १ उपजिल्हा रुग्णालय, ५० खाटांची ४ उपजिल्हा रुग्णालये, १२ ग्रामीण रुग्णालये तसेच नेत्र रुग्णालय, मांडवी, २ फीरते वैद्यकीय पथक व २ आश्रमशाळा पथके, ६८ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३७७ उपकेंद्रे कार्यरत आहेत. या आरोग्य संस्थांमार्फत जनतेला प्रथम व द्वीतीय स्तरावरील बाहयरुग्ण सेवा, आंतररुग्ण सेवा, लहान-मोठया शस्त्रक्रिया, प्रसूती, विविध तपासण्या, इ. सेवा उपलब्ध करुन देण्यांत येतात. ज्या रुग्णालयीन सेवा उक्त आरोग्य संस्थामध्ये उपलब्ध नाहीत, तसेच ज्या रुग्णांना तृतीय स्तरावरील रुग्ण सेवेची आवश्यकता आहे अशा रुग्णांना आवश्यकतेनुसार डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे संदर्भित केले जाते.

२. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी, नांदेड येथील स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागात एकूण ११० ते १२० खाटांची ३ कक्ष उपलब्ध आहेत.वार्डमध्ये दररोज ३५ ते ४० च्या दरम्यान रुग्णांची प्रसुती होते त्यापैकी १५ ते १८ सिझेरियन प्रसुती होते. सिझेरियन प्रसुती झाल्यास रुग्ण कमीत कमी ७ दिवस व गुंतागुंत झाल्यास ७ पेक्षा जास्त दिवस तसेच सुलभ प्रसुतीचा रुग्ण २ दिवस व वैद्यकीय विकारासह गर्भ व प्रसुती रुग्ण ८ ते १० दिवस रुग्णालयात राहतो. प्रसुती विभागात माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये ११८६ आंतररुग्ण दाखल होते. हिंगोली, परभणी, यवतमाळ तसेच सिमावर्ती भागातील ग्रामीण व सरकारी रुग्णालयामधून रुग्ण प्रसुतीसाठी संदर्भीत करण्यात येत असल्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. तथापि उपलब्ध मनुष्यबळ व उपलब्ध सुविधेमध्ये

रुग्णांना चांगल्या दर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संस्थेतील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेवून प्रसुतीशास्त्र विभागाकरीता अतिरिक्त ४० खाटा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी नांदेड येथेराष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार सद्यस्थितीत १५० एमबीबीएस विद्यार्थी क्षमता झाल्यामुळेवाढलेली विद्यार्थी प्रवेश क्षमता व रुग्णसंख्या विचारात घेता, नांदेड येथे अतिरिक्त कक्षाचे बांधकाम करण्यासाठी मा.उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने रु.२४.५६ कोटी इतक्या रक्कमेच्या खर्चास शासन निर्णय दि.२४.०६.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच १५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनप्रमाणे पर्याप्त अध्यापकीय पदे तसेच तांत्रिक व अतांत्रिक पदे निर्माण करण्याची बाब विचाराधीन आहे.

*****************

## लक्षवेधी सुचना क्र. ६४०

मा. श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना खालील प्रमाणे आहे.

"जिल्हा रायगड, उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत ३० वर्षापूर्वी भारत पेट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीला प्रकल्प उभारण्यासाठी जमीन दिलेल्या प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांच्या मुलांना आश्वासन देऊनही ३० वर्षात कंपनी व्यवस्थापनाने नोकरीत सामाऊन न घेतल्याच्या निषेधार्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दि.०९.११.२०२२ रोजी पासून साखळी उपोषण करुन भारत पेट्रोलियम कंपनीच्या दर्शनी भागात तीव्र आंदोलन करुन धरणे धरण्यात येणे, सदरहू प्रकल्पासाठी २०७ हेक्टर जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांना म्हणजेच स्थानिक भूमिपुत्रांना डावलून परप्रांतियांना नोकऱ्या देण्यात आल्या असल्याने येथील स्थानिक भूमिपुत्रांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, कंपनी व्यवस्थापनाच्या या निर्णयाविरुद्ध तीव्र संघर्षाची भूमिका घेऊन गेटबंद आंदोलन करण्याचा कंपनी व्यवस्थापन आणि राज्य शासनास दिलेला गंभीर इशारा, स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी न देता त्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध राज्य शासनाने हस्तक्षेप करुन स्थानिकांना नोकरीत सामाऊन घेऊन त्यांना न्याय देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत सन १९९० साली उरण बी.पी.सी.एल. एल.पी.जी. प्रकल्पाची सुरुवात झालेली आहे. सदर प्रकल्पासाठी तत्कालीन परिस्थितीत १२२ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे बी.पी.सी.एल. यांनी दि.१६/०७/१९९० रोजीच्या मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडील बैठकीत माहिती दिली. या प्रकल्पात एकूण १९० प्रकल्पग्रस्तांची संख्या असल्याने १२२ प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात समाविष्ट करुन ६८ प्रकल्पग्रस्तांना पुढील तीन वर्षात नोकरीत सामाविष्ट करुन घेणेबाबत निर्णय झाला.

सर्व पक्षीय संघर्ष समिती-उरण यांनी दि.०९/११/२०२२ रोजी गेट बंद आंदोलन करणेबाबत बी.पी.सी.एल. कंपनीस निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने बी.पी.सी.एल. कंपनी यांनी मा. उच्च न्यायालय येथे सिव्हील रिट पिटीशन क्र. १३०२१/२०२२ दाखल केलेले असून सदरच्या दाव्यामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पोलीस विभाग यांना कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत आदेशित केले आहे.

सदरहू प्रकल्पासाठी बी.पी.सी.एल. यांनी २०७ एकर जमीन सिडको यांचेमार्फत संपादीत केलेले असून त्यापैकी ४७ ते ५० एकर जमीन एम.एस.ई.बी. प्रकल्पास हस्तांतरीत केलेले आहे. बी.पी.सी.एल. कंपनीने सन २००० पर्यंत १९० प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात नोकरीत सामावुन घेतले आहे.

बी.पी.सी.एल. कंपनी यांनी दि.१६/०७/१९९० रोजीच्या मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडील बैठकीतील निर्देशानुसार १९० प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये समाविष्ट करून घेतले असल्याने स्थानिकांची फसवणूक केलेली आहे असे म्हणता येणार नाही. तसेच बी.पी.सी.एल. कंपनी श्री. अविनाश रमण ठाकूर यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हील रिट पिटीशन क्र. १३०२१/२०२२ दाखल केलेला असून सद्यस्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच कंपनी यांनी १९० प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामाविष्ट करुन घेतल्याने शासनाचे दुर्लक्ष झाले असे म्हणता येणार नाही.

रीटा H/1103-1 (700-2-23)

*********

लक्षवेधी सूचना क्र. १४७३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

**ॲड. माणिकराव कोकाटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४७३ पुढील प्रमाणे आहे :-**

"नाशिक जिल्हयातील अतिरिक्त सिन्नर औद्योगिक क्षेत्र (SEZ) मधील मौजे मुसळगाव व गुळवंच या दोन्ही गावातील सुमारे ११८५.७२ हेक्टर क्षेत्र महामंडळाने भुसंपादन केलेले असून सदर क्षेत्र संपादन करुन १५ वर्षे झाले तरी अद्यापपावेतो फक्त २०० खातेदारांनाच (PAP) भूखंड वाटप महामंडळाने केलेले आहे. उर्वरित २८२ खातेदारांना अद्यापपावेतो (PAP) भूखंड वाटप झालेले नसणे, त्यामुळे त्यांच्या पसरलेला तीव्र असंतोष, उर्वरित खातेदारांना (PAP) भूखंड देण्याचे आश्वासन देऊन सुध्दा अद्याप महामंडळाचे स्तरावरुन उर्वरित प्रकल्पग्रस्तांना (PAP) भूखंड वाटप करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्राची भुसंपादन प्रक्रिया सुरु केलेली नसणे, संबंधित प्रकल्पग्रस्त, संबंधित लोकप्रतिनिधी वारंवार पाठपुरावा करीत असणे, उर्वरित २८२ प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करणे शिल्लक असून महामंडळाच्या नियमाप्रमाणे लेआऊट तयार करण्यासाठी त्यामधील रस्ते, खुली जागा व सुविधा क्षेत्र तसेच १५ टक्के प्रमाणे औद्योगिक भूखंड वाटपासाठी सुमारे १६०.१७० हेक्टर क्षेत्राची आवश्यकता असणे, त्याकरीता एमआयडीसी ने अधिगृहीत केलेले सिन्नर तालुका सहकारी औद्योगिक वसाहतीचे मागील १२७ हेक्टर क्षेत्र व मुसळगाव शिवारातील गट नं. १०८८ ते ११०९ तात्काळ या क्षेत्राचे भूसंपादनाची राबवून प्रकल्पग्रस्तांना (PAP) भूखंड देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन**

अति. सिन्नर औद्योगिक क्षेत्रासाठी (सेझ) मौजे- गुळवंच व मुसळगांव येथील एकूण १५०५.७० हे. आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आली आहे. त्यापैकी ११८२.६४ हे. आर क्षेत्राची मऔवि अधिनियम, १९६१ अन्वये भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, मऔवि महामंडळाच्या ताब्यात आलेले आहे. सदर ११८२.६४ हे.आर. क्षेत्रापैकी १०४७.८२ हे. आर क्षेत्राचे मे. इंडीया बुल्स इंन्फ्रास्टक्चर्स प्रा. लि. कंपनीस वाटप करण्यात आलेले आहे. सदर कंपनीला ताबा दिल्यानंतर दिलेल्या क्षेत्रात प्रोसेसिंग एरिया ५१२.०६ हे. आर व नॉन प्रोसेसिंग एरिया ४९९.१९ हे. आर असे दोन भाग पाडण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पासाठी ज्या जमिनी अधिसूचित करण्यात आल्या त्या प्रकल्पग्रस्तांना १५% औद्योगिक व ५% व्यापारी भुखंड उपलब्ध करून देण्यासाठी एकूण २३०.६२ हे. आर क्षेत्राची आवश्यकता होती. त्यापैकी १२०.०४ हे. आर क्षेत्रात २२९ भुखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने म.औ.वि. महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. ०७/०९/२००७ रोजीच्या ३१४ व्या बैठकीतील ठराव क्र. ४४०७ नुसार रु. ६०/- प्रति चौ. मी. ने जमिन वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मौजे गुळवंच व मुसळगांव या गावांचे एकुण ८२९ खातेदार असून त्यांना देय भुखंडांची संख्या ४८२ इतकी आहे. त्यापैकी २५८ प्रकल्पग्रस्तांचे रु. ५९/- प्रति चौ. मी. प्रमाणे मे. इंडीया बुल्स कंपनीने रु. ५,१६,४०,३२०/- इतकी रक्कम अदा केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

<u>लक्षवेधी सूचना क्र. १६८४</u>

**श्री.सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६८४ पुढील प्रमाणे आहे :-**

"एमआयडीसी, जळगावमध्ये भूखंड शिल्लक नसल्याने इंजिनिअरींग किंवा पॉलिटेक्निक सारखी महाविद्यालये जळगावमध्ये उपलब्ध होऊ न शकल्याने जळगावमध्ये राज्यातील अन्य भागांप्रमाणे उद्योगांना वीज सवलत मिळत नसल्याने येथील उद्योग स्थलांतरीत होत असल्याची बाब निदर्शनास आली, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली? नवीन उद्योगांना चालना मिळणे साठी करावयाची कार्यवाही. जळगाव एम.आय.डी.सी. मधील उद्योजकांना मिळणाऱ्या सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे? विजेचा तसेच पाणी पुरवठा हा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे उद्योग धंदे बंद होत आहे? जळगाव एम.आय.डी.सी. मधील रोजगार कमी प्रमाणात उपलब्ध होत झाल्याने शहरातील सुशिक्षित बेरोजगाराचे संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यावर शासनाने करावयाची कार्यवाही? "

<u>मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जळगाव औद्योगिक क्षेत्र सन १९७८ पासून विकसित केलेले आहे. इंजिनिअरींग, प्लास्टिक, पी.व्ही.सी. पाईप, ड्रीप इरीगेशन मटेरीअल इत्यादी वापरासाठी सदर औद्योगिक क्षेत्रात एकूण २१७२ भूखंडाचे आरेखन करण्यात आले असून १९५६ भूखंड उत्पादनात आहेत. भूखंडाचे वाटप ई-निविदा प्रक्रियाव्दारे होत असून सध्या वाटपाकरिता ०९ भूखंड शिल्लक आहेत. तसेच जळगाव औद्योगिक क्षेत्रापासून सुमारे ०१ कि.मी. अंतरावर कुसुंबा गावानजिक ३०४.२९ हेक्टर आर क्षेत्रावर नविन औद्योगिक क्षेत्र प्रस्तावित असून त्याकरीता भुसंपादनाची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रात कुशल / अकुशल मनुष्यबळ उपलब्ध होणेकरीता जळगाव औद्योगिक क्षेत्रालगत तसेच जळगाव जिल्ह्यात एकूण ०८ शासकीय / अशासकीय अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय व १२ शासकीय / अशासकीय तंत्रनिकेतन विद्यालय कार्यरत आहेत. तसेच जळगाव शहर व लगत ०७ शासकीय / अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सदर औद्योगिक क्षेत्रात ५०.०० कि.मी. लांबीचे रस्ते, २२०० पथदिवे, ४६ कि.मी. लांबीच्या जलवितरीका आणि अविरत व मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करणे करीता तापी नदी उद्भव धरुन २७.०० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेची योजना कार्यान्वित केलेली आहे व मागणी प्रमाणे सदर योजनेतून सध्या १०.०० द.ल.ली. प्रतिदिन इतका पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा उपलब्ध होत नसल्याबद्दल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

जळगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड धारकांना विजपुरवठा करण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडून ०४ सब स्टेशनाव्दारे ६८.२५ एम.व्ही.ए.चा विजपुरवठा करण्यात येत आहे.

***********************

रोटा/एच-१०४१[७५०-२-२०२३]•

लक्षवेधी सूचना क्र. २९५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार लक्षवेधी सूचना क्र. २९५

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्मल शेख, श्रीम. मेघना साकोरे बोर्डीकर, श्री. बळवंत वानखडे, श्री. राजू पारवे, श्री. सुरेश वरुडकर, श्री. अमिन पटेल, श्री. नानाभाऊ पटोले, विधान सभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार लक्षवेधी सूचना क्र. २९५ पुढीलप्रमाण आहे:-

"उस्मानाबाद जिल्हायातील रुई, ढोकी येथे ३९, रामवाडी येथे ३८, काजळा येथे ४७, नांदूर्गा येथे १९, जवळा दू येथे १६ ईला येथे ७१ हिंगळजवाडी येथे २७, घुगी येथे ८४, गावसुद येथे ६ अशाप्रकारे ३४१ मजूर बनावट दाखविणे, त्यांच्या मजूरीचे पैसे मिळण्यासाठी बीड जिल्यातील पाडळसिंगी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत अज्ञाताच्या नावावर खाते उघडणे, या खात्यावर बनावट मजूरांचे तब्बल सव्वापाच लाख रुपयांपेक्षा अधिकची रक्कम जमा करण्यात येणे, उस्मानाबाद पंचायत समितीतील कंत्राटी सहायक कार्यक्रम अधिकारी विजय रामचंद्र कोळी रा. उस्मानाबाद यांच्यासह आई व भाऊ यांना रामवाडी येथील लाभार्थी लिंबराज पांडूरंग भोसले यांच्या घरकुलाच्या कामावर काम केल्यासंबंधीचा हजेरी पटातील रजिस्टरवर नाव असणे, एवढयावरच न थाबता त्यांचे नावे पैसेही काढण्यात आलेले असून, या गंभीर प्रकरणाची माहिती कोळी यांना समजताच त्यांनी याबाबतची तक्रार उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्याकडे करणे, हा सर्व घोटाळा संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनताने झाला असल्यामुळेच या गंभीर प्रकरणाची संथ गतीने होत असलेली चौकशी व यात सामिल असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणाम या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या माफतीने चौकशी करुन संबंधित दोषीवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मंत्री (रोहयो) यांचे निवेदन

उपरोक्त विषयाबाबतच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार लक्षवेधी सूचना क्र.२९५ बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

"उस्मानाबाद जिल्हायातील पुढील ग्रामपंचायती अंतर्गत रुई, ढोकी येथे ३९, रामवाडी येथे ३८, काजळा येथे ४७, नांदूर्गा येथे १९, जवळा दू येथे १६ ईला येथे ७१ हिंगळजवाडी येथे २७, घुगी येथे ८४, गावसुद येथे ६ अशाप्रकारे ३४१ बनावट मजूर दाखवून बनावट हजेरीपत्रके तयार करून त्या आधारे प्रत्यक्ष काम केले नसतांना वेजलिस्टमध्ये बीड जिल्हयातील खातेधारकांच्या खातेक्रमांकावर सुमारे रु.५,१०,५३४/- अकुशल भागाची अदायगी झाल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला तसेच प्रकरणी श्री.विजय रामचंद्र कोळी हे सहायक कार्यक्रम अधिकारी पंचायत समिती, उस्मानाबाद येथे कार्यरत

असताना त्यांना वैयक्तिक घरकुलाच्या कामावर हजर दाखवून त्याचे नावे, आई व त्यांच्या भावाच्या नावे हजेरी पत्रक निर्गमित झाल्याचे लक्षात आले त्यांनी सदर बाब गटविकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणली आणि (उपजिल्हाधिकारी रोहयो), उस्मानाबाद यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला. त्यानुसार प्रकरणी चौकशी करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली असून प्रकरणी अनियमितता/अपहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे त्याबाबतचे गांभीर्य विचारात घेवून जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सदर प्रकरणातील जबाबदार कंत्राटी कर्मचारी श्री.विश्वनाथ राऊत यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिले. श्री.विश्वनाथ राऊत यांच्या कंत्राटी सेवा कायमस्वरुपी समाप्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच सहाय्यक लेखाधिकारी श्री.आर.जे.लोंध हे सध्या निलंबित असून त्यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे. सदर प्रकरणी विश्वनाथ राऊत यांच्यावर आनंद नगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे दि.०३/१२/२०२२ रोजी भा.द.वि १८६० च्या कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१ व ४७७ (A) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणात पोलीस चौकशी चालू आहे. त्यामुळे प्रकरणात विलंब झालेला नाही.

---

# सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१५९९

श्री.संतोष बांगर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५९९

---

"रुग्णांना तातडीने सेवा मिळावी याकरीता राज्य शासनाने १०२ राष्ट्रीय रुग्णवाहीका सुरु करणे, राज्यात १०२ रुग्णवाहीकेवर जवळपास २००० चालक कार्यरत असणे, सदर वाहनचालकांना शासनाकडून किमान वेतन १९९०० रुपये मंजूर करण्यात आलेले असणे, तथापी संबंधित जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी आपल्या सोयीचा कंत्राटदार नेमून त्यांना केळव १० ते १२ हजार रुपये वेतनापोटी अदा करणे, त्यामुळे १०२ रुग्णवाहीका चालकांवर होणारा अन्याय, या अन्यायाच्या विरोधात रुग्णवाहिका चालक आपल्या न्याय हक्कासाठी मुंबई उच्च न्यायालयात गेले असता न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल देणे, तसेच "समान काम समान वेतन" लागू करण्याबाबत किंवा राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ११-११ महिन्याचे नियुक्ती आदेश देण्याबाबत वाहनचालकांची होत असलेली मागणी, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन १०२ रुग्णवाहीका चालकांच्या मागण्याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करण्याची तसेच शासनाने मंजूर केलेल्या किमान वेतनापेक्षाही कमी वेतन देणा-या जबाबदार अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही"

---

प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

राज्यामध्ये जिल्हा परिषद अधिनस्त १११७ वाहनचालकांची पदे जिल्हापरिषद स्तरावरुन ईनिविदेव्दारे बाहययंत्रणेमार्फत भरण्यात आलेली आहेत. कार्यरत वाहनचालकांस मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांच्याकडून जिल्हानिहाय ई निविदानुसार निश्चित केलेल्या बाहययंत्रणेमार्फत मानधन अदा करण्यात येत आहे.

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, दि.१७/०३/२०२० अन्वये कंत्राटी वाहनचालकास किमान वेतन रु.१४९००/- इतके निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आरोग्य सेवा आयुक्तायलाने दिनांक २८.०९.२०२० व दिनांक १५.१०.२०२० च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि, बुलढाणा, पालघर, धुळे या जिल्हयामध्ये वाहनचालकांना रु. १२०००/- व त्यापेक्षा कमी वेतन निश्चित केले आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये ईनिविदेवर न्यायालयीन प्रकरण उदभल्याने त्याच कंत्राटदारास त्याच निविदेवरील निश्चित केलेले वेतन अदा करण्यात येत आहे. पालघर, धुळे जिल्हयामध्ये तांत्रिक व प्रशासकिय कारणामुळे कमी वेतन अदा करण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये वाहनचालकांच्या नियुक्तीसाठी किमान वेतनाच्या आधारे ईनिविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु त्यापेक्षा कमी

निविदा प्राप्त झाल्याने किमान वेतनापेक्षा कमी वेतन अदा करण्यात येत आहे. तसेच उर्वरित सर्व जिल्हयामध्ये किमान वेतनावर वेतन अदा करणेत येत आहे.

जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कंत्राटी वाहनचालकानी मा. उच्च न्यायालयामध्ये त्यांना शासनसेवेत नियमितरित्या समाविष्ट करण्यासाठी याचिका क्र. २२४७/२०१४ दाखल केली होती सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक २०.११.२०१९ रोजी दिलेल्या निकालामध्ये कंत्राटी वाहनचालक यांची सेवा नियमित करण्याची बाब फेटाळण्यात आली, तथापी त्यांना नियमित वेतन श्रेणीमध्ये किमान टप्प्यावर वेतन देण्याबाबत निकाल देण्यात आला आहे.

जिल्हा परिषद चंद्रपूर येथील न्याय निर्णयाप्रमाणे राज्यातील लातुर, बीड, यवतमाळ, बुलडाणा, सोलापुर, कोल्हापूर या जिल्हयातील बाहययंत्रणेद्वारे नियुक्त कंत्राटी वाहनचालक यांनी नियमित वेतनश्रेणीतील वेतनश्रेणीत किमान टप्यावर वेतन मिळण्याची मागणी केलेली आहे. यापैकी जिल्हा परिषद सोलापूर अधिनस्त बाहययंत्रणेव्दारे नियुक्त वाहनचालकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठात याचिका.क्र. ९२६८५/२०२० दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दि. ०८.१२.२०२० रोजी आदेश पारित करून मा. उच्च न्यायालय नागपूर येथील खंडपीठाने दि. २०.११.२०१९ रोजी दिलेल्या निकालाप्रमाणे नियमित वेतनश्रेणीतील वेतनश्रेणीत किमान टप्यावर वेतन अदा करण्याचा निकाल दिला आहे. सदर आदेशाविरुध्द जिल्हा परिषद सोलापूर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्र. ८३९५/२०२१ दाखल केली होती. परंतु सदर याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २३.०३.२०२२ रोजी आदेश पारित करुन खारीज केली.

जिल्हा परिषद सोलापूर येथील कंत्राटी वाहन चालकांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपिठामध्ये दाखल अवमान याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दिनांक ०८.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आवश्यक अनुदानाच्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे इतर जिल्ह्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात १०२ क्रमांकाच्या राज्यातील रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे रुग्णवाहिकांवर एकुण ११०७ वाहनचालकांसाठी निविदा प्रक्रियेव्दारे १८ सेवा पुरवठादाराची निवड करण्यात आली आहे. सदर सेवा पुरवठादारास करारनामा करून अटी व शर्तीनुसार देयके अदा करण्यात येत आहेत. सदर वाहनचालकांचा वेतनाचा दर सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि. १७.०३.२०२० नुसार एकूण रू.१५,९३१/- ठरविण्यात आला असून पुरवठारास तसे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये सदर वाहनचालक बाह्ययंत्रणेव्दारे घेण्याचे नमूद असल्याकारणाने सदर वाहनचालकास राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ११-११ महिन्याचे नियुक्ती आदेश देता येत नाहीत.

*************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

### श्री.हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

संपूर्ण महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरात नावाजलेल्या मुंबई- नागपूर समृध्दी महामार्गाचे काम प्रगतीपथावर असून काही ठिकाणी हा महामार्ग वाहतूकीस सुरू करण्यात येणे, इगतपुरी तालुक्याला (जि. नाशिक ) छेदून हा मार्ग जात असून घोटी-सिन्नर मार्गावर अनेक ठिकाणी चाळण झाली असून मोठमोठे खड्डे पडल्याने स्थानिक नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना, रुग्णांना व लहान-मोठया वाहनधारकांना या प्रकल्पामुळे ऐन पावसाळयात मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जुलै, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच संबधित ठेकेदाराने या रस्त्यांची कायमस्वरुपी दुरस्ती करणे आवश्यक असतांनाही या रस्त्यांची दुरूस्ती करण्यात न येणे, तसेच याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांकडूनही दुर्लक्ष करण्यात येणे, पर्यटनासाठी येणा-या तसेच रोज भाजीपाला अथवा मालवाहतूकीसाठी प्रवास करणा-या प्रवाशांना नेहमी आपला जीव धोक्यात घालून जीवघेणा प्रवास करावा लागणे, परिणामी स्थानिक नागरिक, शेतकरी तसेच आबाल वृध्दांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन या रस्त्यांची दुरुस्ती करुन संबंधित ठेकेदार व प्रशासनावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.

................................................................................................................................................

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक जिल्ह्यात नागपूर-मुंबई शीघ्र संचार द्रुतगती महामार्ग (हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग चे पॅकेज १३ अंतर्गत मौजे सोनारी, ता. सिन्नर ते मौजे तारांगणपाडा ता. इगतपुरी चा ५७७/७३२ ते ६२३/३७९ हे काम वेगाने प्रगतीपथावर आहे. इगतपुरी तालुक्यातील एकूण लांबी ३९.६२ कि.मी मध्ये समृद्धी महामार्गाचे काम मंजूर आहे. इगतपुरी तालुक्यात घोटी सिन्नर राष्ट्रीय महामार्ग क्र १६० A ला समृद्धी महामार्ग फक्त दोन ठिकाणी छेदून जात आहे. घोटी सिन्नर महामार्ग किमी ६०/९७५ मध्ये V.O.P (समृद्धी महामार्ग किमी ६०९ + १८७) व किमी ११/२०० मध्ये V.U.P. (समृद्धी महामार्ग कि.मी. ६१२ + ३१८) छेदून जात असून सदर V.O.P (कि.मी.६०९+१८७) व V.O.P (कि.मी.६१२+३१८) ची घोटी सिन्नर राष्ट्रीय महामार्गावरील जोड रस्त्याची एकूण लांबी १२०० मी (९००+३००) आहे.

सदर रस्ता वापरण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद (इ.व.द) विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या), शिबिर कार्यालय नाशिकचे प्रतिनिधी व समृद्धी महामार्गाच्या पॅकेज १३ साठी नेमण्यात आलेले तांत्रिक सल्लागार कंपनी मे. एस.ए. इन्फ्रास्ट्रक्चर लि. चे इंजीनियर यांचे समवेत संयुक्त पाहणी करून रस्त्यांच्या दुरुस्तीचे स्वरूप व वापरलेली लांबी अंतिम करण्यात आली सर्वानुमते उपरोक्त रस्ते वापरावेळी समृद्धी महामार्गाच्या कंत्राटदाराकडून देखभाल दुरुस्ती करून सुस्थितीत ठेवण्याबाबत समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करण्याबाबतचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार सिन्नर

घोटी रस्ता वरील नमूद केलेल्या १२०० मी. लांबीत "डांबर मिश्री खडीने खड्डे भरणे व नूतनीकरण कॉंक्रीट ने करणे" ची तरतूद आहे. त्यानुसार समृद्धी महामार्गासाठी नेमलेल्या ठेकेदाराकडून वरील १२०० मी. लांबीत रस्त्यांची तात्पुरत्या स्वरूपात व दुरुस्तीसाठी खडी व मुरमाणे (GSB) ने खड्डे भरून रस्ता वाहतुकीस आज तो सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे व वाहतूक सुरळीत चालू आहे.

आजपावेतो समृद्धी महामार्गाचे इगतपुरी तालुक्यातील कामे वेगाने प्रगतीपथावर असून सिन्नर घोटी रस्त्यावरील व्ही.ओ.पी व वी.यु.पी चे काम पूर्ण झाल्यानंतर सिन्नर घोटी रस्त्यावरील १२०० मी. लांबी संयुक्त पहाणी अहवालात नमूद केल्याप्रमाणे काम अंतिम करण्यात येईल.

घोटी रस्त्यावरील नमूद केलेली (१२०० मी) लांबी वगळून उर्वरित लांबी ही नॅशनल हायवे ॲथोरिटी (NHAI) यांच्या अखत्यारित देखभाल दुरुस्तीसाठी आहे.

**************************************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधीवेशन

**लक्षवेधी सुचना क्र. १४६९**

मा. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६९ पुढील प्रमाणे आहे.

" अकोला-अकोट राज्य महामार्ग क्रमांक २०४ वरील गांधीग्राम गावाजवळील पूर्णा नदीवरील ब्रिटीश कालीन पूल खचल्याने महामार्गावरील वाहतूक बंद होणे, पर्यायी वळण रस्ता खर्चिक, अरुंद, वेळ व इंधन खर्च तसेच वाहतूक योग्य नसणे, महामार्गावरील सा.क्र.१०४/६०० वरील पर्यायी बांधकामाधीन पुलाचे भूसंपादन अभावी रखडणे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर नवीन पुलाचे बांधकामाची अलाईनमेंट बदलल्यामुळे तसेच अलाईनमेंट करीता नव्याने जमीन संपादनाची आवश्यकता निर्माण होणे, परंतु पुन्हा नव्याने जमीन देण्यास शेतक-यांचा कडाडून विरोध असणे, संपादीत करावी लागणारी जमीन सरळ खरेदी द्वारा खरेदी करुन जमीनचा अद्यावत बाजार भावाच्या ५ पट रक्कम मोबदला देण्यात यावा या अटीवर शेतक-यांची मागणी असणे, अलाईनमेंट बदलण्यापूर्वी जुन्या अलाईनमेंट प्रमाणे शासनाने अल्प दरात खरेदी केलेली तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे चुकीमुळे पूर्वी संपादित केलेली जमीन मूळ शेतक-यांना परत करावी अशा अटींवर बाधीत होणा-या शेतक-यांनी जमिनी संपादनासाठी संमतीपत्र देणे, रा.मा. २०४ या महामार्गावरील वाहतूक बाधित झाल्याने दररोज हजारो प्रवासी, शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण व्यापारी यांचे अतोनात हाल सुरु असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, शेतक-यांना जमिनीचा योग्य मोबदला तसेच शेतक-यांची काहीही चूक नसतांना याच कामासाठी शासनाकडून पूर्वी संपादित केलेली जमीन मूळ शेतक-यांना परत करणे या बाबत शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही. "

---

**श्री. रविंद्र चव्हाण, मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

राज्य महामार्ग क्र. २०४ वर साखळी क्र. १०५/१४० वर पुर्णा नदीवरील पूल धोकादायक झाल्याने जिल्हा प्रशासनाच्या दि.१८.१०.२०२२ च्या अधिसूचनेव्दारे सदर पुलावरुन वाहतूक बंद करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गावरील पूल बंद केल्याने किनखेड सासण-म्हैसांग-अकोला हा पर्यायी रस्ता वापरासाठी प्रस्तावीत करण्यात आला. यात अकोला-रामतीर्थ ७ मी. रुंदीचा, २९ कि.मी., रामतीर्थ-सासण फाटा ३.७५ मी. रुंदीचा, ९ कि.मी., सासन फाटा- किनखेड ५.५० मी. रुंदीचा, २७ कि.मी. अशा प्रकारे ६५ कि.मी. लांबीचा फेरा वाहतूक वर्दळीस पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि हा मार्ग अवजड वाहनासाठी सुसाध्य नाही. जड वाहने अकोला-म्हैसांग-दर्यापूर-अकोट मार्गाचा वापर करत असून, यात अकोला-दर्यापूर-अकोट हा ७.०० मी. रुंदीचा ८७ कि.मी. लांबीचा रस्ता वापरण्यात येत आहे. मूळ अकोला ते अकोट हे अंतर ४६ कि.मी. आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विशेष पाठपुराव्यामुळे अकोला-अकोट रेल्वे सेवा दैनंदीनरित्या सुरु करण्यात आली असल्याने, स्थानिकांना सोईस्कर अशी वाहतुकीची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

राज्य मार्ग-२०४ (नवीन रा.मा.२८१) वरील प्रस्तावित वळण रस्ता ४.६० कि.मी. लांबीचा असून लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद साखळी क्र. १०५/१४० वर पुर्णा नदी वरील पुलाच्या लगतचे गोपालखेड शिवारातील २.०६ कि.मी., किनखेड शिवारातील १.५५ कि.मी. रस्त्याचे भूसंपादन प्रगतीपथावर आहे.

गांधीग्राम शिवारातील १ कि.मी. लांबीत कोणतेही बदल होत नसून, अतिरिक्त भूसंपादनाची आवश्यकता असणार नाही. गोपालखेड शिवारातील मूळ ४.१७ हे.आर. क्षेत्राचे भूसंपादन करण्यात आले होते, व त्याप्रमाणे मोबदला देण्यात आला होता. तद्नंतर नवीन संरेखनामुळे जास्तीचे ४.६१ हे. आर भूसंपादन करावे लागणार आहे. यामध्ये मूळ ४.१७ हे.आर पैकी १.३४ हे. आर. वापरात येणार असून २.८३ हे. आर. क्षेत्र वापरात येणार नाही. किनखेड शिवारातील १.५५ कि.मी. लांबीतील मूळ ४.०६ हे.आर भूसंपादीत क्षेत्रात वाढ होत असून, अधिकचे १.८७ हे.आर भूसंपादन लागणार आहे. यापूर्वी झालेल्या भूसंपादनाव्दारे संपादित गांधीग्राम व किनखेड शिवारातील जमीन संपूर्णत: वापरात येणार असून गोपालखेड शिवारातीलअंदाजे २.८३ हे.आर. क्षेत्र वापरात येणार नाही.

रस्त्याचे संरेखन बदलल्यामुळे भूसंपादनामध्ये बदल झालेले आहेत. सद्य:स्थितीत भूसंपादन सरळखरेदीव्दारे करण्यासाठी जिल्हाधिकारी, अकोला यांचे स्तरावर प्रस्तावित आहे. संरेखन (अलाईनमेंट) बदलल्यामुळे जुन्या संरेखनाप्रमाणे शासनाने अल्पदरात खरेदी केलेली जमीन मूळ शेतक-यांना परत करावी, या अटीवर बाधीत होणा-या शेतक-यांनी जमीन संपादनासाठी संमतीपत्र दिलेली आहेत. जमीन परत करण्याबाबत शासनाच्या प्रचलित नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. भुसंपादन मोबदल्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. २६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये रु.३.५० कोटी क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध करुन दिले आहेत. तसेच प्रस्तावित ४.६० कि.मी. वळण रस्त्यापैकी ७०० मी. लांबीत डांबरी स्तरापर्यंत व ३०० मी. लांबीत मातीकाम पूर्ण झालेले आहे. या संपूर्ण लांबीत २ मोठे पूल, ३ लहान पूल आणि ४ पूल मो-या पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. अद्यापि ३.६० कि.मी. लांबीत रस्त्याचे काम भूसंपादना अभावी होऊ शकले नाही. सदरील भूसंपादनाची प्रक्रिया फेब्रुवारी-२०२३ अखेर पुर्ण होऊन जून-२०२३ अखेर काम पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन आहे.

**********

१९९७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२२ चे चतुर्थ (हिवाळी ) अधिवेशन**

**श्री. सुनिल भुसारा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९९७**

**लक्षवेधी सूचना**

"पालघर जिल्हयातील विक्रमगड मतदार संघातील मुखाडा तालुक्यातील राऊतपाडा, बलदयाचापाडा, घोडीपाडा, कुंभीपाडा व करोली या गावात तेथील लोकप्रतिनिधीनी सुचविलेली सोलर लाईट, ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत मार्च, २०२० मध्ये विकास कामे करण्यात येणे, या कामांवर १ कोटी १० लक्ष रुपये करण्यात आलेला खर्च, या कामाची परिस्थिती अतिशय वाईट झालेली असून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आलेल्या असणे, या कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन ज्या एजन्सीसने ही कामे केलेली आहेत त्या एजन्सीवर त्वरीत कारवाई करण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांविरुध्द सुध्दा कारवाई करण्याची लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**मा. श्री. रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील राऊतपाडा, बलद्याचापाडा, कुंभीपाडा व करोली या गावात ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सोलर लाईट बसविण्याची कामे माहे, फेब्रुवारी, २०२१ मध्ये करण्यात आली आहेत. उपरोक्त कामातील सर्व विद्युत साहित्य विनिर्दिष्ट मानकाप्रमाणे असून कामे करारनामातील तरतुदी प्रमाणे कार्यान्वित आहेत व उपभोक्ता विभागास वापरासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहेत. सदर कामाबाबत उपभेक्ता विभागाकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.

*****************************

प्रोटा H/1583 (700-3-23)

लक्षवेधी सूचना क्र.९२९

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

डॉ.देवराव होळी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभानियम १०५ अन्वये उपस्थीत केलेली लक्षवेधी सूचना क्र.९२९ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळात हंगाम २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये धान खरेदी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, या खरेदी केंद्रावर दिवसाला १००० क्विन्टल ते ६००० क्विन्टल पर्यंत धानाची आवक झाल्याची बाब निदर्शनास येणे, मात्र आलेल्या धानाची भरडाई विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे शिल्लक राहिलेल्या धानाची विक्री विलंबाने होऊन महामंडळास प्रचंड तोटा येणे, धानाच्या या खरेदी मध्ये मोठ्या प्रमाणात व्यापारी खरेदी झालेली असून अधिकाऱ्यांनी नियंत्रण न ठेवल्यामुळे धानाची प्रचंड नासाडी होवून यामध्ये शासनाला मोठ्या प्रमाणात तोटा येणे, शासनाला होणाऱ्या या तोट्यासाठी याकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी सर्वस्वी जबाबदार असणे, केवळ स्वतःला लाभ मिळावा या वैयक्तिक स्वार्थासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात शासनाचे आर्थिक नुकसान करणे, शासनाला तोटा झाला तरी चालेल मात्र मला लाभ मिळावा या प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, शासन या प्रकरणी दोषी अधिकाऱ्याना निलंबित करून एस आय टी मार्फत तत्काळ चौकशी करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया"

---

मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत हंगाम २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये विभागामार्फत दरवर्षी प्रमाणे धान खरेदी करीता शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. त्याअन्वये राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात धान/भरडधान्य खरेदीकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांची मुख्य अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार सदर महामंडळाच्यावतीने आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मार्फत धानाची खरेदी करण्यात आलेली आहे. हंगाम २०२०-२१ व २०२१-२२ मधील धान खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

पणन हंगाम २०२०-२१ (खरीप व रब्बी)

| खरेदी केंद्र संख्या | धान खरेदी वजन क्विं. | धानाची किंमत (रू.कोटीत) |
|---|---|---|
| २४६ | ४७६८४५७.२८ | ८९०.७५ |

पणन हंगाम २०२१-२२ (खरीप व रब्बी)

| खरेदी केंद्र संख्या | धान खरेदी वजन क्विं. | धानाची किंमत (रू.कोटीत) |
|---|---|---|
| २५९ | ४५२३९३०.८७ | ८७७.६५ |

धानाची उत्पादकता वाढल्याने व हमीभाव मिळत असल्याने शेतकरी धान विक्रीकरीता शासकीय खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी येतात. त्यामुळे गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात धानाच्या खरेदीत वाढ झालेली आहे. खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये धान खरेदीसाठी प्रथम दि.०१.१०.२०२१ ते दि.३१.०१.२०२२ असा खरेदी कालावधी निश्चित करण्यात आला होता. परंतू संपूर्ण नोंदणीकृत शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळावा व सदर योजनेच्या लाभापासून शेतकरी वंचीत राहू नये, यासाठी उक्त हंगामात धान खरेदीसाठी शासनामार्फत दि.१८.०२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत धान खरेदी पूर्ण व्हावी याकरिता आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यात काही खरेदी केंद्रावर २ ते ३ वजन काटे लावल्यामुळे सदर खरेदी केंद्रांवर दिवसाला ८०० ते १५०० क्विंटल पर्यंत धान खरेदीत वाढ झाली.

रोटा/प्च ११६५(७५०-२-२०२३) [कृ.मा.प.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत अभिकर्ता संस्थामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या धानाच्या भरडाईकरीता दरवर्षी राज्य शासनाकडून शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली धान भरडाई समन्वय समिती स्थापन करण्यात येते. सदर समितीमार्फत धान भरडाईसाठी राईस मिलर्स निश्चित केले जातात. तथापि, पणन हंगाम २०२०-२१ मध्ये धानाच्या भरडाईमध्ये तुकडयाचे प्रमाण जादा येत असल्याने राईस मिलर्सनी प्रामुख्याने गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये धान भरडाईचे काम करण्यास नकार दिलेला होता आणि धान भरडाईच्या दरात वाढ करणे व भरडाईस प्रोत्सहनपर रक्कम देणेबाबत मागणी केली होती.

सदर योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाचे नासाडी होऊन शासनाचे तसेच अभिकर्ता संस्थांचे नुकसान होऊ नये तसेच मिलर्सनी केलेली मागणी विचारात घेता, खरीप पणन २०२०-२१ मध्ये खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईसाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या प्रति क्विंटल रु.१०/- भरडाई दर व्यतिरिक्त राज्य शासनाच्यावतीने मिलर्सना शासन निर्णय, दि.१४.०५.२०२१ अन्वये प्रती क्विंटल धानाच्या भरडाईसाठी रु.१०+रु.४० असे एकूण रू.५०/- भरडाई दर व एकवेळची विशेष बाब म्हणून प्रती क्विंटल रु.१००/- प्रोत्साहनपर राशी (अपग्रेडेशन चार्जेस) मंजूर करण्यात आले. तद्नंतर धान भरडाईची (हंगाम २०२०-२१) कार्यवाही सुरु झाली. त्यामुळे सदर हंगामात धान भरडाईस काही प्रमाणात विलंब झाला. तथापि, धान भरडाईकरिता शासनामार्फत वेळोवेळी मुदतवाढ देऊन पणन हंगाम २०२०-२१ व २०२१-२२ मधील धानाची अनुक्रमे ९५.१३ व ९६.५६% भरडाई पूर्ण झालेली आहे.

शासन निणर्यातील तरतुदीनुसार भरडाई विना शिल्लक राहिलेल्या धानची जबाबदारी अभिकर्ता संस्थांची राहते. तथापि, अभिकर्ता संस्थांचे नुकसान होऊ नये यासाठी शिल्लक धान ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येते. आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदीवर केंद्र शासनाकडून १% आर्द्रता घट मंजुर केली जाते. त्यापेक्षा जादा आलेली अवाजवी घट आल्यास संबंधीत संस्था, अधिकारी/कर्मचारी यांची प्राथमिक व खाते चौकशी केल्यानंतर चौकशी अहवालात जे दोषी आढळून आल्यास त्यांच्याकडून अवाजवी घटी वसुली केली जाते.

आदिवासी विकास महामंडळामार्फत पणन हंगाम २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईअंती अनुक्रमे ७११९९.६७ व १८३६२.२१ क्विंटल धान भरडाई विना शिल्लक आहे. गडचिरोली जिल्ह्यातील हंगाम २०२०-२१ मधील शिल्लक धानाची चौकशी करुन ई-लिलावाद्वारे विक्रीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच हंगाम २०२१-२२ मधील शिल्लक धानाचा पंचनामा करुन ई-लिलाव करण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यातील हंगाम २०२०-२१ मधील शिल्लक धानाचा दि.२३.०६.२०२२ व दि.२४.०६.२०२२ रोजी ई-लिलाव घेऊन विक्री करण्यात आला आहे. हंगाम २०२१-२२ मध्ये गोंदिया जिल्ह्यात धानसाठा शिल्लक नाही.

जिल्हा गोंदिया अंतर्गत हंगाम २०२१-२२ मध्ये खरेदी केंद्र गोरे येथे अनियमितता झाल्या प्रकरणी संस्था सचिव तसेच संचालक मंडळावर फौजदारी गुन्हा क्र.०४७५/२०२२, दि.१४.१०.२०२२ रोजी दाखल केलेला असून, पुढील तपास पोलस विभागामार्फत सुरु आहे. सदर प्रकरणी तत्कालीन उप प्रादेशिक व्यवस्थापक, देवरी, तत्कालीन प्रभारी विपणन निरीक्षक, खरेदी केंद्र गोरे यांना निलंबित करुन प्राथमिक चौकशी करण्यात आली. सदर चौकशीचा अहवाल दि.२१.०२.२०२३ रोजी प्राप्त झाला असून, दोषारोपानुसार आदिवासी विकास महामंडळांतर्गत खाते चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

गडचिरोली जिल्ह्यात खरेदी केंद्र मुरुमगाव एटापल्ली व उडेरा येथे बोगस धान खरेदी केल्याप्रकरणी संस्था सचिव व संचालक मंडळावर अनुक्रमे गुन्हा क्र.००६७/२२, दि.३१.०८.२०२२, गुन्हा क्र.००३४/२२, दि.१२.०७.२०२२ व गुन्हा क्र.००३५/२२, दि.१२.०७.२०२२ दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर संस्थेचे विपणन निरीक्षक यांना निलंबित करण्यात येऊन प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, दोषारोपानुसार आदिवासी विकास महामंडळांतर्गत खाते चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

धान खरेदी करतांना शेतकऱ्यांचे सातबारा उतारा, बँक खाते क्रमांक, आधारकार्ड इ. घेऊन त्यांची NeML पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केली जाते. नोंदणीकृत शेतकऱ्यांना NeML पोर्टलमार्फत SMS पाठवून त्यांचे शेड्युलींग करून धान विक्रीकरिता बोलविण्यात येते. तसेच शेतकऱ्यांच्या धानाचे चुकारे देखील त्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा केले जातात. व्यापारी खरेदी झाल्याबाबत निर्दशनास आले नाही.

************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्र.१८४**

**श्री.छगन भुजबळ,श्री अजित पवार, श्री. धनंजय मुंडे, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री. जयंत पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८४ पुढीलप्रमाणे आहे:**

" मराठा समाजातील विद्यार्थ्यांना अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास विद्यार्थ्यांप्रमाणेच वर्षाला ६० हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा दि.२ नोव्हेंबर २०२२ रोजी शासनाने निर्णय घेतला असणे, हा निर्णय घेतांना ज्या ओबीसी विद्यार्थ्यांचा शासनाने आधार घेतला त्या ओबीसी विद्यार्थ्यांसाठी अद्याप निवार्ह भत्ता योजना सुरु झालेली नसल्यामुळे राज्यातील विविध संघटनांनी राज्यभर आंदोलने व संताप व्यक्त केलेला असणे, ओबीसी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळण्याच्या मागणीसाठी विविध सामाजिक संघटनांनी दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी वर्धा व इतर ठिकाणी आंदोलन केले असणे, आबीसी गुणवंत विद्यार्थी विद्यार्थीनींना बाहेरगावी मोठ्या शहरामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळुनही शासकीय वसतीगृह किंवा निवासाची पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे, शिक्षणापासुन वंचित राहावे लागत असणे, राज्यामध्ये शासनाची अनुसूचित जातींसाठी २८६९ वसतीगृहे असणे, अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांसाठी ९७३ वसतीगृहे असणे, तर भटक्या जाती व भटक्या जमातींसाठी ८७३ वसतीगृहे असणे, असे असतांना सुध्दा अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांची क्षमता पूर्ण झाल्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांचेसाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागु केलेली असणे. या योजनेअंतर्गत वसतिगृहासाठी पात्र विद्यार्थ्यांना निवासाठी घरभाडे व भोजन शुल्क याप्रमाणे प्रतिवर्षी प्रती विद्यार्थी रुपये ६० हजार स्वाधार निधी दिला जात असणे, तर पात्र एस.टी.विद्यार्थ्यांना सुध्दा स्वाधारच्या धर्तीवर स्वयम या योजनेखाली वर्षाला ६० हजार निधी दिला जात असणे, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृहे असावी असा शासनाने निर्णय घेतलेला असणे, मात्र वसतीगृहांसाठी जागा व निधीच्या कारणामुळे ओबीसी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा निर्माण होण्यासाठी अनेक वर्ष लागणार असणे, दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार हे भाडयाने इमारती घेवून ते शासनाने चालविण्याऐवजी खाजगी स्वयंसेवी संस्थांना वसतीगृह चालविण्यासाठी मोकळीक करून दिलेली असणे, खाजगी संस्थांना चालविण्यासाठी निर्णयाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात असणे, खाजगी स्वयंसेवी संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी देण्याऐवजी शासनाची वसतिगृह बांधाण्यासाठी प्राधान्य देणे आणि तोपर्यंत शासकीय किंवा भाड्याच्या इमारतीमध्ये शासकीय यंत्रणेकडून वसतिगृह सुरु करण्याची आवश्यकता असणे, स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता देण्याकरीता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात यावी अशी लोकप्रतिनिधींनी दि. १० नोहेंबर २०२२ व दि. १ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, त्यामुळे स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्याचा लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांनी करावयाचे निवेदन**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या पुणे येथील दौऱ्यामध्ये दि. ५.१०.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्हयात इतर मागास वर्गातील मुला-मुलींसाठी नवीन शासकीय

वसतिगृह सुरु करण्याची व त्यांची देखभाल करण्याची सूचना राज्य शासनास केली होती. त्यानुषंगाने प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर आणून मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातुन राज्यातील इतर मागास वर्ग या प्रवर्गातील मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृह सुरु करण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक-इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१, दि.३० जानेवारी, २०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिविद्यार्थी रु.३.०० लक्ष या प्रमाणे १०० मुलांसाठी ६० टक्के व १०० मुलींसाठी ९० टक्के या प्रमाणात वसतिगृह बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. त्यानुसार शासकीय जमीन उपलब्ध झालेल्या नागपूर, अहमदनगर, वाशिम व यवतमाळ या जिल्हयांचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आले असुन दि.२०.०७.२०१८ पासून सदर प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येत असून केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त होण्यासाठी व त्यानंतर वसतिगृह कार्यान्वित होण्यासाठी लागणारा बराच कालावधी विचारात घेऊन, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांच्या (N.G.O) माध्यमातून भाडयाच्या इमारती घेऊन, सुरु करण्यास व त्यासाठी रु.७३.८१ कोटी इतक्या खर्चास दि.२९/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. तथापि मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना (N.G.O) वसतिगृह चालविण्यासाठी **देण्याऐवजी** शासनाने स्वत: वसतिगृहासाठी इमारत भाडयाने घेवून प्रत्येक जिल्ह्यात, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील १०० मुले व १०० मुली या मर्यादेत प्रति जिल्हा २०० याप्रमाणे ३६ जिल्ह्यांसाठी एकूण ७२०० पात्र विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी/विद्यार्थीनीना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत जिल्हानिहाय दोन याप्रमाणे ७२ वसतीगृहे कार्यान्वित करण्यास दि.२८.०२.२०२३ अन्वये शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

४. वसतिगृहाचे बांधकाम करणे किंवा भाडयाने उपलब्ध करुन देणे यासाठी लागणाऱ्या खर्चात अधिक विदयार्थी लाभ घेऊ शकतील ही बाब विचारात घेता, आदिवासी विकास विभागाची "स्वयंम" योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची "स्वाधार" योजनेच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त व भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग या प्रवर्गातील वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विदयार्थी संख्येच्या मर्यादेत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विदयार्थ्यांना प्रतिवर्षी स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करणे नविन प्रस्तावित आधार योजनेतर्गत लाभ देण्याची बाब विचाराधिन आहे.

-----------------------

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

**श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"मलकापूर जिल्हा बुलढाणा येथील " दि मलकापूर अर्बन बँकेच्या राज्यभरात सुमारे २८ शाखा असून सुमारे एक हजार कोटींच्या वर ठेवी असताना संचालक मंडळाच्या अपरातफरीबाबत शासनास प्राप्त तक्रारी व लोकप्रतिनिधी या नात्याने मी तत्कालीन उपमुख्यमंत्री यांचेकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ पासून रिझर्व बँकेने मलकापूर अर्बन बँकेवर निर्बंध लावलेले असणे, सुरुवातीला हे निर्बंध सहा महिन्यासाठी असताना त्यास आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात येऊन रूपये पाच लक्ष पर्यंत ठेवी असलेल्या ठेवीदारांना आरबीआयच्या निर्देशाप्रमाणे संरक्षित करण्यात आल्यामुळे त्या ठेवीदारांच्या ठेवी बँकेद्वारे परत करण्यात येत असणे, तथापि रुपये पाच लक्षच्या वर ठेवीदारांना मात्र निराशा पदरी पडल्याने प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, संचालक मंडळाच्या अंदाधुंद कारभाराबद्दल यापूर्वी देखील पुराव्यासह सविस्तर तक्रार दाखल केलेली असणे, ज्यामध्ये विशेषत: बँकेचे तत्कालीन संचालकाचे मोठे बंधू यांचे निधन सन २०१० मध्ये झाल्यानंतर देखील सन २०१३ पर्यंत त्यांची पावर ऑफ अॅटर्नी हेतू पुरस्सर वापरण्यात येऊन जवळच्या व नात्यातील लोकांना क्षमतेपेक्षा जास्त कर्ज वाटप करण्यात आलेले असणे, सन २०१९ मध्ये बँकेला ऑडिट मध्ये "ड" वर्ग मिळालेला असणे, तसेच बँकेची आर्थिक परिस्थिती प्रचंड खालावल्यामुळे मागील तीन वर्षापासून भागधारकांना लाभांश देखील देण्यात आलेला नसणे, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांना डावलून स्वत:च्या मुलाला अध्यक्षपदी विराजमान करणे तसेच बँक डबघाईला जाताच त्याचा राजीनामा न घेताच पुन्हा स्वत: अध्यक्षपदी विराजमान होणे, जवळच्या व नात्यातील लोकांना क्षमतेपेक्षा जास्त कर्ज वाटप करणे, संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या नावावर भरमसाठ कर्जाची उचल करणे, म्हाडा व शक्ती दूध प्रकरणांत सर्वसामान्य अर्जदारांच्या नावे परस्पर कर्ज उचलणे हे व असे अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप पुराव्यासह तक्रारीमध्ये करण्यात आलेले असल्याने तत्काळ संचालक मंडळ बरखास्त करण्याची आवश्यकता आणि लाखो ठेवीदारांना त्यांच्या कष्टाचा व हक्काचा पैसा त्वरित मिळवून देण्यासंबंधी शासनाने उचलावयाची पावले व करावयाची कार्यवाही."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

दि मलकापूर अर्बन को-बँक लि. मलकापूर, जि. बुलडाणा या बँकेमधील आर्थिक अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेने सदर बँकेवर दि. २४.११.२०२१ रोजी (All Inclusive Directions) निर्बंध लादले. त्यानुसार बँकेस नविन कर्ज वाटप करण्यास तसेच नविन ठेवी स्विकारण्यास मनाई करण्यात आली. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन, वीजबिले, भाडे, स्टेशनरी इ. आवश्यक खर्च वगळता इतर खर्चासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्याचे निर्देश दिले. सदर निर्बंधाना दि. २४.०२.२०२३ रोजीपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

रिझर्व्ह बँकेने दि मलकापूर अर्बन को-बँक लि. या बँकेवर निर्बंध लादले त्या तारखेस बँकेमध्ये रु. ५ लाखाखालील ९०,९२६ ठेवीदारांच्या एकूण रु. ३३०.२२ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या व रु. ५ लाखावरील ४,४६३ ठेवीदारांच्या एकूण रु. ९०५.८८ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या. अशा एकूण ९५,३८९ ठेवीदारांच्या रु. १२३६.१० कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या.

बँकेला DICGC कडून प्राप्त झालेल्या क्लेम रक्कमामधून रु. ५ लाखापर्यंत ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना रु. ४९६.९८ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी आतापर्यंत अदा करण्यात आल्या आहेत. उर्वरीत ठेवीदारांच्या ठेवी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

रेखा H/1037 (7००-2-23)

२३१०



मा. श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दि. १६.०७.२०२० रोजी दि मलकापूर अर्बन को-बँक लि. या बँकेसंदर्भात खालील मुद्यांबाबत तक्रार दाखल केली आहे. त्यापैकी महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत-

१. सन २०१० मध्ये श्री. शक्तीभाऊ संचेती मयत असतानादेखील श्री. चैनसुख संचेती यांनी मुखत्यार म्हणून स्व. शक्तीभाऊ संचेती यांचे चिरंजीव अजयकुमार संचेती यांचे कर्ज प्रकरणाची कर्जमर्यादा नियमबाह्य वाढवून दिली.

२. सन २०१६ मध्ये बँकेच्या अध्यक्षपदी श्री. चैनसुख संचेती यांनी त्यांचे चिरंजीव श्री. राहुल चैनसुख संचेती यांची वर्णी लावल्यानंतर बँकेची आर्थिक स्थिती इतकी खालावली की, मागील तीन वर्षापासून भागधारकांना लाभांश देण्यात आला नाही.

सदर तक्रारीस अनुसरुन सहकार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, बुलडाणा यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली.

चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, श्री. अजयकुमार संचेती यांचे सदर बँकेत रु. ३.५ कोटी इतक्या रक्कमेचे कॅश क्रेडीट रिअल इस्टेट खाते सन २००६ पासून आहे. सदर कर्ज खात्यासठी कर्जदाराने त्यांच्या सामाईक मालकीची मालमत्ता गहाण ठेवली होती. मात्र सदर मालमत्ता सामाईक असल्याने कर्जदाराचे वडील श्री. शक्तीकुमार संचेती व मालमत्तेच्या इतर सहमालकांनी कर्जदारास व्यवहार करणे सुलभ व्हावे म्हणून त्याच्या नावे कुलमुखत्यार पत्र करुन दिले होते. सन २००९ मध्ये सदर खात्याच्या कर्जमर्यादा नुतनीकरणाच्या वेळी त्यांचे वडील श्री. शक्तीकुमार संचेती जिवंत होते. सन २०१० मध्ये श्री. शक्तीकुमार संचेती मयत झाले. त्यानंतर सन २०१२ मध्ये सदर खात्याच्या कर्जमर्यादा नुतनीकरणाच्यावेळी कुलमुखत्यारपत्र करुन देणाऱ्यापैकी एक व्यक्ती मयत झाली ही बाब अनावधानाने बँकेकडून दुर्लक्षीत झाली. सदर कर्जखाते दि. २९.०५.२०१७ रोजी निरंक झाले आहे. या प्रकरणात कर्जदाराला कोणतीही सुट दिल्याचे अथवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

श्री. राहुल चैनसुख संचेती यांची दि. २७.०५.२०१६ रोजी सदर बँकेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. बँकेने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये सभासदांना ८% लाभांश दिला आहे. तथापि सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षात अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक त्या तरतूदी केल्यानंतर लाभांश वाटण्याकरीता नफा शिल्लक नसल्याने भागधारकांना लाभांश वाटप करण्यात आला नाही. तद्नंतर श्री. राहुल चैनसुख संचेती यांनी दि. २१.०३.२०२० रोजी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर श्री. चैनसुख संचेती यांची दि. ०९.०४.२०२० रोजी सदर बँकेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

मा. श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी मा. मंत्री (सहकार) यांना सादर केलेल्या निवेदनामधील इतर मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत सहकार आयुक्त यांनी दि. २२.०८.२०२२ रोजी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, बुलडाणा यांना निर्देश दिले होते. त्यानुषंगाने सादर केलेल्या अहवालानुसार, बँक व बँकेचे कर्मचारी यांमध्ये कर्जाबाबत केलेल्या करारनाम्यानुसार बँक सर्व कायम कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा करते. त्यानुषंगाने ज्या कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा केलेला आहे, त्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून नियमित वसूली करण्यात येते. त्यामुळे बँकेतील कर्मचाऱ्यांच्या नावावर भरमसाठ कर्जाची उचल केल्याचे दिसून येत नाही.

म्हाडा व शक्ती दूध प्रकरणांत सर्वसामान्य अर्जदारांच्या नावे परस्पर कर्ज उचल करण्यात आल्याचा मुद्दा तक्रारीत नमुद करण्यात आला होता. तथापि बँकेने दि. ३०.०९.२०२२ रोजी चौकशी अधिकाऱ्यास सादर केलेल्या ताळेबंद अहवालानुसार बँकेने अशा प्रकारचा कर्ज पुरवठा केल्याचे दिसून येत नाही.

***********

लक्षवेधी सूचना क्र.१४७१

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.विनोद अग्रवाल विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४७१ पुढीलप्रमाणे आहे :-

" पूर्व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली, भंडारा तथा चंद्रपूर जिल्हयामध्ये धान पिकाचे मोठयाप्रमाणात उत्पादन घेण्यात येत असणे, यापैकी एकटया गांदिया जिल्हयामध्ये ८५ टक्के धान उत्पादन होत असणे जिल्हयामध्ये धान गोदामांची फार बिकट समस्या असल्याने दरवर्षी शेतकरी बांधवांचा बहुतांश धान पावसाचे पाण्याने भिजत असल्याने नुकसान होत असणे, तसेच आदिवासी विकास महामंडळ तथा मार्केटिंग फेडरेशन अंतर्गत धान खरेदीचे प्रक्रीयेत विविध अडचणी असल्याने अनेक शेतकरी धान विक्रीपासून वंचित असल्याचे निदर्शनास येत असणे, इंधनाचे वाढलेले दर, बारदाना उपलब्धतेची नित्य असलेली समस्या, गोदांमाची असलेली कमतरता, धान भरडाईमध्ये नित्य निर्माण होत असलेल्या समस्यांचा विपरित परिणाम धान उत्पादन शेतकरी बांधवांवर होत असणे, याकरिता माहे फेब्रवारी २०१८ मध्ये तात्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी गोंदिया जिल्हयामध्ये राईस पार्क उभारण्याची घोषणा करण्यात येणे, या राईस पार्कचे माध्यमातून धान उत्पादनापासून तर विक्रीपर्यंतच्या निर्माण होत असलेल्या विविध समस्या निकाली काढण्याची घोषणा करण्यात आलेली असणे, परंतु अद्यापही राईस पार्क निर्मीतीबाबत कुठलीही कार्यवाही झालेली नसल्याने शेतकरी बांधवांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा शासनाची प्रतिक्रिया"

---

### मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

पूर्व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली, भंडारा व चंद्रपूर जिल्हयात धान हे मुख्य पिक असून मोठया प्रमाणात त्यांचे उत्पादन शेतक-यांकडून घेण्यात येते. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत ऑनलाईन नोंदणी करण्यात आलेल्या शेतक-यांकडून धान खरेदी करण्यात येते. पणन हंगाम २०२१-२२ मध्ये पूर्व विदर्भातील धान खरेदीचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | नोंदणी केलेले शेतकरी | धान खरेदी शेतकरी संख्या | धान खरेदी वजन क्वि. | शेतक-यांना अदा करण्यात आलेले चुकारे (रु.कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | भंडारा | २१०२३४ | १६८५३९ | ५६५०३३५ | १०९६.१३ |
| २. | चंद्रपूर | ५०३८२ | ३१५९३ | ९६०३१७ | १८६.०३ |
| ३. | गडचिरोली | ९७९६७ | ७६४५५ | २८०५६८८ | ५०५.२७ |
| ४. | गोंदिया | २५९३८२ | २१४०१२ | ६८०९८४६ | १३२०.१३ |
| ५. | नागपूर | २२५८३ | १०१४६ | ४२७८९२ | ८३.०१ |
|  | एकूण | ६४०५४८ | ५००७४५ | १६६५४०७८ | ३१९०.७५ |

NeML पोर्टलवर शैतक-यांची नोंदणी करण्यात येते. तसेच शेडयुलींग करुन शेतक-यांला त्याचे भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश (SMS) पाठवून धान विक्रीकरीता वेळ निश्चित करुन देण्यात येते. पावसाचे वातावरण असल्यास तात्पुरत्या वेळेकरीता खरेदी केंद्र बंद करण्यात येऊन याबाबत शेतक-यांना संस्थामार्फत पूर्वकल्पना देखिल देण्यात येते. खरेदी केंद्रावर शेतक-यांने आणलेला धान पावसाचे पाण्याने भिजला असल्याबाबत तक्रार प्राप्त नाही.

धान उत्पादक शेतकरी हमी दरापासून वंचीत राहू नये याकरीता खरेदी हंगाम सुरु होण्याआधी पुर्वतयारी करण्यात येते. यामध्ये NeML पोर्टलवर शेतक-यांची नोंदणी करण्यात येते. परंतु दुर्गम भागात नेटवर्कची समस्या येत असल्याने शेतक-यांची नोंदी ऑनलाईन करण्यास अडचणी येतात. तरी नोंदणीची कार्यवाही पुर्ण् केली जाते. ज्या शेतक-यांच्या नोंदी झालेली आहे, अशा शेतक-यांना धान विक्रीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश (SMS) पाठवून बोलविण्यात येते. त्यामुळे शेतकरी धान विक्रीपासून वंचीत राहील्याची बाब निदर्शनास आलेली नाही. ज्या शेतक-यांचा धान विक्री करणे बाकी होता, अशा शेतक-यांचा धान विक्री करीता राज्य शासनाने रब्बी हंगाम २०२१-२२ मध्ये माहे जुलै, २०२२ पर्यंत मुदतवाढ देखील दिलेली आहे.

धान खरेदीकरीता ५०% नवा व ५०% जुना बारदाना वापराबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. तसेच सदरचा बारदाना राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जातो.

आदिवासी विकास महामंडळ व पणन महामंडळ स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या गोदामांमध्ये खरेदी केलेले धानाची साठवणूक करण्यात येते. ज्याठिकाणी गोदामे उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी पक्के ओटे व शेड बांधण्यात येऊन ताडपत्रीद्वारे सुरक्षितरित्या खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यात येते. तसेच आदिवासी विकास महामंडळामार्फत आवश्यकतेनुसार खुल्या ओटयावर शेड बांधण्याच्या दृष्टीने तसेच नविन गोदामे बांधणेकरीता प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये धान खरेदीमध्ये करण्यात येत असून पूर्व विदर्भातील धान उत्पादक जिल्हयांचा त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | नोंदणी केलेले शेतकरी | धान खरेदी शेतकरी संख्या | धान खरेदी वजन क्वि. | शेतक-यांना अदा करण्यात आलेले चुकारे (रु.कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | भंडारा | १२४०१८ | ७६३८४ | २७६३६११.५३ | २५८.०१ |
| २. | चंद्रपूर | ३२५४७ | ९५५१ | ३१३६३५.०० | ३५.०८ |
| ३. | गडचिरोली | ७४२२९ | २४८८४ | ९७८३१८.०० | ११५.८५ |
| ४. | गोंदिया | १५००३० | ६७३७२ | २५२४७६३.७८ | २३३.४७ |
| ५. | नागपूर | १०४५६ | १८४४ | ८४४२५.५४ | ८.३४ |
| | एकूण | ३९१२८० | १८००३५ | ६६६४७५३.८५ | ६५०.७५ |

पणन हंगाम २०२२-२३ खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या भरडाईबाबत शासन निर्णय दि.२१.११.२०२२ निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर धानाची भरडाई ही स्थानिक मिलर्स सोबत करारनामा करुन करण्यात येते. भरडाई अंती प्राप्त झालेला तांदळाचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वितरण करण्यात येते.

गोंदिया जिल्ह्यात राईस पार्क उभारणीबाबत जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्यामध्ये राईस पार्क निर्मीतीबाबत राईस मिल असोसिएशनकडून कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. अथवा मागणी करण्यात आलेली नाही. परंतू, गोंदिया जिल्ह्यात देवरी MIDC येथे सडक अर्जुनी येथे राईस प्रोसेसिंग क्लस्टर स्थापन करण्याकरीता रु.७२४.९१ लक्ष किंमतीचा सामुहिक सुविधा केंद्र स्थापन करण्याचा विस्तृत प्रकल्प अहवाल राज्य शासनाने मंजूर केलेला आहे. त्या विषयी जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया मार्फत कार्यवाही सुरु आहे."

---

## लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना

**मा.श्री.प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७८० पुढीलप्रमाणे आहे:-**

" केंद्र व राज्य शासनाने कांदळवनाबाबत आपली भुमिका स्पष्ट केलेली असून पर्यावरणाची हानी होऊ नये याकरिता ज्या ठिकाणी कांदळवने असतील त्या ठिकाणी त्यांचे रक्षण करणे व जतन करणे याची जबाबदारी वन खाते व पर्यावरण खात्यामार्फत केंद्र व राज्य शासन करीत असणे, परंतू, काही ठिकाणी कांदळवनाचे संरक्षण होत असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात विकास कामे करीत असताना फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, कारण त्यातील काही कांदळवनांची सिमा निश्चित केल्यानंतर पावसाळ्यामध्ये, अवकाळी पावसामुळे अथवा सुसाट्याच्या वाऱ्यामुळे कांदळवनाच्या बिया शेतकरी शेती करीत असलेल्या शेताच्या काही भागामध्ये पसरल्यामुळे त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठ्या प्रमाणात वाढ असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असणे, त्याचबरोबर काही कच्च्या रस्त्यावर व अविकसित भुखंडावर या बिया गेल्यामुळे शासनाच्या कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे सदरचा भुखंड विकसित होऊ शकत नसणे, अथवा रस्त्यांचे रूंदीकरणही होऊ शकत नसणे, तसेच ज्या भुखंडावर ही कांदळवने पसरली जातात त्या भुखंडधारकांना भुखंडाचा मोबदला हा टी. डी. आर. च्या स्वरूपात अथवा आर्थिक स्वरूपात मिळण्यासाठी देखील अडचणी निर्माण होत असणे, माझ्या ओवळा- माजिवडा विधानसभा मतदारसंघातील कांदळवनाच्या बाबतीत विचार केला तर मेट्रो-४ व मेट्रो - ९ चे काम असो अथवा घोडबंदर किल्याशेजारी शिवसृष्टी उभारणीचे काम असो, त्याचबरोबर दहिसर - भाईंदर कोस्टल रोडचे काम असो अथवा गायमुख - कोलशेत कोस्टल रोडचे काम, एम.एम.आर.डी.ए. करीत असलेल्या घोडबंदर जेसलपार्क चौपाटी या ६० मिटर रस्त्याचे काम असो अथवा नागला बंदर व घोडबंदर खाडी किनारा विकसित करण्याचे काम, सुभाषचंद्र बोस मैदान विकसित करण्याचे काम असो अथवा घोडबंदर परिसरातील जेट्टीचे काम या सर्व विकास कामांना कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होणे, यावर उपाययोजना म्हणून शहरी भागातील या कांदळवनाची पुर्वीची सिमा रेषा निश्चित करून या कांदळवनांची वाढ भविष्यामध्ये विकास कामांवर परिणाम होऊ देऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये किंवा भुखंड मालकांच्या खासगी भुखंडावर ही कांदळवने निर्माण झालेली आहेत त्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे व इतर

खाजगी भुखंड मालकांप्रमाणे आर्थिक व टी.डी.आर. स्वरूपातील मोबदला देण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया,"

---

**मा.श्री.सुधीर मुनगंटीवार** **निवेदन** **मा.मंत्री (वने)**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ६.१०.२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या हेतूने दिनांक २३.२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन विभागाअंतर्गत कांदळवन कक्ष स्थापित करण्यात आला आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ८७/२००६ दिनांक १७.०९.२०१८ मध्ये दिलेल्या आदेशान्वये कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याचे निर्देश आहेत. त्यानुषंगाने सद्य:स्थितीत मुंबई, नवी मुंबई, ठाणे व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अधिकार क्षेत्रातील अधिसूचित कांदळवन क्षेत्राचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी अधिसूचित कांदळवन क्षेत्र कांदळवन कक्षाच्या अखत्यारीतील मुंबई कांदळवन संधारण घटकाकडे (Mumbai Mangrove Conservation Unit) हस्तांतरीत करण्यात आले आहे.

कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन होत असल्यामुळे आजुबाजूच्या परिसरात अवकाळी पावसामुळे अथवा सुसाटयाच्या वा-यामुळे शेताच्या काही भागामध्ये कांदळवनाच्या बिया पसरुन त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठया प्रमाणात वाढ झाल्याने शेतक-यांना शेती करताना मोठया प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. खारफुटी प्रजातीच्या बिया ह्या भरतीच्या पाण्यासोबत वाहून जातात व जिथे अनुकूल वातावरण म्हणजे दलदलयुक्त क्षेत्र, मातीचा सामू (pH) हा ६.७ ते ७.३ या प्रमाणात व मातीचा गुणधर्म खारट, आम्लीय असेल अशा ठिकाणी रुजतात. अवकाळी पावसामुळे जर पुर स्थिती निर्माण झाली तर कांदळवनाच्या बिया/शेंगा लगतच्या शेती भागामध्ये पसरू शकतात. परंतू, पिकयुक्त जमिनीमध्ये या बियांना/शेंगाना वाढण्यासाठी नियमित खाडीचे पाणी मिळू न शकल्याने अशा ठिकाणी कांदळवनाच्या बियांची/शेगांची वाढ सीमित असते. त्याचबरोबर काही कच्च्या रस्त्यांवर व अविकसित भूखंडावर कांदळवनाच्या बिया गेल्यामुळे शासनाच्या कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे भूखंड विकसित होत नसल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ८७/२००६ दिनांक १७.०९.२०१८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कांदळवनापासून ५० मी. बफर झोन क्षेत्रात मा. उच्च

न्यायालयाच्या परवानगी शिवाय बांधकाम करता येत नाही. जनहिताचे नवीन प्रकल्प/ विकास कामे वन जमिनीवर करण्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाची परवानगी प्राप्त करुन तसेच मा. उच्च न्यायालयाची कांदळवन वृक्ष तोडीबाबत परवानगी घेऊन कामे करता येतात. संबंधित प्रकल्प यंत्रणेने त्या त्या कामांच्या अनुषंगाने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० नुसार प्रस्ताव सादर केले तर ते प्रस्ताव कांदळवन संधारण घटक कक्षाकडून यथोचित मार्गाने शासनास सादर करण्याची कार्यवाही करण्यात येते.

ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातील मेट्रो-४ चा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई कार्यालयाकडून वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. गायमुख - कोलशेत बाळकुम कोस्टल रोडचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही मुंबई कांदळवन संधारण घटक कार्यालयाकडून सुरु आहे. घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याच्या कामाचे प्रकरण मुंबई कांदळवन संधारण घटक हया कार्यालयास प्राप्त झाला असून स्थळपहाणी करण्याकरिता संबंधित विभागाकडून क्षेत्रीय स्तरावर पाठविण्यात आला आहे. तसेच ज्या शेतक-यांच्या शेतामध्ये किंवा भूखंड मालकांच्या खाजगी भूखंडावर कांदळवने निर्माण झाली आहेत, त्यांना इतर शेतक-यांप्रमाणे व इतर खाजगी भूखंड मालकांप्रमाणे आर्थिक व टी.डी. आर. स्वरुपातील मोबदला देण्याची प्रकरणे कांदळवन कक्षास प्राप्त झालेली नाहीत.

***************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. अस्लम शेख, श्री. अमिन पटेल, श्री. झीशान सिध्दिकी, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"के.ई.एम रुग्णालय, परळ, मुंबई येथे असून रुग्णालयाच्या छताचा वसतीगृहाच्या छताचा भाग दिनांक 3 नोव्हेंबर,2022 रोजी कोसळला असणे, त्यात एक महिला गंभीर जखमी झाली असणे, वस्तीगृहातील मुला-मुलींमध्ये गंभीर वातावरण निर्माण झाले असणे, कर्मचारी डॉक्टर, परिचारीका ही भयभित झाल्या असणे, आवारातील 90 वर्ष जुन्या इमारतीचा दुरुस्तीचा प्रश्न निर्माण झाली असणे, इमारतीचे अभियंत्यानी संरचनात्मक तपासणी केली असणे व आपला अहवाल संबंधित प्रशासनास सादर केला असणे, त्यात मोठया दुरुस्ती सुचविल्या असणे, वसतीगृहाची मोठयाप्रमाणात दुरावस्था झाली असल्याने याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असणे व दुरुस्तीची मागणी स्थानिक रहिवाशांनी लोकप्रतिनिधींनी व नगरसेवकांनी केली असणे, याकडे शासनाने व प्रशासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात डॉक्टर, कर्मचारी व नर्सेसमध्ये असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया."

## -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

परळ मुंबई येथील के.ई.एम. रुग्णालय परिसरातील २६ इमारतींच्या सन २०१८ मध्ये करण्यात आलेल्या संरचनात्मक परीक्षणाच्या प्राप्त अहवालानुसार के.ई.एम. रुग्णालयाच्या आवारातील वैद्यकीय उपचार सुविधांना बाधा न आणता काही इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित काही इमारतींच्या दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर दुरुस्तीच्या कामांमध्ये परिचारीका वसतीगृहाच्या इमारतीचे काम अंतर्भूत नाही.

के.ई.एम. रुग्णालयाच्या परिचारीका वसतीगृहाच्या इमारतीच्या छताचा प्लास्टरचा काही भाग दिनांक ०३.११.२०२२ रोजी पडला होता. तद्नंतर सदर ठिकाणी तातडीने योग्य ती उपाययोजना करण्यात आली व सदर इमारतीमधील परिचारीका व कर्मचाऱ्यांना इतर ठिकाणी स्थलांतरीत करण्याची कार्यवाही के.ई.एम. रुग्णालय प्रशासनामार्फत सुरु आहे.

सदर परिचारीका वसतीगृह इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत सुरु असून, त्याबाबतचा अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर इमारतीमध्ये सुरक्षात्मक सावधगिरीच्या उपाययोजना के.ई.एम. रुग्णालयामार्फत करण्यात येत आहेत.

*******

रोटा/एच-०१८[ ७५०-४-२३].

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई बोरिवली (प) येथील गणपत पाटील नगर लिंक रोड येथे सुमारे १५ ते २० हजार झोपडया असून तेथील राहणा-या नागरिकांसाठी प्रत्येकाला वीज, पाणी या योजने अंतर्गत सर्वांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येणे, त्यासुविधा मिळणेकरीता MCZMA ची परवानगी घेण्यात आलेली असणे, परंतु अद्याप गटारे, पायवाटा, पथदिवे, शौचालय या सारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, सदर ठिकाणी wet land ची हद्द निश्चित करण्यात येणे, सदर ठिकाणी राहणाऱ्या झोपडीधारकांना त्याच ठिकाणी घर देण्याची मागणी करण्यात येणे, याबाबत उक्त विषयबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री महोदयांना निवेदन देऊनही अदयापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, गणपत पाटील नगर येथील नागरिकांना मुलभूत सेवा सुविंधापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे झोपडीधारक यांच्यामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, उक्त ठिकाणी शासनाने तात्काळ मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज, सदर झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

गणपत पाटील नगर ही दहिसर (प.) येथील १२० फुट रुंद लिंकरोड लगत अंदाजे २५ ते ३० एकर खाजगी जमिनीवर मोठी झोपडपट्टी सदृश वसाहत आहे. सदर झोपडपट्टी महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ नुसार गलिच्छ वस्ती झोपडपट्टी म्हणून घोषित करण्यात आलेली नाही. सदर झोपडपट्टी गलिच्छ वस्ती घोषित नसल्यामुळे सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पायवाटा, गटारे, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात येत नाहीत. तथापि मानवतेच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत साफसफाई, धुम्रफवारणी, किटकनाशक फवारणी इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. तसेच सदर परिसरात रोगराई पसरु नये म्हणून नागरिकांचे लसीकरण शिबिरे आयोजित केली जातात. लहान मुलांना जंताचे व विर्टॅमिन "ए" ची औषधे देण्यात येतात.

गणपत पाटील नगर परिसरातील घरोघरी जाऊन आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम राबविले जातात. गणपत पाटील नगर गल्ली नंबर १४ च्या बाहेर लिंकरोड लगत "स्वच्छ भारत मिशन" अंतर्गत ६० आसनी शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच "सर्वांसाठी पाणी" या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार गणपत पाटील नगर येथे दिनांक २७.१२.२०२२ पर्यंत एकूण ७९६ जलजोडण्या दिल्या आहेत.

*******

रोहट/एच-००१[ ७५०-४-२३]•

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई, करी रोड येथील अविघ्न पार्क टॉवर या ६० मजल्याच्या इमारतीमधील २२ व्या मजल्यावर भीषण आग लागल्याचे माहे डिसेंबर २०२२ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये आगीच्या ज्वाळा तीव्र असल्याने अग्निशमन दलाचे दोन जवान जखमी झाले असणे, तसेच आग लागण्याचे नेमके कारण अस्पष्ट असणे, तसेच मागील वर्षी ही माहे ऑक्टोबर मध्ये याच इमारतीतील १९ व्या मजल्यावर आग लागल्याची घटना घडली असणे, त्यामुळे वारंवार आग लागण्याच्या घटना घडत असल्यामुळे इमारतींमध्ये आग प्रतिरोधक नियमांचे पालन करण्यात येते वा नाही हे तपासण्याची गरज असणे, तसेच भविष्यात इमारतींमधील आगीच्या घटना रोखण्यासाठी व याबाबत अधिकची काळजी घेण्यासाठी व नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी नियमांची कडक अंमलबजावणी करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

मुंबईतील करी रोड येथील वन अविघ्न पार्क को.ऑप.हौ. सोसायटी ही इमारत "ए" व "बी" विंग अशी असून, सदर इमारतीची रचना ही दोन लेव्हल बेसमेंट + तळमजला + १ ते ८ पोडीअम मजले (कार पार्किंग) + ९ वा मजला अंशत: कार पार्किंग व ॲमिनिटी + १० वा सर्विस मजला + ११ ते ३५ रहिवाशी मजले + ३६ वा सर्विस मजला + ३७ ते ६० रहिवाशी मजजे + ६१ ते ६३ पेंटा हाऊस अशी आहे. सदर इमारतीतील "बी" विंग मधील २२ वा मजला, सदनिका क्रमांक २२०२ येथे आग लागल्याच्या दुर्घटनेची सूचना मुंबई अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षास दिनांक १५.१२.२०२२ रोजी सकाळी १०.४४ वाजता प्राप्त झाली.

आगीची सूचना प्राप्त होताच दुर्घटनास्थळी तात्काळ एकूण सहा फायर इंजिन, पाच जम्बो वॉटर टँकर, एक श्वसन उपकरण वाहन, एक हाय राईज फायर फाईटींग वेहिकल, एक विमोचन वाहन, एक ऑर्टीक्युलेटेड वॉटर टॉवर वेहिकल व ९० मी. उंचीची हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म इ. गाड्या रवाना करण्यात आल्या. आग लागलेल्या सदनिका क्रमांक २२०२ मध्ये संपूर्ण विद्युत तारा, विद्युत जोडण्या व उपकरणे, लाकडी फर्निचर, वॉल पॅनलिंग व वॉल क्लॅडिंग, विविध घरगुती विद्युत उपकरणे, कपडे, कागदपत्रे, गाद्या, गालिचे इत्यादी अंदाजे १८५० ते २००० चौ. फुटच्या संपूर्ण भागात आग होती. एकूण पाच फायर इंजिनच्या होज लाईन, इमारतीमधील स्थायी अग्निशमन यंत्रणेच्या होज लाईन व श्वसन उपकरणांचा वापर करुन तसेच इमारतीचा विद्युत प्रवाह खंडीत करुन सदर आग विझविण्यात आली. सदर आग विझवतांना मुंबई अग्निशमन दलाच्या दोन अग्निशामकांना किरकोळ स्वरुपाची दुखापत झाली होती. त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन त्याच वेळी घरी पाठविण्यात आले.

सदर आगीच्या दुर्घटनेची तपासणी करुन तपासाअंती आगीचे कारण "सदोष विद्युत प्रणाली" असे नोंदविण्यात आले आहे. सदर इमारतीस वारंवार लागलेल्या आगीचे कारण मुख्यत्वे "सदोष विद्युत प्रणाली" असल्यामुळे मुख्य विद्युत निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दुर्घटनेची तपासणी करण्यास सांगितले आहे.

सदर इमारतीमधील आग विझवतांना इमारतीमधील स्थायी अग्निशमन यंत्रणेचा परिणामकारक वापर करुन आगीवर लगेचच नियंत्रण मिळविण्यात आले. सदर इमारतीमधील हायड्रण्ट पंप, स्प्रीन्क्लर पंप, वेट राईझर व स्प्रीन्क्लर राईझर पूर्णत: कार्यान्वित असल्याचे आढळून आले. याकरिता इमारतीचे मालक/भोगवटादार यांनी सदर यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबतचा सहामाही देखभालीचा फॉर्म बी संचालक, अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासनाच्या यादीतील परवानाधारक प्रमाणित प्राधिकरणाकडून/संस्थेकडून माहे जुलै, २०२२ मध्ये मुंबई अग्निशमन दलास सादर केला होता. तथापि सदर इमारतीची ऑटोमेटिक फायर डिटेक्शन सिस्टीम व पब्लिक अॅड्रेस सिस्टीम या दोन्ही यंत्रणा तपासणी दरम्यान बंद असल्याचे आढळून आले. तसेच सदर दोन्ही यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबतचा सहामाही देखभालीचा फॉर्म बी संचालक, अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासनाच्या यादीतील परवानाधारक प्रमाणित प्राधिकरणाकडून/संस्थेकडून माहे जुलै, २०२२ मध्ये मुंबई अग्निशमन दलास सादर करण्यात आला नव्हता. सदर त्रुटींची गंभीर बाब लक्षात घेऊन मुंबई अग्निशमन दलाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये तात्काळ "वन अविघ्न पार्क" सोसायटीच्या अध्यक्ष व सचिव यांना १५ दिवस मुदतीची नोटीस बजावली असून, सदर फायर अॅक्ट नोटीसमध्ये नमूद केलेल्या त्रुटींबाबतची पूर्तता विहित मुदतीत तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार गगनचुंबी व टोलेजंग इमारतींमध्ये अंतर्गत अग्निप्रतिबंधक व अग्निसुरक्षा उपकरणे पूर्णत: कार्यान्वित ठेवणे आणि इमारतीतील अग्निसुरक्षा उपाययोजनांचे योग्य परिरक्षण करुन सुस्थितीत ठेवणे ही सर्वस्वी मालक/भोगवटादार यांची जबाबदारी आहे. इमारतीमध्ये आढळलेल्या त्रुटींबाबत मुंबई अग्निशमन दलाकडून नोटीस बजावण्यात आल्यानंतर मालक/भोगवटादार यांचेकडून अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटींची विहित मुदतीत पूर्तता केल्याचे प्रमाणपत्र (फॉर्म-बी) सादर न केल्यास त्या इमारतीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

*******

एच-००६-१अ.
CR 67_2023_BMC_C_01

लक्षवेधी सूचना क्र. १४६४

सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. इंद्रनिल नाईक , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-

"पुसद विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात किडणीच्या आजारांचे असंख्य रुग्ण ग्रामीण भागात आढळून येत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, या रुग्णांना शासकीय रुग्णालयातून औषधोपचार मिळत नसल्यामुळे त्यांना खाजगी रुग्णालयात जावे लागणे, परंतु खाजगी रुग्णालयाचा मासिक खर्च ८ ते १० हजार रुपये येत असल्यामुळे हा खर्च गरीब रुग्ण सहन करू शकत नसणे, काही सामाजिक संस्थांनी अनेक वाडी तांड्याला भेटी देऊन डाटा जमा केला असणे, त्यात पुसद तालुक्यात १० ते १२ गावात १७० रुग्ण या रोगाचे आढळून आले असून त्यात ४१ रुग्ण मृत्यू झाल्याचे आढळून येणे, संबंधित लोकप्रतिनिधींनी मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचकडे आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांची बैठक बोलावली असता, या रोगाकरिता शासन औषधाचा पुरवठा करीत नसल्याचे सांगण्यात येणे, एवढ्या भयानक रोगाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने गरीब जनता मृत्युमुखी पडत असून यवतमाळ जिल्ह्यातील रुग्णांना शासकीय रुग्णालयातून औषधीचा पुरवठा करण्याबाबत, किडणीग्रस्त रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालयातून आवश्यक औषधे मोफत देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना .

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

यवतमाळ जिल्हयामध्ये १ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत १ स्त्री रुग्णालय, ४ उपजिल्हा रुग्णालये, १३ ग्रामीण रुग्णालये, ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४४६ उपकेंद्रे यांचेमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

यवतमाळ जिल्हयातील किडनी रुग्ण संदर्भात दि.२५.११.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ तसेच मा. श्री. इंद्रनील नाईक, आमदार पुसद मतदारसंघ यांच्या उपस्थितीत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधिकारी (भिषक), किडनी तज्ञ व सामाजिक कार्यकर्ता यांचे समवेत आढावा घेण्यात आला होता. त्यावेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने पुसद तालुक्यात आशा स्वयंसेवक, आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत घरोघरी सर्वेक्षण करुन गावनिहाय किडनी आजाराच्या रुग्णांचे सर्वेक्षण करुन त्यांची रुग्णनिहाय यादी काढून समुदाय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत तपासणी करण्यात आली. तपासणी अंती एकूण पुसद तालुक्यातील किडनी आजाराच्या १५ रुग्णांचा आकडा २२९ एवढा असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच यवतमाळ जिल्हयात एकूण १६ तालुक्यातील एकूण किडनीच्या आजाराच्या रुग्णांची संख्या १४१० आहे.

किडनीच्या आजाराच्या रुग्णांचे उपचार जिल्हास्तरावरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये तज्ञांव्दारे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येतात. तसेच आरोग्य विभागामार्फत वर्षातून दोन वेळा रासायनिक पाणी नमुने तपासणी करण्यात येते. तपासणी अंती अंतिम अहवालात फ्लोराईडचे प्रमाण १.५ P.P.M. पेक्षा जास्त असल्यास पाणी स्त्रोताच्या ठिकाणी ग्रामपंचायतमार्फत फलक लावून पाणी पिण्यास अयोग्य असल्यास, ग्रामस्तरावर पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात येते.

किडनी आजाराच्या रुग्णांसाठी जिल्हयातील आरोग्य संस्थांमध्ये औषधे उपलब्ध आहेत. तसेच काही विशिष्ट परिस्थितीमध्ये स्थानिक स्तरावर उपलब्ध निधीतून आकस्मिक औषधे खरेदी करण्यासाठी अनुमती देण्यात आलेली आहे. किडनी आजाराच्या रुग्णांना देण्यात येणाऱ्या Tab calcium 500 mg, Tab Multivitamin, Antihypertensive Medicine, Antidiabetic medicine, Antacid, Steroids इ. औषधे जिल्हयातील कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहेत. किडनीची कार्यक्षमता अधिक मोठया प्रमाणावर खराब झाल्यास, यवतमाळ जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रुग्णास आवश्यक असलेल्या डायलेसीस उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पीपीपी तत्वावर यवतमाळ जिल्हयात ५ ठिकाणी डायलेसीस सेंटर सुरु करण्याविषयी कार्यवाही सुरु आहे. यामध्ये यवतमाळ जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय, पुसद, उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा, उपजिल्हा रुग्णालय, दारव्हा, उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड तसेच स्त्री रुग्णालय, यवतमाळ या आरोग्य संस्थांचा समावेश असून या ५ ठिकाणी प्रत्येकी ५ डायलेसीस मशीन उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

---------------

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ च्या चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन
### लक्षवेधी सूचना क्रमांक १२१

डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.अजित पवार, श्री.जयंत पाटील, श्री.छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिल पाटील, श्री.यशवंत माने, श्री.शेखर निकम, श्री.दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री.रोहित पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१२१ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्राचे अराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या हरहर महादेव या चित्रपटामध्ये ऐतिहासिक घटनांचा विपर्यास करुन मनमानीपणे दृश्ये दाखविण्यात आलेली असणे, याविरोधात संपूर्ण महाराष्ट्रभर शिवप्रेमी नागरीकांनी तीव्र आंदोलने करुन निषेध नोंदविलेला असणे, महाराजांच्या जीवनचरित्रावर अलिकडील काळात मी शिवाजी राजे भोसले बोलतोय, पावनखिंड, तान्हाजी, फर्जंद यासारख्या चित्रपटांमध्ये ऐतिहासिक संदर्भ डावलून काही प्रसंग बेमालुमपणे चुकीचे दाखविण्यात आलेले असणे, शिवचरित्राच्या विटंबनात्मक प्रदर्शनामुळे महाराष्ट्राबरोबरच देशविदेशातील शिवप्रेमींमध्ये संतापाची भावना असणे, पुढील काळातही ऐतिहासिक प्रसंगावर अनेक चित्रपट प्रदर्शित होणार असणे, त्यामुळे या चित्रपटांच्या माध्यमातुन युवापिढीसमोर चुकीचा इतिहास सादर केला जात असून त्यावर प्रतिबंध घालण्याची गरज निर्माण झालेली असणे, छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच, विरमाता जिजाबाई भोसले, छत्रपती संभाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राणी लक्ष्मीबाई, बाजीराव पेशवे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांसारख्या अनेक महापुरुषांच्या जिवनावर आधारित चित्रपट बनवितांना केवळ मनोरंजनासाठी चुकीचे प्रसंग प्रसारित करुन काल्पनिक इतिहास युवा पिढीसमोर ठेवला जात असल्याने, यावर पायबंद घालण्यासाठी पुरातत्व विभागाच्या धर्तीवर राज्य शासनाने एक इतिहास तज्ञांची समिती स्थापन करावी व या समितीच्या मान्यतेनंतरच ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शित करावेत, जेणेकरुन महापुरुषांची विटंबना होऊ नयेत, युवा पिढीसमोर योग्य इतिहास येईल, यासंदर्भात शासनाने योग्य ती पावले उचलावीत यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी दिनांक ७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे वांरवार मागणी केलेली असतांनाही कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्याबरोबरच देश-विदेशातील शिवप्रेमी नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे निवेदन

केंद्र शासनाने चित्रपटांना सार्वजनिक प्रदर्शनासाठी मंजुरी देण्यासाठी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाची स्थापना केली आहे. सदर मंडळाकडून सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२ आणि सिनेमॅटोग्राफ नियम, १९८३ अंतर्गत कार्यवाही करण्यात येते. या विभागाच्या अखत्यारितील रंगभूमी

(कृ.मा.प.)

# सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१८७१

श्री.अबू आजमी, श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७१ पुढील प्रमाणे आहे.

---

"नागपूर स्थित गंगा केअर खासगी रुग्णालय येथे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे अरुण थूल यांचा मृत्यू झाल्याची बाब २८ ऑक्टोबर २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी सितावडी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असता पोलीस प्रशासनातील तपास अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल सबनीस व नागपूर महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी, नागपुर वैद्यकीय महाविद्यालय येथील तपास समिती यांनी कोणतीही कारवाई ण करणे, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांच्यामार्फत फिर्यादीला मत मांडण्याकरिता योग्य वेळ न देता आरोपी असलेल्यांना पुरावे देऊन मदत करणे, अद्यापपर्यंत जे. जे. रुग्णालयाकडून कोणतीही कारवाई न करता सदर प्रकरण प्रलंबित ठेवणे, सदर विषयी तक्रारदाराने वारंवार सर्व स्तरावर न्याय मागून हि कोणतीही कारवाई न होणे, फिर्यादीचे खोटे हस्ताक्षर करून दिशाभूल करणे, सीसीटीव्ही फुटेजमध्ये काटछाट करणे. सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

अरुण लक्ष्मणराव थुल यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे त्यांना औषधोपचाराकरिता गंगा केअर हॉस्पिटल लि. ३, फार्म लॅन्ड पंचशिल चौक, वर्धा रोड, नागपूर येथे दिनांक १७.१०.२०२० रोजी भरती करण्यात आले होते. उपचारा दरम्यान अरुण थुल यांचा दिनांक २८/१०/२०२० रोजी मृत्यू झाला. यासंदर्भात पो.स्टे.सिताबर्डी, नागपूर शहर येथे आकस्मात मृत्यु क्र. ५८/२०२० सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे दि. २९.१०.२०२० रोजी तक्रार दाखल झालेली आहे. तसेच फिर्यादीचे खोटे हस्ताक्षर करून दिशाभूल करणे, सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये काटछाट करणे याबाबत पोलीस ठाणे सिताबर्डी, नागपूर शहर येथे क्र. २५३/२२ कलम ४६४, ४६५, ४७१, ३४ भा.दं.वि प्रमाणे दि. २१.०६.२०२२ रोजी रुग्णालयाच्या डॉक्टरांविरुध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी अरुण थुल यांचे निधन हे गंगा केअर रुग्णालय येथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचा आरोप तक्रारदारांने केलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने तज्ञ वैद्यकीय अधिका-यांच्या समितीमार्फत तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांना कळविले होते. त्याअनुषंगाने वैद्यकीय अधिक्षक यांनी ०५ सदस्यीय समिती गठीत केली होती. या प्रकरणाची सखोल चौकशी करून समितीने त्यांचा अहवाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. सिताबर्डी, नागपूर शहर यांना सादर केला. समितीने खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत.

The committee is of the opinion that the treatment administered to the Patient was in accordance to Current Standard Prevailing Medical Protocol and there seems to be No Negligence in the Management of this Patient.

तक्रारदार यांनी चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावर आक्षेप घेऊन प्रकरणाची फेरचौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांना विनंती केली. विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दिनांक २८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अरुण धुल यांचे प्रकरण संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविले होते. संचालनालयाने दि. २०.०८.२०२१ च्या पत्रानुसार सदरचे प्रकरण वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास अभिप्रायाकरिता सादर केले असता विभागाने दि. ०१.१०.२०२१ च्या पत्रानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील तज्ञ डॉक्टरांची समिती गठीत करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते.

वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखालील प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालात मृत अरुण थुल यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर व रुग्णाचा मुलगा यांच्यासोबत चर्चा केली असता रुग्णाच्या लघवीतून रक्तस्राव येत असल्याचे दिसून येत होते. मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे सद्यस्थितीत युरोसर्जन उपलब्ध नसल्याने सदरचे प्रकरण सर जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे हस्तांतरीत करण्यात यावे, असे समिती सदस्यांनी मत नोंदविले होते.

त्यामुळे संचालनालयाच्या दिनांक २७.०१.२०२२ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता, सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई यांना संबंधित विषयातील तज्ञ (युरोसर्जन) यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. अधिष्ठाता यांनी युरोसर्जन यांचे अभिप्राय घेऊन अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडे दि. २४.०२.२०२३ रोजी पाठविण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांनी दिनांक २७.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे चौकशी अहवाल सादर केला आहे.

**Final opinion of Committee:**

There was no negligence during treatment. The patient was having multiple co-morbidities, however urethral injury could have been avoided but medical literature also does not support it as an etiology leading to death. A proper documentation along with communication with the attendants/relatives regarding the treatment could have been done.

सबब, चौकशी समितीने सादर केलेला अहवाल पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र.२ नागपूर शहर यांना दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला असून पोलीस प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

*************

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा

## सन चे २०२२हिवाळी अधिवेशन

श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत हुक्का पार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे. या हुक्का पार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते. त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात असणे.पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्कापार्लर चालू असणे. पोलिसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाते. मात्र, त्यानंतर ही हुक्का पार्लर पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी छुप्या तर कुठे उघड पद्धतीने ही हुक्का पार्लर सुरू आहेत. त्यामुळे अशा हुक्का पार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे.तरुणाईमध्ये हुक्क्यांची मोठी क्रेझ आहे. पुणे शहरातही हुक्का पार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असते. तरुणांकडून तंबाखूच्या सेवनासाठी हुक्क्याचा आधार घेतला जातो. त्यात वेगवेगळ्या फ्लेवर उपलब्ध करून देण्यात येतात. पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर आली असणे. त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिला जातो. दुर्दैवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पोलिसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात असणे यावर शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."..

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सुधारणा करुन सदर अधिनियमात हुक्का पार्लरचा समावेश केला आहे. सदर (सुधारित) अधिनियम, २०१८ दिनांक ०४.१०.२०१८ पासून अस्तित्वात आला असून राज्यामध्ये हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली आहे. पोलिसांमार्फत हुक्का पार्लर चालविण्यासाठीचा परवाना देण्यात येत नाही.

हॉटेल्स, पब किंवा धाबे या ठिकाणी अनधिकृतपणे ग्राहक तंबाखूजन्य पदार्थ वा हुक्काजन्य पदार्थांचे सेवन करताना आढळल्यास सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ चे कलम ४, २१ सह भा. दं. वि. कलम १८८, २६९, ३४, सह साथीचे रोग अधिनियम, १८९७ चे कलम ३, सह राष्ट्रीय आपत्ती अधिनियम, २००५ चे कलम ५१ ब, सह महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना २०२० चे कलम ११ प्रमाणे कारवाई करण्यात येते. राज्यात काही भागांमध्ये सर्रास अंमली पदार्थ / तंबाखुजन्य पदार्थ / हुक्का पार्लरचा धंदा वा सेवन करीत असल्याचे आढळल्यास किंवा तसे धंदा चालत असल्यास संबंधित ठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्या भागामध्ये त्या पोलिस स्टेशनच्या अंतर्गत जर अशा पध्दतीने गैर व अवैध व्यवसाय चालत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलिस घटक प्रमुखांना दिनांक १८.०३.२०२१ व दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

सुधारित अधिनियम, २०१८ मधील कलम ४ क नुसार "कोणतीही व्यक्ती स्वत:हून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, खाद्यगृहाच्या जागेसह कोणत्याही जागी हुक्का बार सुरु करणार नाही किंवा चालवणार नाही" तसेच, २१-क नुसार कलम ४ क च्या तरतूदीचे उल्लंघन करणाऱ्यास एक ते तीन वर्षे पर्यंत कारावासाची आणि रुपये पन्नास हजार ते एक लाख रुपयांपर्यंत एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेची तसेच, कलम २७-क नुसार कलम ४-क खालील अपराध दखलपात्र असतील, अश्या प्रावधानांची तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ व सुधारणा अधिनियम, २०१८ मधील तरतूदीनुसार पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत सन २०२२ मध्ये अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

**पुणे शहर आयुक्तालय**

| दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|
| ३७ | ११४ | रू. १६,३८,६१०/- |
| चतुश्रृंगी पोलिस ठाणे-१, हडपसर पोलिस ठाणे-१, बिबवेवाडी पोलिस ठाणे- १, विमानतळ पोलिस ठाणे-३, मुंढवा पोलिस ठाणे-९, भारती विद्यापीठ पोलिस ठाणे-१, चंदननगर पोलिस ठाणे-१, सहकारनगर पोलिस ठाणे-२, वानवडी पोलिस ठाणे-२, कोंढवा पोलिस ठाणे-१६ असे एकूण ३७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. | | |

**पिंपरी चिंचवड आयुक्तालय**

| दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|
| १५ | २१ | रू. ४,९८,६७५/- |
| हिंजवडी पोलिस ठाणे-१३, रावेत पोलिस ठाणे-१, सांगवी पोलिस ठाणे-१ असे एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. | | |

पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असल्याची व तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची बाब निर्दशनास आलेली नाही. याव्यतिरीक्त पुण्यात हुक्यासाठीचे १० प्रकारचे फ्लेवर्स मिळून आल्याने ते जप्त करुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिलेली बाब निर्दशनास आलेली नाही तसेच, अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये सुधारणा करून सुधारित अधिनियम २०१८ अन्वये संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घातली असल्याने सदर तरतूदीचे उल्लंघन होत असल्यास वा तसे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर पोलिस यंत्रणेमार्फत वेळीच कारवाई करण्यात येते आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याद्दष्टीने पोलिस प्रशासनाकडून जनजागृती करणे, यापदार्थांच्या व्यसनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करणे, शाळा कॉलेज परिसरात विशेष निगराणी ठेवणे, पेट्रोलिंग करणे, आयटी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तंबाखूजन्य व हुक्का यासारख्या व्यसनांना बळी न पडण्याचे आवाहन करून जनजागृती करणे इत्यादी आवश्यक अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------